Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ — अकोला, रविवार ता० २ मार्च सन १८७३ इ० — अंक ९

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| ...ाचे अगाऊ | ९ |
| ...लअखेर | ७ |
| ...टकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| ...र्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| ... ...टीस | ०।०६ |
| ...ष नोटिस दुसरे ... | |
| ...ग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### जाहिरात.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थांनीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ०६ आणे डाकहाशील ०१

गजकरणाचे औषधाच्या डब्या किंमत ०६ आणे. थंड पाण्यांत भिजवून गंधाप्रमाणें झाल्यावर उटीसारखें लावावें.

## पत्रव्यवहार.

या सदरांतालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि—महाराज, उमरावती हायस्कुलाविषयीं माझी तुह्मांस नम्रतेनें विनंती आहे कीं, खालील चार ओळी आपल्या सुंदर पत्रीं घ्याव्या. कारण मी पडलो वऱ्हाडी, व वऱ्हाडी लोकाची दाद घेतो तरी कोण? मी पटका किंवा मोठें पागोटें बांधूं लागलो तरी माझी मुळची भाषा पडली वऱ्हाडी, ह्मणजे "बायापुऱ्या नयीच पानी झुगीझुयी वाह्यते" असेंमी बोलणारा. याकरितां मला तुम्हाकडील लोक आपले [सावलीत देखील उभे राहूं देत नाहींत. व जिकडे तिकडे तुह्मांकडील लोकांशिवाय कोणीच आढळत नाहींत. त्यांत शाळाखात्यांत तर त्यांच्याशिवाय पानसुध्धां ढळत नाहीं. ते ह्मणतील ती पूर्व दिशा. व ते जरी शाळेमध्यें पानांच्या पट्या व तंबाखूच्या पिचकाऱ्या मारित बसले तरी चिंता नाहीं. कारण कीं तें फार हुशार असतात, असा बोभाटा पडून गेला तो गेलाच आहे; पगाराविषयीं पुसाल तर "बापा साहेबांचा ३०० काकासाहेबांचा १५०" व शिकविण्याविषयीं तर चालूमहिनाच. इतकें मात्र शिकवितात कीं, पानाच्या पट्यांस चुना कसा लावावा, त्यांच्या शिरा कशा काढाव्या, कांत सुपारी कशी घालावी, तंबाखू खाऊन तो थुंकावा कसा? त्याच्या पेक्षां झोप कशी घ्यावी हें तर चांगलेंच शिकवितात. नंतर एकतासापेक्षां जर कांहीं (टैम) वेळ राहिली तर गप्पाष्टकांत घालवितात. तेणेंकरून असें दर्शवितात कीं आमच्या हुशारीत खोट नाहीं. अरे! मी फारच लांब गेलों ह्मणून तुह्मांस त्रास होईल ह्याकरितां मी मुख्यार्थाकडे वळतों.

हेडमास्तरः—हे मास्तर युरोपियन असून ह्यांची नेमणूक थोड्या दिवसांमागें झाली आहे. ज्या वेळेस त्यांची नेमणूक झाली त्या वेळेस त्यांचा स्वभाव असा दिसत होता कीं ही शाळा पूर्वीं पेक्षां ... आहे कीं, तशी होणें एकीकडे राहून ही शाळा बुडण्याच्या बेतांत आहे. व जी आपल्यामध्यें "संगती संगदोषेण" अशी ह्मण आहे ती एथें अक्षरशः लागू आहे. ती अशी कीं त्यांच्या हाताखालचे सेकंड आणि थर्ड असिस्टंट मास्तर लोकांचे कानोपदेशानें त्यांच्या मूळच्या स्वभावापासून अगदीं त्यांस सोडविलें. तें असें कीं मुलांनीं यत्किंचित् अपराध केला अगर शाळेस येण्याला उशीर लावला तर मुलास बेलाशक शाळेंतून काढून देतात.

सेकंड असिस्टंटः—हे मास्तर मोठे फार आहेत व त्याविषयीं त्यांजला फारच गर्व आहे. ते आपल्या कामांत इतकी चपलाई दाखवितात कीं घंटा झाल्यानंतर दुसऱ्या वर्गावर जातां जातां १५ मिनिटें सहज लावतात. व वर्गांत आल्यावर पानाची पट्टी खाऊन तंबाखु थुंकत पांच पांच मिनिटें पिचकाऱ्या मारण्यांत घालवितात. नंतर बाप्तिस्मा स्वीकारलेले मास्तर येऊन त्यांशीं घरगुती गोष्टी करितात. इकडे गरीब बिचारीं मुलें आपआपल्यामध्यें एकमेकांच्या साह्यानें उदाहरणें करूं लागतात. त्यांत जर तीं चुकलीं तर पनतावजीस विचारण्यास त्यांस हिम्मत होत नाहीं; कारण आकाशाई पाठींत बसेल व झोप मोडली जाईल हा धाक! नंतर झोप संपल्यावर हळूच प्रश्न होतो कीं "राइट किती व रांग किती आहेत" हे विचारल्यानंतर मुलें समजतात कीं आपणास आतां खाऊ मिळतो. नंतर ह्मणतात कीं जारे गोमाजी कापशी आलमारींतून छडी आण व ती आणल्यावर मुलांनां पोटभर बक्षीस देतात.

थर्ड असिस्टंट मास्तर :—हे मास्तर पूर्वीं हिंदू असून हल्लीं बाप्तिस्मा स्वीकारलेले आहेत. त्यांच्या स्वभावाविषयीं लिहूं लागलो तर कागद व शाई पुरणार नाहीं व लेखणी तर नरीच मजकुरानें झिजली आहे सबब आज ती आणखी झिजवीत नाहीं.

फर्स्ट असिस्टंट मास्तरः— हे मास्तर बाकीच्या मास्तर लोकांपेक्षां चांगले वागत असून बाकीचे त्यांस दोष देतात परंतु यांस जो दोष देईल तो कृतघ्न समजला पाहिजे. तर त्या मास्तरप्रमाणें बाकीचे मास्तर लोक आपली वर्तणूक ठेवतील अशी आशा आहे.

तारिख २३ फेब्रुवारी सन १८७३ इ.

उमरावती हायस्कुलांतील एक विद्यार्थी
गोमाजी कापशी.

## चमत्कारिक व लोकोपयोगी खबर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सितराम बोवा राहाळकर रामदासी संस्थान श्री पट्टाभिराम पेठ सदाशिव माणआळी शहर पुणें यांजकडून कळविण्यांत येतें कीं, श्रीरामभक्तिपरायण रा. रा. अन्याबा बोवा गोसावी व्यास रामदासी राहणार वांई जिल्हा सातारा यांस जातीनें रक्तपितीचा रोग झाला व श्रीकृपे व्याधीपासून ते निर्मुक्त झाले. त्यांची हकीकत खालीं लिहिल्याप्रमाणें:—

शके १७९३ सालीं बोवा साहेब वाईस असतां वैशाख मासापासून अंगावर गांधी व चटे उठण्यास आरंभ झाला. कांहीं दिवस उठोन मावळत असत. असें होतां होतां त्याच गांठी व चटे सदृढ सर्व अंगावर पक्क्या राहत गेल्या. पुढें शके १७९४ चे आषाढ मासापर्यंत कानावर व मुखावर लोकांस उघडपणें व्याधी दिसूं लागून दिवसेंदिवस व्याधी अधिक होत चालली. पुढें पुण्यास येऊन कांहीं उपाय करावा ह्मणून उद्योग करीत असतां इतक्यांत कार्तिक मासांत जी थंडी पडली त्या तडाक्यांत नख शिखांत अंगास अतिसूज येऊन व अंग बाहिर होऊन मोठे लिंबाएवढ्या गांठी व कांहीं चकदळे जागजागीं वती सूज फुटून रोग वाहूं लागला व शरीरांत मशालीच्या ज्वालेप्रमाणें ज्वाला नरचेवर येऊन असहन होऊं लागल्यानें या व्यवस्थेपेक्षां मृत्यू फार चांगला असें वाटूं लागल्यावरून कोणत्याही प्रकारें आत्मघात करावा असें विचारांत ते होते, तों इतक्यांत दैवयोगानें त्यांस या काळांत केवळ धन्वंतरिस्थानापन्न पुणें पेठ शनवार सरकार वाड्याजवळील रा. रा. आबाजी रामचंद्र उर्फ आबासाहेब अडनांव दिगंबर राहणार सातारा हे येथें सुमारे सहा वर्षें राहत असोन अपूर्व वैद्यक करीत आहेत. तें असें कीं, सर्व प्रकारचीं उदरें व सर्व प्रकारचे वायू व सर्व प्रकारचे ज्वर, सन्निपात व विषमज्वर व सर्व प्रकारच्या मुळव्याधी व क्षय, पंडु आदिकरून जे दुःसाध्य रोग ते थोडे दिवसांत ह्मणजे बहुत दिवस यत्न करून दूर होण्यास कठीण ते यांच्या औषधानें महिन्या पंधरा दिवसांत निर्मुक्त होऊन उत्तम प्रकारच्या प्रकृती होत आहेत व महारोगाच्ची औषध देण्याची अशी तारीफ आहे कीं, पथ्यानें मनुष्य जर फार बेजार झाला तर औषध बंद ठेवून रोग्यास पाहिजे तितके कुपथ्याचे पदार्थ खावयास मोकळीक देऊन पुनः राहिलेले व्यथेला औषध देऊन व्याधिनिर्मुक्त करतात, पण मध्यंतरीं रोग्यानें कुपथ्य केलें ह्याबद्दल आलेल्या गुणास कांहीं कमजास्ती न होतां आलेल्या गुणांत कांहींच अवगुण होत नाहीं. अशा योग्य वैद्याची भेटी झाली व बोवा साहेब हे सत्पात्र क्षेत्रस्थ राहणार त्यांजपासून द्रव्याची आशा न करितां केवळ पारमार्थिक कृत्य जाणून अति दुरत्यय व्याधींतून पंधरा दिवसांत त्यांस निर्मुक्त केलें. तो प्रकार खालीं लिहिल्यावरून ध्यनांत येईल.

बोवा साहेब यांस अति गांठीं व चकदळें व सूज फुटून वाहत होती ती पाहून औषध देण्याचे मनांत आणून बोवास बिन वाऱ्याचे ठिकाणीं राहण्याचें सांगून एक पातळ औषध कुपींत घालून ती सकाळ संध्याकाळ अशीं दोन वेळ कुपीचा बूच काढून दर वेळेस तीन वेळीं हुंगावी ह्मणोन मित्ती मार्गशीर्ष शुध्द ६ शुक्रवार ता० ६ माहे डिसेंबर १८७२ रोजीं दिली. याशिवाय पोटांत औषध बिलकूल नाहीं. फक्त हुंगण्याचे योगानें दुसरे दिवशीं निमे सूज उतरली व पांचवे दिवशीं तर सर्व सूज उतरून गांठी व चकदळे व बहिरपणाही नाहींसा होऊन वाहणेंही बंद झालें. सातवे दिवशीं सर्व अंग पहिलेप्रमाणें चांगलें झालें. तथापि आणखी पांच चार दिवस औषध द्यावयाचें होतें, परंतु बोवा साहेब पथ्यानें फार बेजार झाल्यामुळें हुंगण्याचें औषध बंद ठेऊन बोवा साहेब यांस सांगितलें कीं, तुमची मर्जी असेल तितके कुपथ्याचे पदार्थ खावे. त्याजवरून बोवासाहेब यांणीं पावटा, वाल व वाटाणे वगैरे कुपथ्याचे पदार्थ आपले मनाप्रमाणें सेवन केले तथापि आलेल्या गुणास अशा कुपथ्यानें कांहींच अपकार केला नाहीं. नंतर पुढें आठ दहा दिवस नंतर पुनः आणखी सात दिवस औषध देऊन निःशेष व्याधिनिर्मुक्त करून बाहेर निघण्याची परवानगी देऊन पेठ मजकुरीं श्रीनरसिंव्हाचे दर्शनास ता० ६ माहे जानेवारी सन १८७३ इसवी मित्ती पौष शुद्ध ८ शके १७९४ रोजीं दर्शन घेऊन फिरण्याची मोकळीक झाली. हें अलौकिक कृत्य औषध दिल्यापासून एक महिन्याचे आंत महत् संकटांतून निर्मुक्त झाले.

हा प्रकार बोवा साहेब यांचा व आमचा परिचय असल्यामुळें व ही सर्व हकीकत आह्मांस विदित झाल्यावरून पूर्वीं सदरीं लिहिलेलें व्याधि निर्मुक्त झालेले आमच्य स्नेहाचे प्रत्यय होतेच, परंतु त्या व्याधी आणि हा महाव्याधी केवळ मनुष्याचे यत्नानें दूर झाल्याचा दुसरे कोठें आढळ नसल्यामुळें बोवासाहेब यांचा प्रत्यय पाहून आह्मी स्वतः वैद्यराज यांजकडे जाऊन विचारिलें कीं बोवा साहेब यांस जो व्याधी झाला यावरच आपण इलाज करितां किंवा सर्व प्रकारचे महारोग व शिळीमंद ह्मणजे हत्तीसारखे मनुष्याचे मोठे पाय होतात ते व अंडवृद्धी ह्मणजे मोठे टरपण होत।

त ते आपण दूर करतील किंवा करो, असे विचारितां वैद्यराज यांणीं सांगितलें कीं यांत माझें कर्तृत्व नाहीं ज्या गुरुकृपेनें बुवा साहेब यांचा महारोग बरा झाला त्याच गुरुकृपेनें सर्व प्रकारचे महारोग व शिलीपद व अंडवृद्धी वगैरे निश्चयात्मक दूर होतील. हें ऐकून आह्मास असें वाटलें कीं असे दुःसाध्य व्याधी यांणीं बहुत लोक दुःखी आहेत तेव्हां त्यांस ही खबर समजली तर ते यांचहातून खचित व्याधींतून निर्मुक्त होऊन सुखी होतील असें मनांत आणून सर्वांस कळण्याकरितां विस्तारपूर्वक ही हकीकत कळविली आहे व आपणही लोकपकाशक आहांत तेव्हां आपले पत्रीं वारंवार ही खबर असेल तर दुःखी लोकावर आपलाही मोठो उपकार होईल व ता० ८ माहे जानेवारी सन मजकुरीं पेठ शनवार सरकार वाड्याजवळील श्रीनरसिंह मंदिरीं रात्रौ नऊ वाजल्यापासून बारा वाजे तों पर्यंत कीर्तन करून पश्चात्तिन्हे व्यास बावा यांणीं आपले स्वमुखानें आपले प्रकृतीची हकीकत सदरीं लिहिल्याप्रमाणें सांगून आज हा अपूर्व दिवस व निःशेष रोग निवृत्ति सदरीं लिहिलेले वैद्यराज यांणीं दाखविल्यावरून श्रीचे सेवेत सादर झालों. पुणें ता० ११ जानेवारी १८७३

शिताराम बाबा राहाळकर.

## वऱ्हाडसमाचार.

मिति फाल्गुन शुद्ध ४ शके १७९४

## जोधपुरच्या राजाचा मृत्यु.

या फेब्रुवारी महिन्याच्या १२ वे तारखेस जोधपुरचे राजे महाराज तकतसिंगजी जी. सी. एस. आय. हे मरण पावले. जोधपुर हें मारवाड देशाचें मुख्य शहर आहे तेव्हां तेथील राजे ह्मणजे सर्व मारवाड्यांचे राजे होते व त्या राजाची प्रजा आपल्या देशांत सर्व भागावर पसरलेली आहे तितक्या लोकांस या राजाचे मरणापासून वाईट वाटेल. मारवाडी लोकांमध्यें एक नवीन रूढी पाहिली ती अशी कीं, राजा मरण पावला ह्मणजे साऱ्या प्रजेनें क्षौर करावा. (दाढी मिशा काढाव्या) व त्याप्रमाणें जोधपुरास साऱ्या शहरानें क्षौर केला, मुसलमान लोकांनींही पागोटीं घातलीं नाहींत पांढऱ्या फडक्यानें आपली डोकीं बांधलीं. मुंबईस मारवाडी लोकांची संख्या सुमारें १२००० आहे तितक्यांनीं राजाच्या मरणाचें वर्तमान समजताच क्षौर केलें. इकडेही कांहीं कांहीं मारवाडी क्षौर केलेले आमचे पहाण्यात आले. ही राजनिष्ठा अपूर्व होय व या बदल आह्मी मारवाडी लोकांची तारिफ करितो. कैलासवासी बाजीराव साहेब पेशवे ब्रह्मावर्तास मरण पावले तें वर्तमान ऐकून पुण्यास ब्राह्मण लोकांनीं क्षौर केलें नाहीं. तसेच साताऱ्याचे कैलासवासी महाराज बुवा साहेब व अपासाहेब यांचे मरणप्रसंगीं ही प्रजेचा क्षौर आम्हीं पाहिला नाहीं. व आमच्या निजाम सरकारचे तीर्थरूप थोड्या कालामागें वारले तेव्हांही वऱ्हाडांत कोठें क्षौर पर्वणी आम्हीं पाहिली नाहीं ह्मणून मारवाडी लोकांच्या निष्ठेची प्रशंसा केली पाहिजे. अस्तु. आतां राजाविषयीं थोडी हकीकत सांगतो.

हे जोधपुरचे तकतसिंगजी महाराज ५४ वर्षांचे वयाचे होते. यांस काळेजांत कांहीं रोग झाला होता हा बहुधा अफूनें झाला असावा. मारवाड्यांत पुष्कळ लोक अफू फार खातात असें आपण पाहतों. तकतसिंगजीनीं २९ वर्षें राज्य केलें. यांनां लग्नाच्या बायका ३० व इतर अविवाहित अशा १० बायका आहेत त्याचप्रमाणें संतती ही विपुल आहे. ह्मणजे लग्नाच्या बायकांनां मुलगे १० व मुली ६ आहेत व दुसऱ्या बायकांनां मुलगे ९ व मुली ८ आहेत. राज्यकर्त्या पुरुषाला इतकी संतती असल्याची हिंदुस्थानांत दुसरी उदाहरणें थोडींच आढळतील. आपल्या महाराणी विक्टोरिया साहेब यांसही अशी पुष्कळ संतति असल्याचें आमचे वाचकांस ठाऊक आहेच. तकतसिंगजीचे वडील चिरंजीव जसवंतसिंगजी हे आतां गादीवर बसतील. यांचें वय ३६ वर्षांचें आहे.

## गेल्या आठवड्यांतील भाषणें.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार यांणीं मि० लायल साहेब यांविषयी इंग्लिशमध्यें भाषण केलें त्यांतील तात्पर्य—

आजच्याप्रसंगीं मी येथें बोलावें ह्मणून अकोल्याच्या पुढारी मंडळीनीं इच्छा दर्शविल्यावरून मी भाषण करितो. महाराज, आपण वऱ्हाडांतून जातां आहां यावेळीं आपला गौरव करावा, व आमच्या देशाच्या कल्याणाकरितां आपण सतत श्रम केले त्याविषयींचें आमचें समाधान आपणास व्यक्त करून दाखवावें याकरितां आम्हीं आज येथें जमलो आहों.

५ वर्षें येथें आपल्याकारभाराची कारकीर्द आह्मी पाहिली तिची यथातथ्य प्रशंसा आमच्यानें करवणार नाहीं. तरी न्याय इनसाफाची आपली उत्तम रीती. व सरकारी नोकर आपापलीं कामें योग्य रीतीनें चालवितात कीं नाहीं याजविषयींचे आपलें काळजीपुरःसर लक्ष्य याबद्दल बोलाणें करण्यास आह्मी आपली परवानगी घेतो. आतां मी अधिक वेळ भाषण करून आपल्या अमोलिक वेळेचें हरण करावें अशी जमलेल्या मंडळीची इच्छा नाहीं. ह्मणून मी इतकेंच ह्मणतो कीं आजचा हा प्रसंग आह्मांला आनंदाचा व दुःखाचा आहे. ह्मणजे असें — आपण मोठ्या महत्वाच्या जागेवर जातां आहां व तेथून आपणास आमच्या देशाचें कल्याणार्थ झटण्यास आतां जास्ती फार होईल याकरितां आह्मी आनंद मानितो व दुःख याकरितां मानितो कीं, आपण आह्मांमधून जातां आहां व आपले नव्या कामाचा वऱ्हाडवासी लोकांशीं निकट संबंध आतां राहिला नाहीं. तरी आह्मी आशा करितो कीं, कांहीं कालानें आपण हैदराबादेस रेसिडेंट व्हाल व हें होणें आपल्या नव्या जागेच्या हक्काला कांहीं अधिक नाहीं; कारण त्याहूनही मोठाले अधिकारावर आपण जाण्याचा संभव आहे तरी आपले विद्वत्तेमुळें वऱ्हाडांत आपलें नाव सर्वतोमुखीं झालेलें आहे ह्मणून एक वेळ आपण रेसिडेंट होऊन येऊन आमच्या वऱ्हाडचें मुख्य राज्यसूत्र आपल्या हातीं घ्याल. आतां शेवटीं मोठ्या सन्मानतेनें आह्मी आपली आज्ञा घेतो आणि सर्वशक्तिमान् परमेश्वरानें आपणाला दीर्घायुष्य व सदा भरभराट द्यावा याकरितां त्याची प्रार्थना करितो. (आनंदाची टाळी !!!)

नंतर रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांणीं हिंदुस्थानींत भाषण केलें तें:—

अहलयान मजलिसने अपना इंतिमा जाहिर करनेके वास्ते फिदवीकू इज्याजत दिये, लेकिन हुजुरकी इज्याजत बहोत थोडे वक्तके वास्ते हम लोकोनें हासल कियेथी, इस वास्ते मुक्तसर मारूजा करताहूंके मुल्क वराडमें पांच बरसतक सरकारने अमलदारी किये. इन दिनोंमें हमारी जो परवर्षी अवर कदरदानी फरमाये उसका बयान बहोत तूल होगा हासल कलाम रयतकी परवर्षी व सरकारकी खैर ख्वाही दोनो काम नेक बजाईसे होना अगरचे मुश्कील अमरथा, लेकिन हुजुरने दानाईसे अवर नेकनियतीसे न सरकारका नुकसान किया, न रिआयाका दिल आजुर्दा होने दिया. अब हुजुर कलकत्तेकू तशरीफ लीजातेहैं इस अमरमें एक तरहसे हम लोकोकू न्यहायत खुशी हासल हुयीके हुजुरकू दरजे आला मनसूब हुवा, बलके यिह उमेद है के खुदाताला और रोज बरोज तरकी करे. दुसरे तरहसे गमी इसलिये हैकी हुजुर हमलोकोकू छोडकर बहोत दूर तशरीफ लीजातेहैं और मुदत दराजतक मुलाकात फिर हासल होनेकी उमेद नहीं है अवर अपके तशरीफ ली जानेके बाद जो आफिसर तशरीफ लायगे वह किस तरहसे कारवाई करेंगे. और अब दरखास्त बारे तालासे यिह हैके हुजुरकी तरकी हमेशा होती रहे व बाकी जमाना बखूशी गुजरता रहे अवर जो अफिसर अपके बाद तशरीफ आवर होइंगे वहभी हमार हालपर हमेशा नवाजिश फरमाते रहे व न नुकसान सरकारका न दिल आजारी रयतकी करें.

नंतर मि० लायल साहेब उठून उभे राहिले व प्रथम इंग्लिशमध्यें बोलले.

सभ्य गृहस्थहो, आपण जें कांहीं केलें व बोलला त्याबद्दल मी आपला आभारी आहे व तुह्मी जी ममता दाखविली ती मी पूर्णपणें जाणिली. पांच वर्षांत जर मी कांहीं केलें असेल तर ते सर्वप्रतीच्या लोकांनां न्याय इन्साफ देण्याकरितां केलें असेल. तसेच जर मी आणखी कांहीं केलें असेल तर या देशच्या लोकांनां ब्रिटिश राज्याची शक्ति व उत्तमता हीं समजाऊन देण्याकरितां केलें असेल. आणखी जें मी कांहीं केलें आहे तें इंग्लिश सरकारास जें करावयास इच्छित तेंच केलें आहे. आतां शेवटास मी तुह्मा सर्वांच्या मायेकरितां तुमचे उपकार मानितो.

(आनंदाची टाळी !!!)

नंतर मि० लायल साहेब हिंदुस्थानींत बोलले तें असें:—

अहलयान मजलिससे गुजारिश है मैंने इन पांच बरसमें जैसाके आपने कहा जो कुच काम किये वह सब सरकारके नेक नामीके वास्ते अवर सरकारकी इन्साफके वास्ते कैसी नजर है यिह जाहिर करनेके वास्ते व सरकारकी जवामर्दी सलावत जाहिर करनेके वास्ते किये अवर ऐसे मेरे कामोसे अब लोक खुश है इसलिये मैं न्यहायत इहसानमंद हूं और अब लोकोने जो तजवीज फर्माया इसकी बहोत देर तक याद रहेगी.

(आनंदाची टाळी !!!)

## वऱ्हाड

आमचे वऱ्हाडांत लार्ड मेयो साहेबांचें स्मारककृत्याकरितां २५०० रुपये वर्गणी जमली असें समजतें.

—०००—

खामगावात यावर्षी कापसाचा व्यापार चांगला चालला आहे. बाकीचीं यंत्रें आहेत त्या चाहीस खळ नाहीं. प्रतिदिन दोन अडीचशें बोजे येकेकांत फुल दाबानें तयार होत आहेत.

—०००—

याआठवड्यांत मंगळवारीं महाशिवरात्र व बुधवारीं आश वेदनिस्डे असे हिंदु व इंग्लिश सण आल्यामुळें दोन दिवस कचेऱ्या बंद होती.

—०००—

कमिशनर साहेबांचे जागेवर अजून कोणाची कायम नेमणूक होणार ते समजत नाहीं.

—०००—

मि० कावडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर याची स्वारी मलकापुराकडे आहे.

वाशिमचे तहशिलदार रा. रा. भट व्यंकटेश बाबा आजार बरा होत नाहीं त्याचे जागेवर पुसदच मि० मोर ... आली यांस नेमिलें बपुसदेस रिसोडचे ... अपाराव देशमुख यास नेमिलें. ही ... पर दिसते. आमचे देशमुख तहशिलदार किती विद्वान् आहेत कोण जाणे!

—०००—

अकोल्यास शिवभक्त बरेच ... शिवरात्रीचे दिवशीं कित्येक वकील ... रकारी कामदार लोकांचे घरीं ... क झाले. कोठें दोन, पांच, अकरा ... से ब्राह्मण होते. त्यांत रा. रा. मा... व हरि पटवर्धने डिप्युटि कमिशनरचे ... कें यांचे एथें तर शिवरात्रीचा प्रसंग ... ला होतो. रात्रीच्या चार प्रहरांत ... द्रपूर्वक चार पूजा होतात ... ब्राह्मण ११ असतात. व अभिषेक ... द्रव्य प्रहरा प्रहराला वेगवेगळालें ... ह्मणजे दुधाचा, उसाचे रसाचा, ...

चा, व पंचामृताचा असे अभिषेक होतात. दुसरे दिवशीं यांची सांगता होऊन प्रत्येक ब्राह्मणाला एकेक धोतरजोडा व रुपया रुपया दक्षिणा देतात असे समजलें आहे. इंग्लिश शिकलेल्या तरुणाच्या ठायीं इतकी धर्मश्रद्धा दुर्मिळ पाहून आह्मी माधवरावांची ही गोष्ट वाचकांस अगत्यपूर्वक कळवितो.

—०००—

उमरावती हायस्कुलाविषयीं गोमाजी कापसे या सहीचें एक पत्र आलेलें आज छापलें आहे तें सर्वच खरें असेल तर त्या शाळेला लजिरवाणें होय असे आम्हाला वाटतें. तंबाखु खाऊन पिचकाऱ्या मारीत बसणें व झोप घेणें हीं मास्तर लोकांची शाळेंतील कर्तव्यकर्मे नव्हेत असें आह्मी समजतों. या हकीकतींत दुरुस्ती [illegible] असून ती आम्हांस कळेल तर अगत्य प्रसिद्ध करूं.

—०००—

वाईचे अन्याबा व्यास प्रसिध्ध हरिदास यांस रक्तपित्तीचा आजार झाला होता व त्यांस पुण्याचे वैद्य आबा दिगंवर यांनीं उत्तम औषध देऊन लवकर बरें केलें व पाहिजे त्या रोगावर उत्तम औषधाची ते योजना करितात वगैरे मजकुराचें सितारा येथील आबा राहाळकर यांच्या सहीचें आम्हांस पत्र आलेलें पहिले पृष्ठावर छापिलें आहे त्याकडे वाचकानीं लक्ष्य द्यावे. वऱ्हाडांत अशा रोगाचे गृहस्थ बरेच आढळतात त्यांपैकी कोणी त्यांकडे औषधोपायाकरितां जातील तर बरें होईल. मंडगाळांवर मामच्या घरच्या एका मनुष्यास औषध देऊन त्यांनीं बरें केलें याची आम्हांस माहिती आहे. व सदर्हू वैद्यास आह्मीं पाहिलेंही आहे.

—०००—

उमरावतीस मोठा पाऊस पडला व तेणेंकरून कापसाचे विकास बराच धक्का बसला असें कळतें.

—०००—

इचलकरंजीकर नाटकवाले लासगावाहून काल एथें आले. शेट गुलाबराय गोविंदराम यांचे दुकानाचे पाठीमागला चौक नाटकगृहाकरितां तयार करित आहेत. व या मंगळवार, गुरुवार, आणि शनवार रोजीं ते नाटकें करणार असें कळतें.

—०००—

नांदुरा येथें डायरेक्टर साहेब परीक्षेस गेले होते ती शाळा त्यांचे पसंतीस आली व पिंपळगाव राजा येथें त्यांस तसा संतोष झाला नाहीं असें कळतें.

—०००—

अकोल्यास रा. रा. नारायण महिपत हे कित्येक वर्षें नाझर आहेत त्यांना पगार ४० रुपये असून शिवाय फी मिळत असती पण त्यांचें काम जोखमीचें असून पगार थोडा म्हणून पगार वाढविण्याविषयीं इकडून शिफारस झाली होती पण त्याप्रमाणें घडून न येतां चमत्कारिकच ठराव होऊन आला. म्हणजे नाझरास २५ रुपयेच पगार वफी असावी असें ठरलें व त्याप्रमाणे २५ची येक नेमणूक झाली परंतु नारायण महिपत हे जुने नोकर व मेहनती आणि हुशार ह्मणून ते आहेत तोंपर्यंत त्यांनींच नाझरचें काम करावें व २५ रुपयाचे मनुष्यानें डिपुटि हपिसांत काम करावें अशी तजवीज मेजर बेलसाहेब यांनीं करविली आहे ही आह्मांस पसंत वाटते व नाझरास पगार जास्ती असावा असें आमचें मत आहे.

—०००—

श्रीमंत रा० रा० हरिहर राजे नेमिवंत हे हैदराबादेहून इकडे आले आहेत. व कमिशनर साहेबांस भेटण्याकरितां मागल्या आठवड्यांत ते येथें आले होते. मलकापुरास नेमिवंतांची हवेली ज्यानीं पाहिली असेल त्यांस यांच्या पूर्वसंपत्तीची व थोरवीची कल्पना चांगली करितां येईल. पुढील आठवड्यांत आह्मी त्या विषयींची माहिती लिहूं.

—०००—

खानदेश रिलीफ फंड.

वसूल.

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| रा. रा. अपाजी शामाराव. वकील अकोला. | २ | ० | ० |
| | २ | ० | ० |
| पूर्वी छापून प्रसिद्ध झाले ते | १८६ | ८ | ० |
| | १८८ | ८ | ० |

यापैकीं १८६–८ धुळयास ऐक्यवर्धक सभेचे चिटणीस यांकडेस पाठविण्यांत आले बाकी वर्गणी मंडळीनीं लवकर पाठविण्याची कृपा करावी. अकोला तारीख २१ फेब्रुवारी सन १८७३ इसवी.

वामन बाळाजी ओझरकर.

—०००—

वाशिमाहून (मित्राकडून) तारिख २४ फेब्रुवारी १८७३ हल्लीं येथें एक नवीन गृहस्थ डिपुटि कमिशनर कचेरींत रा. श्रीनिवास राव यांचे जागेवर हंगामी नेमिले आहेत. त्यांचे नाव करीमुल्लाखान आहे. रा. कृष्णाजी गोविंद रजेवर गेले होते तेव्हां त्यांचे जागेवर मशारनिल्हे करीमुल्लाखान यांस अक्टिंग नेमिले होते. श्रीनिवासराव यांस रेविन्यु सरन्हेकडे नेमलें आहे ते परत येईत पर्यंत करीमुल्लाखान त्यांचे काम करतील. यांस इंग्रजी बरेंच येतें परंतु मराठी बिलकुल येत नाहीं. त्यानीं अ आ चा धडा सुरू केला आहे. जेव्हां ते कृष्णाजी गोविंद यांचें काम पहात होते तेव्हां त्यानां एक कारकून मराठी अर्ज वाचण्याकरितां लागे. कारकूनानें वाचून हिंदुस्थानी भाषेत तर्जुमा करावा तेव्हां हे इंग्रजी तर्जुमा करीत हे गृहस्थ पूर्वीं नागपुरेंच डायरेक्टरचे आफिसांत हेड क्लार्क आणि क्युरेटर होते त्या जाग्याचा राजिनामा देऊन तिकडून शिफारसेपत्र घेऊन आल्यावरून क्या० फिटझरल्ड साहेबांनीं त्याना आपले कचेरींत एकदम जागा दिली. क्या० फिटझरल्ड साहेब पुसदास जमाबंदीचे कामांत देखरेख ठेवण्याकरितां गेले आहेत. मागले आठवड्यांत मेजर मेन चीफ इंजिनियर व अकोल्याचे एक्झिक्युटिव इंजिनियर व मि० पोप साहेब असे तिघे इंगोलीहून वाशिमास आले होते ते झालेलीं कामें पाहून अकोल्यास गेले व पोप साहेब इंगोलीस परत गेले. येथें नवीन ओव्हरसियर वामन दामोदर आले आहेत त्यास मालेगाव रोड पहाण्यांस नेमलें आहे.] रा. रा. बजाबा रामचंद्र डिपुटि इन्स्पेक्टर बाहेर गांवीं दौऱ्यावर गेले आहेत क्या० मारो साहेब असिस्टंट कानसर्वेटर हे आपल्या आफिसा सहित परवाचे दिवशी दव्यावर गेले. तहशिलदार भास्करराव हे आजारी होते ते पुन्हां कामावर जाऊं लागले. ते पेनशन लवकर घेणार असें त्यांच्या बोलण्या वरून दिसतें.

## वर्तमानसार

जबरदस्त भिल्ल.—होळकर इलाख्यातील मौजे दसाणा येथील जगत्या यानांवाचा एक भिल्ल फार उन्मत्त होऊन गावच्या मंडळींस हा त्रास देतो. राजपूर, बडवाणी वगैरे महालीं तिन दिवस जागोजाग वारदात करीत आहे त्याजला पकडण्या करितां साधारण बंदोबस्त ठेविला होता परंतु तशानें तो हातीं लागत नाहीं सबब हल्लीं मध्या शानवारा मुनसरीम सिराई पाजला सरकारी असा हुकूम झाला आहे की आपण १०० पायदळ व तीस स्वार बरोबर घेऊन जाऊन त्यानला पकडून आणावें त्या प्रमाणें ते गेलेही आहेत.

स्तुत्य कृत्य.—ब्राह्मण जातीच्या श्री गजगद्गुरूच्या मठांत असा विचार चालल्याचें एकण्यांत येतें कीं, हल्लींच्या तरुण विद्वान लोकांनीं दंत ब्राह्मण व वेदशास्त्रांची निर्भर्त्सना, दुष्ट लोकांची विनाकारण निंदा, अविश्वास, असत्यता, दुराग्रह, धर्मभ्रष्टता वगैरे गोष्टी अल्पमतीनें, दुर्बुद्धि व कुतर्कानें प्रगट करीत आहेत. आपल्या वेदशास्त्रांमध्यें व इतर उत्तम ग्रंथामध्यें ते विचार करून ढुंकून देखील न पाहतां आडमार्गानें वर्तन करित आहेत, यापासून आपल्या या भरतखंडाची फार नासाडी होणार आहे तर यानीं पुढें असाच क्रम न चालविण्याविषयीं जागोजागीं जाहिरनामे लाऊन त्यांचा तो दुष्ट उद्योग बंद करण्याबद्दल सूचना द्यावी, ते जर न ऐकती तर त्यांजला बहिष्कृत करून ब्राह्मण लोकांनीं त्यांजबरोबर अन्नोदक व्यवहार ठेवूं नये व इतर निकृष्ट जातीप्रमाणें त्यांची एक निराळी जात समजली जाईल. इं. प्र.

चांडाळ आई—सातार्‍यास एका बायकोस जुळीं दोन मुलें झालीं होतीं पैकीं एक फार रडत असे म्हणून तिनें त्यास जंगलांत नेऊन त्याचा गळा दाबून जिवें मारलें व गाडलें हा भयंकर प्रकार लवकरच उघडकीस आला पुढें त्याचा तपास होऊन तीस फांशीची सजा झाली. ती हायकोर्टानें कायम केली अशा चांडाळणीस कोणी आई म्हणेल काय? बं. स.

मुंबई इलाख्यांत जे सनदी डिपुटि कलेक्टरच्या हल्लींच्या जागेवर लोक आहेत त्यांची प्रतवार नावनिशी मुंबई सरकारचे ग्याझेटांत छापली आहे ती अशी:—

प्रत पहिली पगार ७०० रुपये.

१ मि. नाना मोरोजी हल्लीं थर्ड पोलिस माजिस्त्रेट मुंबई
२ मि. एच इंगल हु. डि. कारवार.
३ मि पेस्तमजी जहांगीर उत्तर भाग दुमाल्याचे सेटलमेंट आफिसर.
४ मि. जे. एफ. फार्नांडीज हुजुर डिपुटि अमदाबाद.

दुसरी प्रत पगार ६०० रुपये

१ मि. सी. जे. काइट दक्षिण भाग रिविन्युचे आसिस्टंट
२ मि. ए. डब्ल्यु. ह्यूज सिंधचे कापुस खात्याचे इन्स्पेक्टर
३ मि. ई. टी. रिचर्डसन सिटी माजिस्त्रेट पुणें.
४ मि. कुवरजी कावसजी हुजूर डिपुटि ठाणें (टेंपररी फर्स्ट. नाना मोरोजीबद्दल.)
५ मि. जगजिवनदास खुशालदास हुजुर डिपुटि सुरत.

तिसरी प्रत पगार ५०० रुपये

१ मि. डब्ल्यु. आर हामिल्टन उत्तर भाग रिविन्युचे असिस्टंट
२ मि. आय ड्रेकप हु. डि. धारवाड.
३ मि. फ्रामजी नसरवानजी हु. डि. अहमदनगर (टेंपररी सेकंड ह्यूस साहेबाचे जागीं.)
४ मि. आपाजी रामचंद्र दप्तरदार सुरत [टेंप. से. कुवरजीचे जागावरींत.]
५ मि. ए. एच. प्लंकेट हु. डि. नाशिक यांस उत्तर भाग दुमाले सेटलमेंट आफिसराचा पगार मिळतो.

चवथी प्रत पगार ४०० रुपये

१ रिकामी जागा रेलवे माजिस्त्रेट
२ मि. उमेदराम आनंदराम हु. डि. सुरत (टेंप. थर्ड. फ्रामजी नसरवानजीचें बदलींत)
३ मि. चुणीलाल वेणीलाल हु. डि. भडोच (टेंप. थर्ड. आपाजी रामचंद्राचे बदलींत.)
४ मि. जे. हर्न हु. डि. सातारा. (प्लंकेटचे जागावरींत थर्ड)
५ मि. बळवंतराव लक्ष्मण दप्तरदार रत्नागिरी.
६ मि. जे. अर्हींग हु. डि. धारवाड.
७ मि. महादाजी वासुदेव नर्वे कारभारी कोल्हापुर.
८ मि. जे. एडवर्डस हु. डि. सोलापूर.
९ मि. माणकजी कावसजी एंटी हुजुर डिपुटि खानदेश
१० उमेदराम रणछोडदास हुजुर डिपुटि खेडा.

पांचवी प्रत पगार ३०० रुपये.

१ रिकामी जागा. रेलवे माजिस्त्रेट
२ मि० प्राणलाल मथुरादास हु. डिपुटि पंचमहाल (टेंप० फोर्थ, उमेदरामाचे जागावरींत
३ सी. डब्ल्यु. रिचर्डसन हुजुर डिपुटि कलेक्टर कलादगी [टेंप. फोर्थ, चुणी.)
४ मि. लक्ष्मण जगन्नाथ हु. डि. कले. बेळगाव (टे. फोर्थ, हर्न.)
५ मि. आदरजी जिवनजी हुजुर डिपुटि भडोच.
६ मि. सखाराम खंडेराव उत्तर भाग रिविन्यूचे नेटिव असिस्टंट [टे. फोर्थ महादाजी वासुदेव.)
७ मि. नारायण गणेश साठे हुजुर डिपुटि ठाणें.
८ मि. शंकर पांडुरंग पंडित हुजुर डिपुटि खानदेश.
९ नारायण भिकाजी दक्षिण भाग रिविन्यूचे नेटिव असिस्टंट.
१० मि. रंगराव भिकाजी हुजुर डिपुटि कुलाबा
११ मि० होर्मसजी बापुजी विमाजी

हुजूर डिपुटी सातारा.

१२ मि० सदाशिव मोरेश्वर दप्तरदार ठाणे अकार्टिंग नेमणुका.

१३ मि० आनंदराव भास्कर हुजूर डिपुटी कलादगी.

१४ मि० बमनजी एदलजी हुजूर डिपुटि खेडा.

१५ मि० धोंडो कृष्ण कानिटकर हुजूर डिपुटी रत्नागिरी.

१६ मि० रामचंद्र सखाराम डिस्ट्रिक्ट डिपुटी बेळगाव.

## पैशाचा हव्यास.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

पैशाचा हव्यास हा कांहीं अंशीं अविचार, मूर्खपणा, कोतीबुद्धी, अनीतिविषयीं डोळेझांक, छानछोकी किंवा कृपणता, तसेंच स्वार्थदृष्टी व दुसऱ्यांचे हक्क न जाणणें इत्यादि गोष्टींच्या तर्फे उद्भवतो. वास्तविक हाटलें असता निर्वाहास अवश्यक लागणार याहून अधिक जो पैसा तो अनीतीनेंही मिळवावा असें त्यांत कांहींही चांगलें नाहीं. आतां हा हव्यास मनुष्याला जडावयाला मूळ कसें होतें तें पहावें. दुसरा मनुष्य रेशिमकांठी धोतरजोडा नेसत असला आणि आपण सर्व काळ जगन्नाथी नेसत असलों तर आपल्याला एकादेवेळ वाटतें कीं रेशिमकाठी धोतरजोडा आपणालाही असावा, इतक्यापुरताच हव्यास उत्पन्न झाला तर तो फारसा वाईट नाहीं असें प्रथमतः वाटतें पण अनवश्यक हव्यासाचा धर्म असा नाहीं. त्याला कोणाच्या मनांत थोडा ठाव मिळाला कीं तो स्वराप्रमाणें वाढत चाललाच. ह्मणजे हीच गोष्ट पुढें चालवून पहा दुसऱ्याच्या धोतरजोड्याविषयीं विचार केला ह्मणजे असे वाटतें कीं मीं जन्म दरीद्री आजवर जगंनाथाच नेसत आलो यासाठीं एकवार तरी १० रुपयांचा नागपुरी धोतरजोडा वापरावा ह्मणजे हौस फिटेल. मग त्याच्या शिलकेंत थोडे पैसे राहिले कीं तो रेशीमकाठी धोतरजोडा घेतो व तो प्रथम दिवशीं नेसण्यानें काय त्याचे मनास क्षणमात्र सौख्य वाटलें असेल तेवढेंच, बाकी कांहीं नाहीं. पण त्या अवश्यक हव्यासाचा उपशम विचारानें केला नाहीं यामुळें पुढें काय होतें तें पाहा—कोणाचे डोक्यावर चांगले पैठणी पागोटें पाहिलें तर पुन्हां त्यास त्याचें जन्म दरिद्रा बद्दल वाईट वाटून एकवेळ तरी पैठणी पागोटें विकत घ्यावें असें वाटतेंच. पुढें कोणाचे आंगावर पुष्कळ दागिने पाहिले कीं, हव्यास उत्पन्न झाला, कोणाचें चांगलें घर पाहिलें, हव्यास उत्पन्न झाला, गाडी घोडा पाहिला, हव्यास उत्पन्न झाला व तेते जिन्नस मिळाले नाहींत ह्मणजे फिकीर उत्पन्न झालीच मग त्याचे मनाचे अस्वस्थतेस पारावार नाहीं. काय चमत्कार आहे पहा! सर्व मनुष्यें किंवा सर्व वस्तु एकाच प्रकारच्या स्थितींत ठेवाव्या असा ईश्वराचा हेतु दिसत नाहीं. ह्मणून त्यानें कोणी अत्यंत श्रीमान, कोणी सामान्य श्रीमान, कोणी खाऊन पिऊन सुखी, कोणी गरीब, कोणी अत्यंत दरिद्री असे पृथ्वीवर लोक ठेविले आहेत] तर प्रत्येकानें आपणास ईश्वरानें दिलेली स्थिती मनांत आणून संतुष्ट वृत्तीनें जगतांतील व्यवहार करून ईश्वराचा हेतु शेवटास न्यावा. व तशाकरितां कृपाळु परमेश्वरानें मनुष्यमात्रास विच्यार हें एक उत्तम साधन दिलें आहे त्याचा योग्य उपयोग करून अतिशय हव्यासापासून आपणास दूर राखावें हें फार अवश्यक आहे. व याचा धडा आरंभा पासून ह्मणजे उदाहरणांतील धोतरजोड्याची इछा मनांत उत्पन्न झाल्यापासून लागलाच घेतला पाहिजे. ह्मणजे त्यानें मनांत आणावें कीं, दोन रुपयांच्या जगन्नाथी पासून मला कांहीं दुःख होत नाहीं. मजहून जे गरीब आहेत ज्यांस च्यार आण्याचें ही जाडें भरडें वस्त्र मिळत नाहीं, व लोकांनीं दान दिलेल्या फाटक्या [illegible] करितात त्यांहून मी किती सुखी! माझी जगनाथी किती तलम, हलकी व सरेख आहे! मला १० रुपयाच्या धोतरजोड्याचा जड बोजा कशाला पाहिजे आहे? तो न घेण्यानें जे माझे ८ रुपये वाचतील ते दुसऱ्या किती चांगल्या कामाला उपयोगी पडतील! मला ४० रुपयांचे पैठणी पागोटें कशाला पाहिजे? १० रुपयांचे दुमोली पागोट्यानें माझा चांगला निर्वाह होत असतां मी आपल्या मुला लेकरांची व प्रपंचाची अडचण करून विनाकारण ३० रुपये एका पागोट्यांत कां अडवून टाकावे? माझेच शिलकेंत बायकोला दागिने करण्याइतके पैसे उरत नाहींत तर मग मी सावकाराचें कर्ज काढून व अनीतीनेंही पैसा मिळविण्याचा हव्यास धरून केवळ नेत्रसुखार्थ काळजीच्या व दुःखाच्या बाजारांत दाटुन कशाला शिरावें? मला घर बांधण्याला सामर्थ्य नाहीं तर मीं तें बांधण्याचा उपद्व्याप कां करावा? भाड्याचीं घरें हीं कोणाकरितां आहेत? ज्यांनीं तीं हव्यासानें मुळीं बांधिलीं ते सर्व त्यांत राहण्यास आतां कोठें जिवंत राहिलेले आहेत? इत्यादि विचार मनांत आणिले व ते स्थीरवृत्तीनें ताडून पाहिले तर आपलेंच मन आपणास सांगणार आहे कीं अधिक हव्यासापासून कांहीं सुख नाहीं. ईश्वरानें आपणाला जी नियमित प्राप्ती ठेविली असेल तिच्या बेतानें आपला खर्च ठेवावा. फार कार्पण्य करून दैन्य दाखवूं नये. व बडे नावाकरितां फाजील खर्च करून मूर्खपणा पदरीं घेऊं नये इतकाच विचार ठेवावा ह्मणजे पुरे.

पुढें चालू.

## नोटिसा.

नोटिस—रा. शिवराम वल्लद पामाजी इंगळे राहणार मौजे तळप परगणे गिरोली तालुके दारव्हे यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून लग्न जाहल्यास १८ किंवा १९ वर्षे झाली असतील तेव्हांपासून तुह्मी धर्माप्रमाणें माझें पाणिग्रहण केलें परंतु मी आज चार वर्षांपासून तुमचे पाशी तुह्मी पाणिग्रहण करीत नसल्यामुळें राहत नसून वेगळी राहते व चार जातवाल्यानीं तुमच्याशीं पुष्कळ समजुतीच्या गोष्टी केल्या तेव्हां तुह्मी साफ सांगितलें कीं, माझेकडून शिरस्त्याप्रमाणें पाणिग्रहण होत नसून तूं दुसरा नवरा कर मजकडून कांहीं हरकत नाहीं. तेव्हां मजला आतां दुसरा नवरा करण्यास कांहीं हरकत राहिली नाहीं. परंतु आणखी आपल्यास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, अद्यापि माझे धर्माप्रमाणें पाणिग्रहण करणें असल्यास माझे खाण्याबद्दल मागील च्यार वर्षांचे रुपये २०० मजला देणें आहेत ते देऊन मजला घरीं नेऊन नांदवावें अगर नांदविणें तुमचें मनांतून नसेल तर या नोटिशीचे उत्तरानें तसाच जबाब पाठवावा ह्मणजे ते उत्तर मी फारकती दाखल समजून दुसरा विवाह करीन. ह्या कृत्यास मी ४० दिवसांची मुदत देते. त्या मुदतींत तुह्मी [illegible] न पाठविला तर मी दुसरा विवाह करावा ही गोष्ट तुह्मांस मान्य झाल्यामुळें तुह्मी जबाब पाठवित नाहीं असें मी समजेन व तुमचा मजवरील हक्क रहित होण्याची कायदेशीर तजवीज करीन. यावकरितां पाहिजे तर तुह्मी आतांच आपली तक्रार कळवावी. तुह्मी आपली दोन लग्नें करून पुन्हा तिसरें करण्याची उमेद धरून प्रपंच करितां तसें मलाही वाटतें परंतु मी च्यार वर्षे जी मुठींत धरून तुमचे नावावर बसले तर तुह्मी बिलकुल माझा समाचार घेतला नाहीं जाणोन फुकट वय कोठपर्यंत घालवावें असे जाणून ही विज्ञप्ती केली आहे तर वर लिहिल्याप्रमाणें काय करणें तें करावें कळावें. तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८७३ इसवी.

(सही) निशाणी लक्ष्मी मर्द शिवराम राहणार मौजे मोहाखेड प्रगणे कारंजा तालुके मोर्तिजापुर इची असे.

नोटिस—मगनीराम तनसुखदास दुकान सवदळे तालुके अकोट वहिवाटदार खेमचंद मारवाडी यांस शामलाल किसनदास वहिवाटदार मुरलीधर दुकान हिवरखेड यांजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुम्हाकडे सिताराम मुकुंद राबडी हिवरखेडकर यांचें २ घरें तुह्मी हगास केलें ते वेळेस आह्मी गहाणाचा हक्क दाखवून आकोट कोर्टांत तो हक्क शाबित केला. त्याबद्दलचे रुपये पांचशें मुद्दल व व्याजासुद्धां रुपये असे अद्यापि तुह्मी दिले नाहींत सबब या नोटिशीवरून असें कळविण्यांत येतें कीं नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत आमचे सर्व रुपये मुद्दल व आज मितीपावेतो जें व्याज होईल त्यासुद्धां निकाल न केल्यास कानूनप्रमाणें इलाज करूं व त्याचा खर्च व या नोटिशीचा खर्च तुह्मांस द्यावा लागेल, कळावें तारीख १६ माहे फेब्रुवारी सन १८७३ इसवी.

[सही] शामलाल किसनदास दुकान हिवरखेड दस्तुर मुरलीधर.

नोटिस—रावश्री बालचंद सुकानंद राहणार जळगाव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिशीचें उत्तर दिलें जातें कीं तुमची नोटीस सर्वथैव खोटी आहे कारण घरांत मी तुह्मास व तुमचा भाऊ मोतीराम यास ठेविलें [illegible] त्यानीं मजवर रुपये विनाकारण का[illegible] करून सन १२६२ सालांत नवाब [illegible] साहेब बहादूर यांचे समक्ष पंचाईत [illegible] न सर्व मागील बाकी त्याजला चु[illegible] करून पावतीही त्यानीं दिली आहे. पुढें मी तुह्मापासून रुपये मागेशेरी [illegible] नाहींत. तुमचे भावाचे हातची भाडें [illegible] दर साल रुपये ६० मागेशेरीचे कंपनी[illegible] पर्यंत ४८ प्रमाणें देण्याचे कबूल [illegible] भाडेखत लिहून दिलें आहे त्याप्र[illegible] सन १२७१ तागाईत सन १२८२ [illegible] रुपये ४८ प्रमाणें आकार ५७६, वसूल तुमचे मार्फत रुपये मेनके [illegible] व्याज मुद्दलसुद्धां १८८ [illegible] ३९८ तुह्माकडे येणें निघत आहे. रुपये तुह्मी दिलेच [illegible]

सन १२९२ तागाईत सन १२[illegible] पावेतो मागील भाडें मजला पावलें [illegible]

ह्या नोटिशीनें तुह्मास येक वार कळवितों कीं, ही नोटिस तुह्मास पा[illegible]च येकदम घर खाली करून द्यावें; तसें न केल्यास भाड्याबद्दल ३८८ व नोटिशीचा खर्च रु. ८ येकूण ३९६ तुह्मापासून घेतले जाऊन फिर्या[illegible] खर्चासुद्धां रुपये घेतले जातील. तु[illegible] मी घर गहाण दिलेंच नाहीं तेव्हां ला[illegible] कोठून होणार हें तुम्ही जाणतच आ[illegible] तारिख २० माहे फेब्रुवारी सन १८७[illegible]

(सही) नारायण गुणाजी, ता[illegible]

नोटिस—गणेशदास निवराज [illegible]त ब्राह्मण पोखरणी हल्लीं वस्ती खा[illegible]व यांस खालीं सही करणार नोटिस [illegible] कीं, तुह्मांकडे खामगाव दुकानची [illegible]म रुपये २००० व शिवाय व्याज [illegible] आहे याबद्दल मागांव तेव्हां देऊं दि[illegible] असें सांगत असोन देत नाहीं यास्त[illegible]ल्लीं शेवट या नोटिशीनें मागणें केलें आहे तर वर लिहिल्याप्रमाणें व्याजासह [illegible] पासून १५ दिवसांचे आत हिशोबा[illegible] करते रुपये आणून द्यावें नाहीं त[illegible] रस्तेप्रमाणें फिर्याद केली जाईल य[illegible] खर्च तुह्मांस द्यावा लागेल कळावें [illegible]ख २२ माहे फेब्रुवारी सन १८७३

(सही) श्रीराम शाळीग्राम [illegible] खामगाव दस्तुर माधव गु[illegible]

नोटिस—महादु वल्लद गोविं[illegible]णी राहणार आसलगाव तालुके ज[illegible] यास खालीं सही करणार याज[illegible] नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मी गेले [illegible]गुन मार्शी जवारीचा सवदा पेवपत्री [illegible] १९ प्रमाणे रुपये १७७ चा करोन [illegible] ह्मांस दाखवून दिलें या सदरहूचे [illegible] बद्दल चैत्र मासीं तुह्मी देण्याचा कर[illegible]रोन आजवर दिलें नाहीं तर आठ दि[illegible] व्याजासह रुपये दाखल करावे न के[illegible] शिरस्त्याप्रमाणें कोर्ट खर्चासुध्धां [illegible]ण्याची तजवीज केली जाईल कळा[illegible] २१ माहे फेब्रुवारी सन १८७३ इ०

(सही) सदासुक जैसीराम वहिव[illegible] रामलाल मुरली[illegible]

हें पत्र अकोलें येथें खंडेराव वाळ[illegible]डके यांचे वऱ्हाडसमाचार छा० छा[illegible]

Re gistered No4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ९ मार्च सन १८७३ इ० | अंक १०

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ८४ |

डाकहांशील

गरीब रयत लोकांसच मात्र नाहीं, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे! सरकारास प्रजा व स्वतःचे कैदीलोक सारखे आहेत. सरकारानें रयत सुखी होण्याकरितां व हरएक संकटापासून तीस बचाव व्याकरितां पोलिस वगैरे लोकांस नोकर ठेविले आहेत. त्यांत विशेषेकरून पोलिस लोकांस देशांत स्वस्थता राखण्याकरितां नेमिले आहेत. ते लोक गावांतील गरीब लोकांवर नहिर्दिशेस न नसण्याचे फर्मावितात व आपण हुकुमाविरुद्ध वागतात. तर त्या लोकांच्या वरिष्ठ अमलदारांनीं या वरील गोष्टीवर लक्ष्य देऊन त्यास मना करावें व सर्व लोकांसही ताकीद द्यावी ह्मणजे गावांतील लोक सुखी होऊन त्यांची कीर्ति गातील. व सर्व

लोकांवर त्यांचे मोठे उपकार होतील. ते विसरणार नाहींत. ह्मणून वरिष्ठ अमलदार या वरील गोष्टीवर लक्ष्य ठेवतील व अशी तजवीज करतील तर बरें होईल. कळावें तारिख ७ माहे मार्च सन १८७३

आपला एक गरीब
"क्ष"

क्रम पाहून बस, बस ह्मणाले तरी त्या संकासुरानें एक शिपटचा धक्का इतके जोरानें मारला कीं तेणेंकरून तीस मूर्च्छना येऊन ती सडकेचे गटारांत पडली. व तिच्यानें उठवेना. तरी त्या जवानानें तिचा हात धरून फरफर ओढीत आपले चौकीनजीक तिला आणलें व तेथें त्या सर्वांनीं आणली तीस कांहीं धमक्या व शिव्या देऊन हाकून दिलें. नंतर ती बिचारी रडतच आपले घराकडे गेली. आमचे जवळ एक गृहस्थ उभे होते, त्यास आह्मी पुसलें कीं ह्या बिचारीस इतकी शिक्षा भोगण्याचें कारण तरी काय? त्यांनीं सांगितलें कीं ही रस्त्यानें येत असतां हिनें विकत घेतलेलें मांस खालीं पडलें व कोणीं लुच्चानें त्या जवानापाशीं सांगितलें कीं ही लोकांस बाटविण्याकरितां मांस

रस्त्यानें सांडिलें. इतकें त्या जवानानें ऐकिलें आणि वर लिहिलेला बुक्यांचा व सोट्यांचा मार तिला दिला. अहाहा! असेंच असेल तर ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. व पोलिसापासून रयतेस मोठी पीडा होते असें ह्मणणें यावरून भाग पडेल.

वाशिम जिल्ह्याचे पोलिस वरिष्ठ अधि... ...क्ष्य देतील तर फार ...

...ख ७ माहे फेब्रुवारी ...ी.

एक मुशाफर.

...समाचार कर्ते यास,
...आपल्या मागल्या अंकांत या ...ास जागा द्यावी.
...पहिल्याप्रतीच्या लोअर क्लां... ...ज्या यत्तेपर्यंत अभ्यास असा ...होता, परंतु आतां सहाव्या ...असावा असा हुकूम ह्मा... ...यत्तेला सहा आणे ...आहे. आतां चार आ... ...ाचीच पंचाईत आहे, ...ठून उत्पन्न होणार? ह्मा... ...चार आणे फी घेण्या... ...भेकाजी बी. ए, डे. ...धिकाऱ्यांस सुचवून त... ...मुलांची अडचण दू... ...सोईचें पडेल.

...ील अढाणी गांवठी पं... ...न उत्तेजन मिळतें. तेणें ...केतीएक शाळांची खरा... ...आहे. कारण कीं वऱ्हा... ...लोकांस सरकारी शाळे... ...सापासून काय लाभ होतात ...नाहीं, ह्मणून सरकारांतून ...ळी मास्तरास मदत न मिळ... ...विक सुशिक्षित कांहीं गावठी ...तील त्यांस मात्र मदत मिळा... ...रकारचा उत्तम विद्यादानाचा ...योग शेवटास जाऊन सरकारीशा... अडचण येणार नाहीं.

पुणें शहरांत नानागोखल्यांच्या शाळेसारख्या हायस्कुला बरोबरीच्या ज्या शाळा आहेत त्यांस मात्र सरकारांतून मदत मिळते, परंतु त्याच शहरांत गल्लोगल्लीं ज्या शाळा आहेत त्यांस सरकारांतून मदत मिळाल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं.

ह्या योग्य सूचनेकडेस मे० श्रीराम भिकाजी लक्ष्य पुरवून जर वरिष्ठांस सुचवितील तर चांगली व्यवस्था होऊन सरकारी शाळा चांगल्या चालतील.

मे० श्रीराम भिकाजी हे मोठे विद्वान असून विद्वत्तेचे मुख्य लक्षण जो शान्त स्वभाव तो अद्वितीय याच ठिकाणीं वास करीत आहे. थोडक्यांत सर्व विषयांची चाचणी पाहून उत्तम परीक्षा घेण्याची शैली जाणणारे ह्यांसारखे थोडकेच परीक्षक असतील.

पत्रकर्ते महाराज लेखन विस्ताराचा

राग नसावा लोभ असावा ही विनंती.

एक सद्व्यवस्थेच्छु.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस:—

वि० वि० मी ह्या वऱ्हाडांत हमेशा फिरत असतों मोर्तिजापुर तालुक्यांतील रस्ते चांगले ह्मणून इकडे आलों तेव्हां ह्या तालुक्यांतील धनज हा गाव पहाण्याचे हेतूनें निघालों तो १९ फेब्रुवारी रोजीं अस्तमानीं एथें पोहोंचलों. मी हें पाहिलें होतें तेव्हां अगदीं गलिच्छ होतें आणि आतां हें स्वच्छ असून रस्ते देखील पहिले नाहींत असें दिसलें तेव्हां तेथें मुलगा होता त्याला विचारतां तो ह्मणाला महाराज पहिले दिवस गेले, सुमारें पंधरा दिवसांपासून या गावास एक नवीन चीफ कानस्टेबल सरकारानें नेमिले आहेत. त्यांच्या श्रमाचीं हीं फळें होत. हे गृहस्थ सर्व सुखोपभोगाचा त्याग करून रात्रंदिवस सरकारी काम सरकारचे हेतूप्रमाणें करणें व लोकोपयोगी कामें करणें ह्यांतच गढलेले असतात. नंतर शाळेंत गेलों. तेथे खर्च्यांवरून लोक बसले नव्हते फक्त मेहेरबान बापुजी रंगनाथ ए० अ० कमिशनर कोर्ट कारंजे हे अध्यक्ष स्थानीं असून तमासगीर लोकांचा समाज जमला होता. तेव्हां ती मौज पहाण्याकरितां मी अमळ उभा राहिलों. इतक्यांत कांहीं मुलें पुस्तकें घेऊन खुर्चीवर बसलेल्या गृहस्थासमोर गोलाकृति उभीं राहिलीं नंतर परीक्षा सुरू झाली त्यांनीं तीन चार वर्गांची परीक्षा घेतली. मुलांनीं मराठींत फार चलाखीनें उत्तरें दिलीं त्यांत तीन मुलांचीं मराठीचीं उत्तरें ऐकून मला मोठा अचंबा वाटला व चित्तास आनंद झाला. ही शाळा मी पूर्वीं पाहिली होती त्यावेळेच्या गावच्या स्थितीस शोभत होती परंतु आतां तिची स्थिति बाहेरच्या सांप्रतचे स्थितीप्रमाणें दिसली; व विद्यार्थ्यांची संख्याही त्या वेळच्या संख्येच्या दुप्पट आहे असें समजलें त्यावरून ह्या शाळेंतील मास्तर, शंकर पांडुरंग सबडकर हे आपलें काम मोठ्या आस्थेनें करित असून लोकप्रिय असावे असें अनुमान केलें व तें जनमुखानें खरें ठरलें. परीक्षा अटोपल्यावर बापु साहेब यांनीं लोकांनीं आपलीं मुलें शाळेंत पाठवावीं ह्या विषयीं बोधपर सुरस भाषण करून व थोरे बुंकांत उत्तम दोरा लिहून सभा विसर्जन झाली. ह्यावरून त्यांची विद्यालयास किती मदत आहे हें वाचकांस सहजच समजेल. बापु साहेब हे फार सद्गुणी आणि मेहेनती असल्याचें सर्वांचे मुखें ऐकतों. परमेश्वर कृपेनें जर हे कांहीं दिवस राहतील तर ह्या तालुक्याचा ऊर्जितकाळ खचित होईल असें अनुमान करण्यास कांहीं मात्र हरकत नाहीं. कळावें

"एक मुशाफर"

## पुरवणी वऱ्हाडसमाचार—नोटिसा

तारिख ३ माहे मार्च सन १८७३ इसवी

...टिस—नापु वल्लद रामाजी भरडभु... ...ळापुरकर हल्लीं वस्ती खामगाव ...तुळशी मर्द बापु इजकडून नोटिस ...येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा ...९ वर्षें झालीं मला पोटास न देतां ...तिकडे जा व आपलें पोट भर ...सांगितलेंस त्याप्रमाणें मी बायको... ...गोल मजूरी करून आजवर पोट भरलें ...ही जिनगानीही जमविली असें ...ती माझी जिनगी तूं आपली ...सरकारमार्फत एका सावकाराचे ...दारींत जप्त करून नेली. व आपला ...तुटलेला असतां खोटे साक्षीदार ...न संबंध दाखविला व मला दिवाण... ...ारसंबंधी सुमार ६० ६० खर्चाचे पेंचांत ...णिलेस. व ५० रुपये पहिले एका ...काराचे मला कर्ज देणें आहे मिळून ...० रुपये झालें आहे. व तूं मला ...ाला कांहीं न देतां लग्नसंबंधाचा हक्क ...खवितोस तेणेंकरून माझा उपासमारा... ...णार आहे. याजकरितां तुला या नोटिसीनें कळवितें कीं कर्जदारीचे रुपये ...० ... द्यावे. व मला अन्नवस्त्र लागेल ...पैसा बद्दल तिऱ्हाईत भले ...ची खात्री द्यावी. व हें तुझ्यानें ...नसेल तर नोटिस पोंचल्यापासून ८ ...वसांचे आंत सोडचिठी द्यावी. तसें न करशील तर तुझा लग्नाचा हक्क रद्द करण्याची तजवीज करीन व नंतर दुसरे कोणाशी गंधर्व करीन अथवा मी आपले इच्छें प्रमाणें वागेन व सदरील १०० रुपये तुजवर फिर्याद करून भरून घेईन. कळावें. तारिख ३ माहे मार्च सन १८७३ इ.

[सही] तुळशी मर्द नापु बाळापुरकर इचे हातची निशाणी बांगडी.

नोटिस—मनाजी भेळकर जात माळी राहणार साउर तालुके उमरावती याशी खालीं सहीकरणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझा लेक जयराम वल्लद मनाजी भेळकर राहणार मजकूर याजला माझी बहीण दिली लग्न झाल्यास १० वर्षें झालीं तेव्हांपासून माझी बहीण माझे घरीं आहे तुह्मी नेली नाहीं दरम्यान जयराम वल्लद मनाजी हा माझे घरीं येत असे तेव्हां त्याचे पोटची एक मुलगी आहे आतां सदरहू इसम हमेशा दारू पितो सबब ता जातीबाहेर आहे तर माझे दहा वर्षांचे पोटखर्चाबद्दल रुपये देऊन फारकती द्यावी याप्रमाणें आपण आठ दिवसांचे आंत न केल्यास शिरस्त्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल ही नोटिस रजिष्टरची असे कळावें तारिख २८ माहे फेब्रुवारी सन १८७३ इ.

(सही) गउल्या बापुजी माळी राहणार साउर तालुके मजकूर.

अकोला व० स० छा० छा०

Registered No 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० ९ मार्च सन १८७३ इ० | अंक १०

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### जाहिरात

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र.

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थानीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ०६ आणे व डाकहाशील ०१

गनकरणाचे औषधाच्या डब्या किंमत ०१ आणे. थंड पाण्यांत भिजवून गंधाप्रमाणें झाल्यावर उटीसारखें लावावें.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या हातास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—वि.वी.

कांहीं दिवसांपूर्वी मौजे धनज तालुके मूर्तिजापुर जिल्हा उमरावती येथें गावाच्या नजीक किती एक लोक बहिर्दिशेस जात होते परंतु अलीकडे नवीन चीफ कान्स्टेबल यांनीं तेथें बहिर्दिशेस जाण्यास मना केलें. ह्मणून तेव्हांपासून लोक त्यास दुवा देतील. परंतु या ठिकाणीं पोलिस नोकरास कैदीस बहिर्दिशेस नेण्याची व लोक बसविण्याची परवानगी आहे. व गरीब रयत लोकांसच मात्र नाहीं, ही किती आश्चर्याची गोष्ट आहे! सरकारास प्रजा व स्वतःचे कैदीलोक सारखे आहेत. सरकारानें रयत सुखी होण्याकरितां व हरएक संकटापासून तीस बचाव व्याकरितां पोलिस वगैरे लोकांस नोकर ठेविले आहेत. त्यांत विशेषेकरून पोलिस लोकांस देशांत स्वस्थता राखण्याकरितां नेमिले आहेत. ते लोक गावांतील गरीब लोकांवर बहिर्दिशेस न बसण्याचे फर्मावितात व आपण हुकुमाविरुद्ध वागतात. तर त्या लोकांच्या वरिष्ठ अमलदारांनीं या वरील गोष्टीवर लक्ष्य देऊन त्यास मना करावें व सर्व लोकांसही ताकीद द्यावी ह्मणजे गावांतील लोक सुखी होऊन त्यांची कीर्ति गातील. व सर्व लोकांवर त्यांचे मोठे उपकार होतील. ते विसरणार नाहींत. ह्मणून वरिष्ठ अमलदार या वरील गोष्टीवर लक्ष्य ठेवतील व अशी तजवीज करतील तर बरें होईल. कळावें तारिख ७ माहे मार्च सन १८७३

आपला एक गरीब

"क्ष"

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.—

वि० वि० आपल्या सुंदर पत्रीं खालीं लिहिलेल्या चार ओळीस जागा मिळेल या हेतूनें पाठविल्या आहेत तर मेहेरबानगी करून प्रसिद्ध कराव्या.

मी तारिख ७ रोजीं हैदराबादेकडून फिरत फिरत मंगरूळ पीर एथें दोन प्रहराचे ३ वाजण्याचे सुमारास मुक्कामास गेलों. पुढें जावयाचे होतें परंतु येथें पिराचें फार नामांकित संस्थान आहे असें कित्येक गृहस्थानीं सांगितल्या वरून येथेंच राहाण्याचा निश्चय केला. उतरण्यास नवीन बांधलेली चावडी फार सोयवार आहे असें लोकांनीं सांगताच तेथें जाऊन उतरलों. चावडी नवीनच बांधलेली असून पुढें चे बाजूस कांहीं फुलझाडेहि लाविलेलीं आहेत. तिच्या पुढून एक दक्षिणोत्तर सडक गांवांत जाते आणि तिच्या नजीकच टौन पोलिसाची चौकी, पोलीसस्टेशन व सरकारी शाळा आहे. बिऱ्हाड वगैरे लाविल्या नंतर पिराचे दर्शनास गेलों. संस्थानाची जागा फार प्राचीन काळची बांधलेली असून किल्ल्याप्रमाणें उंच आहे. फकीर लोकांस उतरण्यास सरायी बांधलेल्या आहेत. संस्थानास चौघडा वगैरे सामान आहे. येकंदरींत त्या संस्थानाचा देखावा पाहून माझें मन संतुष्ट झालें. तेथून निघून बिऱ्हाडी आलों तों सुमार साडेपांच वाजले होते व जरा श्रम वाटले ह्मणून विश्रांती करितां त्या फुलझाडांत जाणारे येणारे लोकांची मजा पहात बसलों. इतक्यांत एक पोलिसचा जवान एका तरुण स्त्रीस बुक्के व सोटे मारितच घेऊन टौन पोलीसाचे चौकी नजीक येत असलेला दिसला. इतक्यांत चौकीवरील जवान तें कृत्य पाहून बस, बस ह्मणाले तरी त्या संकासुरानें एक शेवटचा धक्का इतके जोरानें मारला कीं तेणेकरून तीस मूर्च्छना येऊन ती सडकेचे गटारांत पडली. व तिच्यानें उठवेना. तरी त्या जवानानें तिचा हात धरून फरफर ओढीत आपले चौकीनजीक तिला आणलें व तेथें त्या सर्वांनीं आणली तीस कांहीं धमक्या व शिव्या देऊन हाकून दिलें. नंतर ती बिचारी रडतच आपले घराकडे गेली. आमचे जवळ एक गृहस्थ उभे होते, त्यास आह्मी पुसलें कीं ह्या बिचारीस इतकी शिक्षा भोगण्याचें कारण तरी काय? त्यांनीं सांगितलें कीं ही रस्त्यानें येत असतां हिनें विकत घेतलेलें मांस खालीं पडलें व कोणीं लुच्चानें त्या जवानापाशीं सांगितलें कीं ही लोकांस बाटविण्याकरितां मांस रस्त्यानें सांडित्ये. इतकें त्या जवानानें ऐकिलें आणि वर लिहिलेला बुक्यांचा व सोट्यांचा मार तिला दिला. अहाहा! असेंच असेल तर ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. व पोलिसापासून रयतेस मोठी पीडा होते असें ह्मणणें यावरून भाग पडेल.

वाशिम जिल्ह्याचे पोलिस वरिष्ठ अधिकारी याजकडे लक्ष्य देतील तर फार चांगलें होईल.

मंगरूळ पीर तारिख ७ माहे फेब्रुवारी सन १८७३ इसवी.

एक मुशाफर.

मे० वऱ्हाडसमाचार कर्ते यास,

विनंती वि. आपल्या येत्या अंकांत या उपयुक्त मजकूरास जागा द्यावी·

वऱ्हाडांतील पहिल्याप्रतीच्या लोअर स्कॉलसकूलांत पांचव्या यत्तेपर्यंत अभ्यास असावा असा हुकूम होता, परंतु आतां सहाव्या यत्तेपर्यंत अभ्यास असावा असा हुकूम झाला आहे. सहाव्या यत्तेला सहा आणे फी घेण्याचा हुकूम आहे. आतां चार आणे फी उत्पन्न होण्याचीच पंचाईत आहे, मग सहा आणे कोठून उत्पन्न होणार? ह्मणून सहाव्या यत्तेला चार आणे फी घेण्याविषयीं मे० श्रीराम भिकाजी बी. ए, डे. ए. इ. हे जर वरिष्ठ अधिकाऱ्यांस सुचवून तजवीज करितील, तर मुलांची अडचण दूर होऊन मास्तरास सोईचें पडेल.

असेंच वऱ्हाडांतील अडाणी गांवठी पंतोजीस सरकारांतून उत्तेजन मिळतें. तेणेंकरून सरकारी कितीएक शाळांची खराबी होत चालली आहे. कारण कीं वऱ्हाडांतील अडाणी लोकांस सरकारी शाळेंतील विद्याभ्यासापासून काय लाभ होतात यांचा अनुभव नाहीं, ह्मणून सरकारांतून अडाणी गावठी मास्तरास मदत न मिळतां जे वास्तविक सुशिक्षित कांहीं गावठी पंतोजी असतील त्यांस मात्र मदत मिळाल्यास सरकारचा उत्तम विद्यादानाचा स्तुत्य उद्योग शेवटास जाऊन सरकारी शाळांत अडचण येणार नाहीं.

पुणें शहरांत नानागोखल्यांच्या शाळेसारख्या हायस्कुला बरोबरीच्या ज्या शाळा आहेत त्यांस मात्र सरकारांतून मदत मिळते, परंतु त्याच शहरांत गल्लोगल्लीं ज्या शाळा आहेत त्यांस सरकारांतून मदत मिळाल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं.

ह्या योग्य सूचनेकडेस मे० श्रीराम भिकाजी लक्ष्य पुरवून जर वरिष्ठांस सुचवितील तर चांगली व्यवस्था होऊन सरकारी शाळा चांगल्या चालतील.

मे० श्रीराम भिकाजी हे मोठे विद्वान असून विद्वत्तेचे मुख्य लक्षण जो शान्त स्वभाव तो अद्वितीय याच ठिकाणीं वास करीत आहे. थोडक्यांत सर्व विषयांची चाचणी पाहून उत्तम परीक्षा घेण्याची शैली जाणणारे ह्यांसारखे थोडकेच परीक्षक असतील.

पत्रकर्ते महाराज लेखन विस्ताराचा राग नसावा लोभ असावा ही विनंती.

एक सद्व्यवस्थेच्छु.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस:—

वि० वि० मी ह्या वऱ्हाडांत हमेशा फिरत असतों मोंर्तिजापुर तालुक्यांतील रस्ते चांगले ह्मणून इकडे आलों तेव्हां ह्या तालुक्यांतील धनज हा गाव पहाण्याचे हेतूनें निघालों तो १९ फेब्रेवारी रोजीं अस्तमानीं एथें पोहोचलों. मी हें पाहिलें होतें तेव्हां अगदीं गलिच्छ होतें आणि आतां हें स्वच्छ असून रस्ते देखील पहिले नाहींत असें दिसलें तेव्हां तेथें मुलगा होता त्याला विचारतां तो ह्मणाला महाराज पहिले दिवस गेले, सुमारें पंधरा दिवसां पासून या गावास एक नवीन चीफ कानस्टेबल सरकारानें नेमिले आहेत. त्यांच्या श्रमाचीं हीं फळें होत. हे गृहस्थ सर्व सुखोपभोगाचा त्याग करून रात्रंदिवस सरकारी काम सरकारचे हेतूप्रमाणें करणें व लोकोपयोगी कामें करणें ह्यांतच गढलेले असतात. नंतर शाळेंत गेलो. तेथें खुर्च्यांवरून लोक बसले नव्हते फक्त मेहेरबान बापुजी रंगनाथ ए० अ० कमिशनर कोर्ट कारंजे हे अध्यक्ष स्थानीं असून तमासगीर लोकांचा समाज जमला होता. तेव्हां ती मौज पहाण्याकरितां मी अमळ उभा राहिलों. इतक्यांत कांहीं मुलें पुस्तकें घेऊन खुर्चीवर बसलेल्या गृहस्थासमोर गोलाकृति उभी राहिलीं नंतर परीक्षा सुरु झाली त्यांनीं तीन चार वर्गांची परीक्षा घेतली. मुलांनीं मराठींत फार चलाखीनें उत्तरें दिलीं त्यांत तीन मुलांचीं मराठीचीं उत्तरें ऐकून मला मोठा अचंबा वाटला व चित्तास आनंद झाला. ही शाळा मी पूर्वी पाहिली होती त्यावेळेच्या गावच्या स्थितीस शोभत होती परंतु आतां तिची स्थिति बाहेरच्या सांप्रतचे स्थितीप्रमाणें दिसली; व विद्यार्थ्यांची संख्याही त्या वेळच्या संख्येच्या दुप्पट आहे असें समजलें त्यावरून ह्या शाळेंतील मास्तर, शंकर पांडुरंग सासवडकर हे आपलें काम मोठ्या आस्थेनें करित असून लोकप्रिय असावे असें अनुमान केलें व तें जनमुखानें खरें ठरलें. परीक्षा अटोपल्यावर बापु साहेब यांनीं लोकांनीं आपलीं मुलें शाळेंत पाठवावीं ह्याविषयीं नोधपर सुरस भाषण करून व हारे बुंकांत उत्तम हारा लिहून सभा विसर्जन झाली. ह्यावरून त्यांची विद्याखात्यास किती मदत आहे हें वाचकांस सहजच समजेल. बापु साहेब हे फार सद्गुणी आणि मेहेनती असल्याचें सर्वांचें मुखें ऐकतों. परमेश्वर कृपेनें जर हे कांहीं दिवस राहतील तर ह्या तालुक्याचा ऊर्जितकाळ खचित होईल असें अनुमान करण्यास कांहीं मात्र हरकत नाहीं. कळावें

"एक मुशाफर"

वऱ्हाडसमाचार

मिति फाल्गुन शुद्ध ११ शके १७९४

# वऱ्हाडच्या विद्याखात्याचा रिपोर्ट.

नार्मलस्कुलें. नार्मल स्कुलांकरितां खर्च ६१२० रुपये आहे. या शाळांचें काम बरें चाललें आहे. दोन्ही मास्तर व त्यांत विशेषें हिंदुस्थानी मास्तर हुशार आहेत. गावठी शाळा सुधारण्याकरितां त्यांतील मास्तर या स्कुलांत शिकण्यास येण्याचे कामीं डि० इन्स्पेक्टरांनीं काळजी घ्यावी. नार्मलस्कुलांतील दोन्ही परीक्षा पास झाल्या तरी दोन वर्षांहून अधिक काल पावेतों या स्कुलांतील विद्यार्थी पगार खाल उगीच पडून राहिले व वीस रुपयांच्या आणि दहा रुपयांच्या मास्तराच्या जागा त्यांस देत असतां त्यांनीं पतकरल्या नाहींत अशी वहिवाट यापुढें न राहावी ह्मणून तजवीज ठेविली आहे.

मुलींच्या शाळा—या वर्षांत मुलींच्या नवीन शाळा कांहीं झाल्या नाहींत. मराठी १७ व हिंदुस्थानी १० मिळून २७ शाळा आहेत. या बिलकुल चांगल्या चालत नाहींत. मास्तर लोक आपल्या पगाराच्या फायद्या करितां मुली शाळेत येत नसल्या तरी त्यांची हजीरी भरीत असतातें व खोटे तक्ते पाठवितात. शाळेंत जाऊन पाहिले असतां त्यांनीं हजीरी भरली त्याच्या निमेही मुली हजर नसतात. मुलींनां फी कांहीं द्यावी लागत नाहीं ह्मणून तसें करणारांचे पदरास कांहीं खार लागत नाहीं. दुसरें, ज्या मुली शाळेंत येत असतांत त्यांस कांहीं र ट फ येऊं लागलें न लागलें तोंच त्या शाळा सोडितात त्यामुळें या शाळांतून विद्याभ्यास होत नाहीं. लोकांकडून निमी मदत मिळावी ती चांगली मिळत नाहीं. अकोला, चांदूर, आणि वरुड येथील मुलींच्या शाळा फारच वाईट आहेत व अशाच दुसऱ्या बहुत असतील. परीक्षक येणार असले ह्मणजे मास्तर मुली गोळा करतात; नाहींपेक्षां ४।५ मुलींवर शाळा चालते व क्वचित् मास्तरची स्वताची मुलगीच एकटी विद्यार्थी असून शाळेचें काम चालत असतें. खामगावची मुलींची शाळा तशाच छावणी इलिचपुर व उमरावती येथील शाळा चांगल्या आहेत. व वाशिम, अकोट आणि बाळापुर येथील शाळा चांगल्या नाहींत. वऱ्हाडांत मुलांच्या शिक्षणाचे कामींदेखील अजून लोकांची भक्ति नाहीं मग स्त्री शिक्षणावर कोठून असेल? असणार नाहीं हें उघड आहे. लीवार्नर साहेबाचा अभिप्राय आहे कीं, मुलींच्या शाळा या मुलींच्या विद्याभ्यासाकरितां नसून गरीब. ह्मातार्‍या व दुबळ्या मास्तरलोकांचे प्रपंच चालविण्याकरितां आहेत.

खासगी शाळा—यवतमाळास ख्रिस्तीलोकांचे मुलांकरितां सन १८७० रांत एक इंग्लिश शाळा स्थापन झाली होती व तिला सरकारांतून मदत (ग्राटस् इन एड) मिळत होती, पण सन १८७१ चे जून महिन्यांत ती शाळा बंद झाली. लिवार्नर साहेबांचा अभिप्राय आहे कीं, वऱ्हाडांत ख्रिस्ती व युरेशियन लोकांच्या मुलांस विद्याभ्यासाकरितां एका मोठ्या शहरांत स्वतंत्र शाळा असावी. अकोल्यास व उमरावतीस फ्रीचर्च मिशनपैकीं रेवरेंड सिदोबा बापुजी मिसाळ यांनीं दोन शाळा मांडल्या आहेत. अकोल्याच्या शाळेंत ४४ मुलें आहेत त्यांत ख्रिस्ती ७ व धेडांचीं ३७ आहेत. या शाळांनां पुढील वर्षीं सरकारी मदत मिळेल असें आहे.

गावठी शाळा—उमरावतीस १ व कारंजास १ अशीं दोन गावठी शाळा येथें आढळल्या. एकींत ८० मुलें होतीं. त्या शाळेंत मोडी लिहिणें व वाचणें चांगलें चालत असल्याचें दिसून आलें. यवतमाळ जिल्ह्यांत घांटे येथें असलेली सरकारी शाळा बंद झाली तेव्हां तेथील पाटलानें गावठी मास्तर २० रुपये पगारावर आपल्या दोन मुलांकरितां ठेविला. ली वार्नर साहेब ह्मणतात कीं गावठी मास्तर अविद्वान, अर्ध कच्चे, व गरजु असे ब्राह्मण, कुणबी, किंवा तेली असतात. त्यांना मोलमजूरी करण्याची किंवा भिक मागण्याची लाज वाटते, ह्मणून ते मुलांच्या बापानां थापा देऊन शाळा मांडतात व सरकारांतून मदत मिळण्याचा बूट निघाल्यानें तर गावठी शाळांचें फारच वेड पिकल्या सारखें झालें आहे. गावठी मास्तर मुलांच्या हजीरीचे तक्ते पाठवितात ते खरे नसतात; कारण ते रजिष्टर बुकें मुळींच बाळगीत नाहींत. आणि गावांत असल्या नसल्या सर्व मुलांची नावनिशी भरून देतात. शाळेंत जाऊन पहावें तों टिपणांत लिहिल्याच्या निमेही मुलें हजर नसतात. या वर्षीं खरपडामुळें सरकारी शाळांतूनही मुलांची संख्या कमी झालेली असतां गावठी शाळांत मुलांची वृद्धी आहे ह्मणतात तेव्हां हें ऐकण्यास देखील विलक्षण नव्हे काय? असो या वर्षीं गावठी शाळा १८४ व त्यांत मुलें ३३९६ आहेत असें त्यांचे पत्रका वरून कळतें. दर जिल्ह्यांत गावठी शाळा ज्या आहेत त्यांतून सुमार २५ चांगल्या निवडाव्या व त्यांस रजिष्टर बुकें व इकडील खात्याची माहिती देऊन त्या सुधाराव्या व त्यांची परीक्षा घेऊन त्यांस मदत द्यावी, असें केलें असतां चांगलें होईल. गावठी मास्तर नार्मलस्कुलांत जाऊन ६ महिने विद्याभ्यास करितील तर ते आपलें काम चालविण्यास उत्तम शक्तिमान होतील व त्यांचे जाग्यावर ते परत येईत तोंपर्यंत नार्मलस्कुलांतील लोक पाठविले जातील. व गावठी मास्तर शिकत असतां त्यांस स्कालरशिप्स मिळतील असें आहे, सबब या गोष्टीची माहिती गांवोगाव लोकांस होईल असें डिपुटी इन्स्पेक्टरांनीं अवश्य करावें.

बुकडिपो—शाळाखात्याच्या संबंधानें बुकविक्रीचीं दुकानें ४९ आहेत व अकोल्यास त्याचें मुख्य ठाणें आहे. त्यावर मि० वामन कृष्ण देशमुख हे क्युरेटर आहेत. ते हुशार असून आपलें काम तत्परतेनें करितात. यांनां १०० रुपये पगार आहे त्यांच्या आफिसाचा खर्च १०० रुपये व कांटिंजेंट १५ रुपये महिना आहे. या सालीं विकण्याकरितां बुकें घेण्यात २७०० रुपये, शाळांच्या बक्षिसाकरितां १०० रुपये, कांपिटिटिव्हच्या बक्षिसा करितां ५०० रुपये, व नकाशा करितां १००० रुपये मिळून सुमार ७७८० रुपयांचे सांगशन होतें त्यांपैकीं ४७७६ रुपये मात्र खर्च झाले. साल मजकुरची रकम तिमस्त सालापेक्षां १००००नीं कमी होती तरी रेसिडेंट साहेबांनीं फर्मास केली होती कीं, काटकसरीनें हा पैसा खर्चावा. शिलकी बुकांत मोठ मोठाल्या किमतीचीं पुष्कळ पुस्तकें पडून राहिलीं आहेत हें वाईट आहे. तसेंच बक्षिसाच्या रकमेचें सांगशन या वर्षीं थोडें केलें हेंही वाईट आहे. शाळांमधून लायब्रऱ्या आहेत त्यांनां पुस्तकें देणें फार उपयोगाचें आहे याసालांत पुस्तकें ५७५७ रुपयाची खपलीं व १२५ रुपयांचीं नवीन विकत घेतलीं. शिलक पुस्तकें २११०२ रुपयांचीं आहेत. त्यांत १४३१२ रुपयांचीं बाहेर व ६७९० रुपयांचीं अकोल्यास आहेत. बुक डिपोच्या सुरवातीपासून या सालापर्यंत ३९६६९ रुपये सरकारांतून घेतले व आंतुन २०४०३ रुपये परत सरकारांत भरले. इंग्रजी, मराठी, व उरदु नकाशे६६३४रुपयांचे घेतले आहेत. वऱ्हाडप्रांताच्या नकाशाच्या २५० इंग्रजी प्रती विकत घेऊन लोअर क्लास स्कुलांनां दिल्या आहेत. त्यामुळें त्या शाळांच्या भिंतीस कांहीं शोभा आली आहे इतकेंच, बाकी त्यांपासून कांहीं उपयोग दिसत नाहीं. वऱ्हाडच्या चतुःसीमाही मुलांत चांगल्या सांगतां येत नाहींत. दारव्हे तालुक्यांतील तारनोळीच्या मास्तरानें लीवार्नर साहेबाना सांगितलें कीं, वऱ्हाड प्रांत निझाम हैदराबादच्या उत्तरेस आहे! न तें नाहीं ह्मटलें असतां तो आपली गोष्ट खराच वेळ प्रतिपादवत होता हें आश्चर्य आहे!

नार्मलस्कुलाकडे आठ व सहा रुपयांच्या ६० स्कालरशिप्स आहेत. हाय स्कुलाकडे सहा व पांच रुपयांच्या ३५ स्कालरशिप्स आहेत. मराठी व हिंदुस्थानी भाषेच्या उत्तेजनाकरितां दहा दहा रुपयांच्या दहा स्कालरशिप्स आहेत व इकडील हायस्कुलांतील जे विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनमध्यें पास होऊन कालेजांत शिकावयास जातील त्यांस स्कालरशिप्स देण्याची तजवीज योजिलेली आहे. तसेच देशभाषेंत नवीन ग्रंथ करण्यास उत्तेजन देण्यासाठीं प्राइज कमिटी वऱ्हाडांत आहे. तिजपुढें ग्रंथ आणणारे बहुतेक स्कुलमास्तर आहेत. व ते ठरविलेल्या विषयांवरच ग्रंथ लिहितात असें नाहीं. शाळांसंबंधी पद्धती, गणित, नाटकें, अशा प्रकारचीं पुस्तकें झालीं आहेत व त्यांस बक्षिसें मिळालीं आहेत.

याप्रमाणें लीवार्नर साहेबांनीं लिहिलेल्या शाळाखात्याच्या रिपोर्टांतील तात्पर्य आहे.

---

# मद्यप्राशनाचा परिणाम व त्यावरून सूचना.

[ लिहून आलेला मजकूर ]

ह्या सृष्टींत प्रत्येक वस्तु पाहून तिची उत्पत्ती, तिचा उपयोग आणि तिजपासून होणारे परिणाम यांचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां सृष्टिकर्त्याचें चातुर्य्य कमाल आहे, व त्याची योजना मोठी चमत्कारिक आहे, असें दिसून येतें.

आपण साधारण विचार करित असतां असें ह्मणतों कीं, प्रत्येक वस्तु उत्पन्न होण्यांत कांहीं हेतु आहे व सृष्टीचा व्यापार चालण्यास त्या वस्तूची जरूर आहे ह्मणूनच ती उत्पन्न केली आहे अथवा झाली आहे. परंतु आपले विचार यांकीत पुढें चालविले तर तत्क्षणींच असें दिसून येतें की, नानाविध वस्तु निष्कारणिक उत्पन्न झाल्या आहेत. उदाहरणार्थ विषारी प्राणी, कंटक वृक्ष, इत्यादि.

आतां ह्या ठिकाणीं सृष्टी निर्माणकर्त्याचा मनोगत जो हेतु तो आपल्या समजत नाहीं असें ह्मणावें किंवा बाकी कांहीं वस्तु निष्कारणिक उत्पन्न झाल्या आहेत असें ह्मणावें याचा विचार आहे. आह्मी ह्मणतों जगांत जितक्या वस्तु व जितके प्राणी उत्पन्न झाले आहेत त्यांचे दोन वर्ग केले असतां ते होतील:—अवश्य पाहिजे आहेत ते पदार्थ प्राणी आणि मौजेकरितां उत्पन्न केलेले पदार्थ व प्राणी.

उपद्रवी प्राणी, विषारी पदार्थ, आणि पदार्थ इत्यादि केवळ मौजेकरिताच उत्पन्न झाले आहेत. त्यांवाचून जगताच्या व्यवहारक्रमांत कांहीं उणीव होणार नाहीं. परंतु उत्पन्न न झाल्यास केवळ ... रीवांचून जगतांत दुसरे कांहीं नाहीं ... वांटून मौज भोगण्यास ठिकाणच राहणार नाहीं, तसेच सर्वच पदार्थ व प्राणी रुपद्रवी असल्यानें प्राणिमात्रांस भय ... ति राहणार नाहीं याजकरितां मौज ... तें; भय प्रीति यांचा क्रम चालू रा... हाही एक हेतु आहे असें कल्पून ... समाधान केलें असतां आह्मी ह्मणतों कोणत्याही दृष्टीनें बाध येणार नाहीं.

जे पदार्थ मौजेखातर व भयप्रीतिमूलक असे आहेत त्यांचा उपयोग करून घेण्याची प्रवृत्तीच आहे पण त्यांत विचार असणें फार जरूर आहे. व ज्यांनां विचारशक्ती आहे अशा मनुष्यजातीच्या प्राण्या विषयींच आह्मी आज ह्मणतों कीं, जा देशांत विचारशून्य व अज्ञ मारित लोक आहेत तो देश अति भ्रष्ट अवस्थेंत आहे असें मानलें पाहिजे. आतां मूळविषयांवर येऊं. मद्यप्राशनापासून भयंकर परिणाम कसे होतात याचीं उदाहरणें अनेक देशांतील, अनेक वर्तमानपत्रांतून पाहण्यांत व ऐकण्यांत आलीं आहेत व त्याच प्रकारचें एक उदाहरण आह्मांस आज सांपडलें आहे.

ठाणेंजिल्ह्यांत एका तीस वर्षांचे वयाचे मनुष्यानें दारू पिऊन तिच्या अमलात आपल्या मातुश्रीस जिवें मारिलें. याजबद्दल खटला होऊन सेशन जज्ज मि० कागन साहेब याणीं फाशीच्या शिक्षेचा ठराव केला तो ठराव हायकोर्टानें बदलून जन्म पर्यंत काळेपाण्यावर पाठविण्याचा हुकूम दिला.

ह्या खटल्यातील हकीगत वाचली असतां आंगावर कांटे उभे राहतात. ह्या द्विपाद पशूनें त्या ह्मातारीस काठीनें झोडलें व तें इतकें भयंकर रीतीनें कीं त्यापासून ती तत्काल मेलीच. काय हा मद्याचा अंमल व काय हा राक्षसी परिणाम! अशीं उदाहरणें वारंवार ऐकण्यांत येतात तरी ही गोष्ट आहे तितकी भयंकरशी कित्येकांस वाटत नाहीं परंतु खरोखर असल्या दुष्ट आचरणाचा होईल तितका मोड होणें देशाच्या हितास्तव अति महत्वाचें आहे असें आह्मांस वाटतें.

मद्यप्राशनाचा जितका जितका फैलाव होईल तितका तितका राज्यकर्त्याचा तिजोरीच्या संबंधानें त्यांचा नफा आहे असा लोकांचा समज आहे. परंतु आह्मी ह्मणतो कीं, हा समज सरकारची नाहीं मेहेरबान कागलन साहेब यांहीं मद्यप्राशनापासून होणारे परिणाम व इल व त्याच्या बंदोबस्ताचे मार्ग काय आहेत त्याजबद्दल सरकाराशीं जें कांहीं कांम चालविलें आहे तेंच उत्तम आहे. ते ह्मणतात कीं, दारूची किंमत वाढवावी ह्मणजे दरिद्री लोक फार पिणार नाहींत. व रोज रोज आपले दृष्टीस जे परिणाम दिसून येतात ते दिसणार नाहींत. वास्तविकच आम्ही असे जे कांहीं भयंकर गुन्हे घडल्याचे पहातों व ऐकतों ते बहुतेक हलक्या लोकांतच घडल्याचें पाहतों व ऐकतों. व याचे कारण हेंच कीं त्यांना कमी किंमतींत दारू प्यावयास मिळती.

आम्हांस वाटतें कीं मि० कागलन साहेब म्हणतात अशा रीतीनीं बंदोबस्त होईल व देशांत विद्येची आहे त्याहून अधिक प्रवृत्ति होईल तर कांहीं अंशानें तरी हें दारू पिण्याचें बंड मोडेल ह्यांत संशय नाहीं. व ह्या दोन्हीही गोष्टी घडून येणें केवळ सरकारचे मर्जीवरच अवलंबून आहे.

आमचे वऱ्हाडांतही असे गुन्हे कमी होतात अथवा हलके प्रतीचे लोक दारू कमी पितात असें नाहीं. यास्तव इकडील राज्यकर्ते ह्या देशाच्या हिताअहितासी दृढ संबंध राखणाऱ्या या महत्विक गोष्टीकडेस लक्ष्य पुरवितील व आम्ही सूचना करितों यांचा स्वीकार करतील अशी आम्हांस आशा आहे.

वऱ्हाडांत रुईची महर्गता झाली त्या काळीं अमली पदार्थांचे मक्ते सरकारांतून जितके अधिक अधिक किमतीस गेले तितके आतां जात नाहींत. प्रति वर्षांस मक्त्याची रक्कम कमी होत चालली आहे. व जसजशी किंमत कमी होत जात आहे तसतशी पिण्याची संख्या वाढत जात आहे याजकरितां आम्ही शिफारस करितों कीं हे मक्त होतील तितके भारी रकमेनें देत जावे तेणेंकरून सरकारचा फायदा होऊन दारू पिण्याचा प्रसार कमी होईल.

दुसरी सुचना अशी आहे कीं, वऱ्हाडांत हलक्या प्रतीच्या लोकांत शिक्षण कमी आहे. किंबहुना मुळींच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. याजकरितां मजुरदार वगैरे लोकांत उत्तम शिक्षण मिळण्याचे उपाय होतील तितके योजावे तेणेंकरून वाईट कृत्याविषयीं जी आज लालसा आहे ती कमी होईल सारांश देशास ऊर्जित काळ प्राप्त होण्यास सर्वांशीं राज्यकर्त्यांची सदय दृष्टीच कारण आहे. तसेंच अलीकडे दारू पिणें नव्याच लोकांत मौजेसारखें मानिलें जात आहे. व तश्या समजुतीनें उत्तरोत्तर त्या मौजेची वृध्दी होत गेल्यास त्यापासून देशाचा तोटा होणार आहे यास्तव सर्वांनीं या कामीं होईल तितके जपावें हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे.

## वऱ्हाड

उमरावती जिल्ह्याचे असिस्टंट कमिशनर क्या० थामसन साहेब यांनीं शिकार करून एक वाघीण मारिली. व तिचीं मांजरा एवढालीं सहा पिलीं जिवंत धरून आणिलीं.

—000—

अकोटास वहाबी लोकांच्या बाबदींत कांहीं वाद पडला होता तत्याविषयीं थोडी माहिती कांहीं दिवसांमागें आह्मी आपल्या पत्रांत दिली होती तिची वाचकांस आठवण असेल. हल्लीं असे समजतें कीं, मि० डनलाप साहेब यांनीं त्या कामांत शहाणपणानें जी तजवीज योजिली तिजबद्दल रेसिडेंट साहेबांनीं त्यांची तारीफ केली आहे.

—000—

यवतमाळ—एथील डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यांवर कांहीं खटला आला आहे व मेजर मेन साहेब त्याची चौकशी करित आहेत—एथील शाळागृह बांधण्याकरितां ३००० रुपयांचें सांगशन ठरलें आहे व तें बांधण्याचा मक्ता दिला आहे— डिपुटि कमिशनर व असिस्टंट कमिशनर यांच्या स्वाऱ्या बाहेर फिरताहेत त्या एक दोन दिवशीं एथें येतील—रा० परशराम गणेश वैद्य एथील रिविन्यु शिरस्तेदार सस्पिंड आहेत त्यांस ९ महिने झाले अजून रेसिडेंट साहेबांकडून त्यांचा कांहीं निकाल होत नाहीं.

—000—

एथें कमिशनरचे जागेवर कोणाची नेमणूक होणार तें अजून कळत नाहीं. मेजर बेल साहेब चाल चलाऊ कामावर सध्या मात्र करितात, मुकदमाविगेर चालवित नाहींत.

—000—

मि० लायल साहेब एथून १९ वे तारखेस गेले ते २८ वे तारखेस होम सेक्रेटरीचे कामावर रुजू झाले.

—000—

वऱ्हाडांत गुदस्तसालीं खरपडानें गुरें मेलीं त्यांची किंमत सुमार तीन लक्ष रुपये होईल असें एकानें लिहिलें आहे.

या आठवड्यांत वारा सुटून हवेंत पुष्कळ गारठा आला आहे.

—000—

रा. रा. नारायण विनायक साठे बि. ए. जे पूर्वी यवतमाळास डिपुटि इन्स्पेक्टर होते ते नगरास गोविंदराव भागवतानीं रजा घेतल्या मुळें त्यांचे हायस्कुलचे हेड मास्तरचे जागेवर गेले आहेत.

—000—

इचलकरंजीकर नाटकवाले येथें आल्यावर संकेताप्रमाणें मंगळवारीं त्यांचा खेळ होणार होता पण जागेवाल्याच्या कांहीं पोरचेष्टेसारख्या कृत्यामुळें झाला नाहीं. गुरुवारीं व शनिवारीं असे दोन खेळ झाले. एकंदरीत हें नाटक सुधारलेलें व सभ्य असून कित्येक पात्रें आपलीं कामें उत्तम रीतीचीं करितात. या विषयीं पुढें आह्मी कांहीं अधिक लिहूं.

—000—

वाशिम—क्या० फिटझरल्ड साहेब अजून पुसदकडेच आहेत—क्या० मारो साहेब असिस्टंट कानसरवेटर देवऱ्यावरून परत आले—मि० क्रिश्चन साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट रिसोडाकडूनपरत आले मि० मीर सादतअलीखान पुसदेहून एथील तहशीलदारीवर आले. व रा. सुभानजी खंडोजी रिसोडचे पाटिल यास पुसदेस तहशिलदार केलें. यांचें वय ५५ वर्षांचें आहे व यांस थोडेंसे लिहितां वाचतांही येते. वाशीमच्या तहशीलदारीवर अकोल्याहून हुशार गृहस्थ रा. रा. माधवराव हरि सहस्त्रबुद्धे येणार असल्याची बातमी होती ते आले नाहींत व रा. रा. नजाबा रामचंद्र डिपुटि इन्स्पेक्टर यांस तहशिलदार करण्याच्या इराद्यानें परीक्षा देण्यास सांगितलें होतें व त्याप्रमाणें श्रमपूर्वक अभ्यास करून ती परीक्षा देऊन ते पास झाले पण त्यांसही तहशिलदारी न मिळतां खंडोबा पाटिलाच्या ह्मातार्‍या मुलाला मिळाली हे मोठें आश्चर्य होय! असतु. रा. रा. श्रीनिवासराव परत आपले कामावर आले व मि० करीमुल्लाखान रिकामे झाले. आतां ते कोठें तहशिलदार होतात पहावें. तेही मराठी लिहिण्या वाचण्याचा अभ्यास करित आहेतच.

### मागाहुन आलेली नोटिस.

नोटिस— गोपाळदास मोतीराम व बंधू अगरवाले वस्ती पेठ बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमची दुकान पेठ बाळापुर येथे नजीरावादेत आहे ती तुमच्या वाडिलांनीं व हिरालालनें आमचे कडून भाड्यानें दर महा २ रुपये प्रमाणें घेतली असोन त्या प्रमाणें भाडेंही देत आले नंतर उभयतांत फाट होऊन मोतीराम याणें हिरालाल यास दुकानांतून काढून दिलें त्या नंतर मोतिराम याणें कांहीं दिवस सदरील प्रमाणें भाडें दिलें असोन मध्यंतरीं तुमचे मुलीचें लग्न झाल्याकारणानें हात वोढगस्त ह्मणोन भाड्यास सबुरी करावी असे सांगितल्यावरून आह्मी सबुरी तुमच्या भिडेकरितां केली असतां तुह्मी आजपर्यंत भाडें न देतां व तुमचा बाप मयत झाल्यावरही तुह्मास तगादा केला होता तेव्हां दुकान खालीं करून देतो ह्मणोन तुह्मी सांगितलें. आतां भाडेंही तुह्मी देत नसोन दुकानही खालीं करून देत नाहीं हें आश्चर्य आहे. करितां ही नोटिस तुह्मास दिली आहे तर आजपर्यंतचें भाडे देऊन आमची दुकान १५ दिवसाचे आंत खालीं करून द्यावी. तुह्मी दुकान तिसऱ्यापाशीं गहाण ठेविल्याचें समजतें असें असल्यास ही गोष्ट तुह्मी कायदेविरुध्द केली आहे असें होईल. या नोटिसचें उत्तर पंधरा दिवसांत न आल्यास रीतिप्रमाणें व्याजाबद्दल, भाड्याबद्दल, व घर खालीं करून घेण्याबद्दलची फिर्याद केली जाईल हें खात्रीनें समजावें. तारिख २४ मार्च सन १८७३ इसवी-

(सही) शिवनारायण चिंतंराय
दस्तुर खुद लिपि मारवाडी.

## वर्तमानसार

रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख यांचे चिरंजीव कृष्णराव विलायतेस गेले होते ते वारीस्टर होऊन परत आले.

सांगलीकराचे कारभारी रा. रा. रावजी भाजेकर अटकेंत होते ते मोकळे झाले.

पुण्यांतील सब असि. इनाम कमिशनर रा. रा. सदाशिवराव गोंडचे यांस रावबहादुर असा किताब मिळाला.

जोधपुरचे राजपुत्र महाराज जसवंत शिंगजी पहिले तारखेस गादीवर बसले. त्यांनीं बापाचे क्रियेला सवा लक्ष रुपये लाविले. व ९ गाव ब्राह्मणांनां त्या निमित्त अग्रहार दिलें.

कलकत्यास एम. एच्या परिक्षेला ३० उमेदवार होते त्यांत २० पास झाले. त्यांत एक राजपुत्र आहेत.

मद्रास सरकारानें सर्व खात्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यास असें विच्यारिलें आहे कीं, मुसलमान लोकांनां देववतील तितक्या अधिक चाकऱ्या द्याव्या ह्मणून जे पेशजी हुकूम झाले आहेत त्याबरहुकूम तुम्हीं काय काय तजविजी केल्या ते कळवावें.

सर रीचर्ड टेंपल साहेब १० वे तारखेस हिशेबी खात्याचे पत्रक वाचणार अशी बातमी आहे.

म्युनिसिपालिटीपासून पोलिसाचा खर्च घेतात तो घेऊं नये असा सरकारचा ठराव होणार आहे म्हणून गुजराथच्या एका पत्रास आधारयुक्त खबर समजली आहे.

भावनगरास काठेवाड मित्र म्हणून एक नवीन वर्तमानपत्र निघणार आहे.

शिंदे सरकारांनीं लटीपुटीची लढाई करविली तींत चांगले प्रकारें लढणारांत एकंदर लाख रुपये बक्षीस दिले. त्यांच्या दिवाणी खात्यांत कांहीं अदलाबदल होणार आहे. तिकडील डाके घालणारे लोक दिवाणांनीं पकडले. शिंद्याची फौज ५००० पायदळ, ६००० घोडेस्वार व ३६ तोफा इतकी आहे ती एका जागीं कधीं जमवित जाऊ नये असा मागील गवरनर जनरलांनीं हुकूम दिला होता तो हल्लींच्या गवरनर जनरल साहेबांनीं रद्द केला.

सिविल सर्विसमध्यें परीक्षेशिवाय मोठ्या कुळांतील लोकांस नेमावयाचें त्यांत एक जागा दिगापुती येथील राजास देणार असें वर्तमान आहे.

सर मिचल वेस्ट्राप साहेब मुंबईचे हाय कोर्टाचे चीफ जस्टिस विलायतेहून परत आले.

वाणीलोकाचे प्रख्यात गुरु जदुनाथजी महाराज यांच्या बंधूचें लग्न होणार त्याकरितां मुलीचा बाप १२००० रुपये मागतो असें समजतें.

मुंबईचे सर्व्हे कमिशनर कर्नल जे. टी. फ्रान्सिस कलकत्यास गेले आहेत तेथें सव्हेर जनरलशीं मुंबई इलाख्याच्या संबंधानें त्यांचें कांहीं खलबत होणार आहे.

काश्मिरचे महाराज कला कौशल्य शिकण्याकरितां २ बंगाली गृहस्थांस विलायतेस पाठवितांहेत. व ते तिकडून शीकून आले म्हणजे त्यांकडून ते आपले देशांत कला कौशल्याची शाळा चालविणार.

नेपाळचे जंगबहादुर यांचे चिरंजीव कलकत्यास आले आहेत.

मुंबईच्या एका डेली पत्राचे एडिटर मि० रावर्ट नाइट यांस बंगाल इलाख्यांत जागा मिळाली.

काठेवाडांत मि० पील साहेब यांची नेमणूक झाल्यापासून तिकडील कारभार चांगला चालला आहे.

कलकत्याचे व्यापारी शेट पुरणचंद यांनीं मुंबईच्या प्रदर्शनाला सुमारें वीस लक्ष रुपयांचें जवाहिर पाठविलें आहे.

गायकवाड सरकारांनीं रमजु व नेथु या पैलवानांच्या कुस्त्या करविल्या. त्यांत रमजु मोठा व धिप्पाड असतां त्यास नेथूनें पाडिलें म्हणून मल्हारराव महाराजांनीं त्याला २०००० रुपये व पोशाख व मोस दिला.

इंडियन स्टेटस्मन पत्रावरून कळतें कीं, मुंबईंत कोणी युरोपियन उदम्यानीं कागद करण्याचें यंत्र आणून चालूं केलें आहे. हें काम सुरळीतपणें चालण्यास हवेवरून कांहीं अडचण पडेल असें म्हणतात.

द्वारकेच्या देवळांतील वैरागी लोक धर्माच्या आडून फार अनीतीची कर्मै करतात असें एका वर्त्तमान पत्रांत छापलें आहे. असे अनाचार बहुत देवस्थानांत होतात त्यांचा कोणी चांगला बंदोबस्त करील तर बरें होईल.

पुण्यांतील लष्करी अधिकाऱ्यानीं सर्वे न्हावी कामावरून काढून, सोलजर लोकानीं स्वतां आपल्या हजामती करीत जाव्या असा हुकूम केला आहे. जर मोठ मोठे साहेब लोक आपल्या हातानीं आपली हजामत करतात तर सोलजरानीं कां करूं नये?

असें म्हणतात कीं, थोड्या दिवसांवर कानपूर एथें नाना साहेब बंडवाल्याच्या विधवेनें गंगाविधि करून आपले केश आपल्या नातलगांस वांटून दिले. आतां खरीक नाना खचीत गेला असावा असें म्हणतात. याप्रमाणें विधवांचे केश वांटण्याची चाल हिंदुलोकांत आहे असें आम्ही कधीं पाहिलें किंवा ऐकिलें नाहीं.

ग्रा. द.

## पैशाचा हव्यास.

[मागील अंकावरून पुढें चालू]

हे वस्तूच्या संबंधानें हव्यासाविषयीं सांगितलें. असाच प्रकार पैशाविषयीं आहे. मला अधिक पैसा कशानें मिळेल व मी सर्वांहून सुखी कशानें होईन याची हव्यासी मनुष्याला रात्रंदिवस काळजी असते आपणाजवळ थोडे रुपये आहेत ते अमुक गोष्ट केल्यानें अधिक होतील असें मनांत आलें कीं, लागला त्या गोष्टीचे पाठीस. व तेणेंकरून मनाप्रमाणें वाढ झाली नाहीं कीं लागला मग वाकडे तिकडे मार्ग शोधावयाला. साहेबांचे आर्जव केल्यानें मोठी चाकरी मिळते असें दिसलें कीं लागला साहेबाचे भजनीं. मग त्यांचें बूट डोक्यावर घेईल, त्यांच्या घोड्यामागोमाग धावेल, त्यांच्या बटलराची इजार धुईल, त्यांच्या मोलकरणीच्या उवा काढील, व अनेक प्रकारें थुंकी झेलील, बरें त्याच्या प्रसादानें एकदां मोठी चाकरी मिळाली. शे दीडशे रुपये महिना मिळूं लागले तर तृप्ति व्हावी, पण नाहीं. मग राजश्रीचा हव्यास वाढत चालला व महिना १०० च रुपये मागें पडतात ते तीनच्यारशे कसे पडतील? याची काळजी शुरू झाली. मग आपले भरवशावर जें काम सोपलें असेल त्यांत तनाखिरा करा, काटकसर काढा, कोणाला नोकऱ्या लावून द्या, एकेक दोन दोन पगार उपटा, गावगन्ना वर्गण्या काळा, कडबा फुकट घ्या, गुरें कमी किमतीला घ्या, धान्याच्या गाड्या उधार घ्या, त्या घरांत रिचवा, व पुढें त्याला मनगटें दाखवा, त्यांचे हौसेचे दागिने काढून घ्या, आपल्या बायका शृंगारा, मेजवान्या खा, आपली पोटें जाळा, साहेबांचे डोळ्यांत माती फेका, खोटें नाटें काम करा, लांच खा, लोकांचीं घरेंदारें बुडवा, गरजवंताला नाडा, गरीबाला उन्हाळा करा, त्यांच्या पोराबाळांची अन्नान्नदशा करा, आणि आपली तुमडी भरा असा कारखाना चालतो. अहाहा! कोण हव्यास हा !

आतां हव्यासी मनुष्य नोकर नसून व्यापारी असला तर त्याचे वर्तनाचा मासला पहा. शंभराचे हजार कसे होतील, हजार झाले तर दहा हजार कसे होतील हीच त्याला काळजी असते. मग व्याज बट्टा करा. रुपयाचे ठिकाणीं ४ रुपयांचें व्याज घ्या. खोटे रोखे करा, घरें गहाण घ्या, शेतें घ्या, व्याजाला व्याज लावून व विकट प्रकारच्या शर्ती लावून तीं घशाखालीं उतरा, कामदारांचें धोरण ठेवा, त्यांकडे कुळें नेऊन भेटवा, तदर्थमदर्थ ठराव करा, दहा रुपये त्याच्यासाठीं खर्च करा, १०० रुपये त्याच्या नावावर मांडा, कुळाला वाईट व हलके प्रतीचा जिन्नस द्या आणि तिप्पट किंमत नावावर लिहा. मग फैसल मिळवून त्याचीं घरें जप्त करा, शेतामळ्यांचा लिलाव करा, व तीन तीन पिढ्या कोणाचे घरांत शिरकाविलेलें कर्ज बाहेर काढू नका. असे अनेक प्रकार करून पैशाचे हव्यासी व्यापारी आपली तुमडी भरीत असतात. हें उदाहरण मनांत चांगलें ठसण्याकरितां खेडेगावच्या मारवाड्याकडे दृष्टी पोचवावी म्हणजे चांगली समजूत होईल. प्रथम फुटकी लोटी घेऊन यावयाचें आणि थोडे दिवसांत दहावीस हजार रुपये कमावून परत जावयाचे!

मोठा सरकारी कामदार किंवा व्यापारी असला तरच त्याला पैशाचा हव्यास हा दुर्गुण असतो व हलक्या सालक्यास असत नाहीं असें नाहीं. गरीब, भिकारी, भट भिक्षुक यांच्यांतसुध्दां पैशाचा हव्यास असूं शकतो. भट अधिक पैशाच्या आशेनें दिवसांतून दोन दोन श्राध्दें झोडतो, हव्यकव्यांत निघेल तितका पैसा यजमानाकडून अधिक काढतो. बाया बापड्यांना व्रतवैकल्याची खोटी तारीफ करून फसवून अधिक पैसे उपटतो. सोयर, सुतक यांत देखील धर्मकर्में चालवून दक्षिणा मिळवतो. अशा अनेक तऱ्हा सर्व प्रकारच्या लोकांमध्यें त्यांच्या त्यांच्या व्यवसायानुरूप आहेत. एक भिक्षावृत्तीनें शिळे पाके तुकडे मागणारी व चिंध्या वापरणारी ८० वर्षांची म्हातारी धर्मशाळेंत मरण पावलेली आम्ही पाहिली व तिला मूठमाती देण्यास सरकारचे लोक आले व तितक्यापुरते पैसे तिजजवळ आहेत किंवा नाहींत याचा झाडा घेऊं लागले तेंव्हां तिच्या कमरेला एक कसा होता तो दृष्टीस पडला. तो काढून पहातात तों सुमार सवादोन हजार रुपयांचीं सोन्याचीं नाणीं त्यांत निघालीं! अहाहा! काय त्या म्हातारीचा हव्यास! भिकारीनें पोटाला देखील कधीं भाकरी करून खाल्ली नाहीं, किंवा धड वस्त्र घेऊन वापरलें नाहीं, आणि कर्जदाराप्रमाणें सरकारची धन केली! तसाच बारा पंधरा हजार रुपयांच्या पुंजीचा एक वृध्द सराफ पाहिला, त्याला अर्धे गेलेही चालण्याची शक्ति नव्हती पण रस्त्यांत शेण पडलेलें पाहिलें कीं उचलून घरांत नेई व त्याच्या गोवऱ्या लावून विकी, झाडाखालीं गळून पडलेलीं पानें पाहिलीं कीं दुकानावर नेऊन पत्रावळी लावून विकी, बाजारांत जाऊन भाजी वगैरे खरेदी करावयाची ती भर बारा वाजतां—त्या वेळीं पिकलीं वांगीं, निबर शेंगा, जून दाडके, नासके पेरू, सडके आंबे शिलक राहिलेले व माळणी, बागवान घरीं जाण्यास उतावीळ झालेले पाहून याचा सवदा व्हावयाचा. अशा काटकसरीनें बिचाऱ्यानें मरणाच्या पूर्वदिवसापर्यंत संचय केला. पण पुढें त्या पैशाचा काय उपयोग झाला? बायकोनें आपल्या मुली, जावयी वगैरेच्या हौसा पुरविण्याकरितां दोन वर्षांत त्याची वाताहत केली व तें कुटुंब आतां केवळ दरिद्री होऊन गेलें आहे. अशीं बहुत उदाहरणें पैशाच्या हव्यासापासून वाईट परिणाम झाल्याचीं आहेत. तीं अनुमानानें लक्षांत आणून सुज्ञांनीं तो दुर्गुण आपले स्वतांस व इष्टमित्रांस लागूं देऊं नये हें फार चांगलें आहे.

पुढें चालू

## नोटिसा.

नोटिस—जालू पांडे मारवाडी ब्राह्मण हल्लीं वस्ती निमगाव नांदुरा तालुके मलकापुर यांस मुरारजी सखाराम ...ल मुलकी फौजदारी काम पहणा... सबे नांदुरें तालुके मलकापुर यां... न नोटिस देण्यांत येते कीं, तुमचा ... चा स्नेह किंवा कधीं घटकाभर ... णें चालणेंसुद्धां नाहीं मग देव... चा व्यवहार कोठून असेल? कधीं ... हीं. असें असतां तुम्ही कोणाजवळ ... बोलल्याचें आमचें ऐकण्यांत आलें ... मलकापुरची सुपडी तेलीण हिनें ... पासून १०० रुपये कर्ज घेऊन त्य... आमची जामीनकी घातलेली आहे ... ही गोष्ट आम्हांस अगदींच ठाऊक ... हीं. हलकट रांडेनें सोन्याकरितां ... कर्जाऊ घेण्यांत आम्ही ... असें मुळींच घडणार नाहीं. हें प्रव... अजीबाद खोटें आहे. आम्हीं १०० ... यांस महाग आहोंत व रांडेच्या ... असे तुमचे देणेंदार होऊं असें कधीं ... डणार नाहीं. याजकरितां जर तुम्ही ... दस्तऐवजाबद्दल कोणाजवळ कांहीं ... ला असाल तर तें खोटें आहे. व ... द्वेषपूर्वक तुम्ही तसें बोलला असाल ... खोटा कागद तयार करून आमची ... खराब करण्याचा तुमचा इरादा दि... हो. म्हणून तुम्हांस या नोटिशीनें मुद्दाम कळवितो कीं त्या रांडेने १०० रुपय... सोन्याकरितां तुम्हांपासून कर्ज घेतलें ... हीं, तिंचपाशीं सोनें नाहीं, आम्हीं तु... ला दस्तऐवजावर जामीनकी घालून ... ली नाहीं. आम्हांला लिहितां वाचतां ... तें व अशा हलकट कामाकरितां ... म्हीं तुमचे देवाल होणारे नव्हेत. या... करितां पुन्हां असें तुम्ही बोलला तर ... म्हावर अब्रू घेतल्या बद्दल फौजदारी ... फिर्याद करू व खोटा दस्तऐवज ... यार केला असेल तर तो मुद्यापत्या... शी व सर्व साथीदारानिशी पकडून ... म्हांस फौजदारींत घालूं हें पक्कें समज... कळावें ता० १ मार्च सन १८७३ इ.

(सही) मुरारजी सखाराम पाटिल दा... ...र खुद

नोटिस—खुबचंद मारवाडी दुका... मौजे चायगाव तालुके मेहकर जिल्हा ... लढाणें यास कळविण्यांत येतें कीं ... १८७१ सालीं गहु मण ९ मेहकर ... पी व चिल्लर धान्य साडे तेरा पाय... ८॥७॥ ह्याची दिढीप्रमाणें रास ८४... च्यार मण सवाचार पायल्या हे तुम्ही व... शीर दिले नाहींत सबब त्याचे दाम ... मणी ३२ रुपयेप्रमाणें १३६॥ रुपये ... तुम्ही ही नोटिस पोहचल्यापासून आ... दिवसांचे आंत दिले पाहिजेत ही मुद... चुकल्यास दर शेकडा २ रुपयेप्रमा... व्याज व नोटिशीचा खर्च तुम्हास द्या... लागेल हिचें उत्तरही या मुदतींतच ... टिशीनें कळवावें कळावें तारिख २ म... मार्च सन १८७३

[ सही ]गणपतराव हवलदार मौजे ... जकूर निशाणी रे...

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळा... फडके यांचें वऱ्हाडसमाचार छा० छा० ...

Registered No4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २३ मार्च सन १८७३ इ० | अंक ११

## सूचना.

गेला रविवार शिमग्याच्या सुटींतील होता व कारखान्यांतील लोकांस गुरुवार पासून शिरस्त्याप्रमाणें रजा दिली होती म्हणून तो अंक अर्धा निघालेला आज या पत्रा सोबत पाठविला.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य ३ शक १७९४

## बडोद्याची दिवाणगिरी.

बडोद्याचे दिवाणगिरीची जागा बहुत दिवस रिकामी होती व ती भरण्याच कामीं फार विचार चालू होता त्यावरून लोकांस फार उमेद होती कीं इंग्लिश रीं त्यांतील उत्तम विद्वान, नीतिमान, व पोक्त अशा एखाद्या सभ्य गृहस्थाची त्या मोठ्या पदावर नेमणुक होईल. व तिकडील दुर्दैवी प्रजेचें दैन्य हरण होईल; परंतु त्याप्रमाणें आशा करण्यास आतां कहीं मार्ग राहिला नाहीं. श्री० मल्हारराव गायकवाड यांनीं नाना खानविलकर यांस आपले दिवाण नेमिलें असें वर्तमान आलें आहे. आपचे सार्वभौम इंग्लिश सरकार मराठी राज्यास असें खेळ कां खेळू देतें याचें आश्चर्य वाटतें. राजे अविद्वान, त्यांचे प्रधान अविद्वान, मंत्री अविद्वान, व त्यांनीं पाहिजे तें करण्याची त्यांस मोकळीक असा प्रकार ठेविल्यानें त्यांची सुधारणा कशी होईल? कदापि होणार नाहीं. मग त्याचा परिणाम असा होणार कीं, राजांनीं अनुचित कर्मे करावीं त्यापसून प्रजेस ताप व्हावा, लोकांत त्याचें हसें व्हावें, व अतिशय जुलूम झाला म्हणजे इंग्लिश सरकारानें त्यांत कायमचा हात घालावा, ही रीत कोणती? लेकरांना लहानपणीं विद्यादान द्यावयाचें नाहीं व मोठेपणीं तीं मूर्ख म्हणून वडिलांनीं त्यांचा तिरस्कार करावयाचा, हाच न्याय यांत दिसून येतो. राजाला दिवाण चांगला असला तर त्याचें राज्य नामांकित होतें. हैदराबादेस निजामसरकारचे दिवाण सर सालारजंग साहेब आहेत त्यांची कीर्ती व राज्याची मजबुदी कशी आहे? म्हैसुरास सर टी. माधवराव हे हुशार दिवाण होते तर त्यांचे राज्य कसें सुयंत्र चाललें होतें? व इंदुरास होळकर सरकारांनीं माधवरावजीस कसे बोलाविलें? इत्यादि बहुत उदाहरणें आढळतात. व याच्या उलट बडोद्यास उत्तम दिवाण नसल्यामुळें त्यांची पिढी दरपिढी कशी टर उडत आहे? कैलासवासी गणपतराव महाराजांचे कारकीर्दींत तारीचें तारांगण, खंडेराव महाराजांचे कारकीर्दींत खबुतराचें लग्न, मल्हारराव महाराजांचे कारकीर्दींत शिमग्याचा रंग इत्यादि शेंकडों गोष्टी कशा उपहासास्पद घडताहेत हें पाहून इंग्लिश सरकारानें त्यांस उत्तम दिवाण निवडून घेण्या विषयीं सक्ती केली असती तर तिकडच्या प्रजेवर व त्या संस्थानावरही त्यांचे मोठे उपकार झाले असते असें आम्ही म्हणतों. रावबहादुर गोपाळराव हरी देशमुख रावबहादुर भास्कर दामोदर पाळंदे, रा. बा. नाना मोरोजी, रा. बा. महादेव गोविंद रानडे, रा. रा. नारायण महादेव परमानंद या महान विद्वान व जगमान्य गृहस्थांपैकीं एकास बडोद्याचे दिवाण करण्या विषयीं मल्हाररावें गायकवाड यांस इंग्लिश सरकारानें आग्रहपूर्वक शिफारस केली असती तर फार बरें झालें असतें. हल्लीं नेमलेले दिवाण नाना साहेब खानविलकर यांनीं एखाद्या चांगल्या शाळेंत अभ्यास केला आहे, किंवा यांस इंग्लिश संस्कृत वगैरे भाषा येतात, अथवा यांनीं एकादे तरी परीक्षा पास झाली आहे, किंवा यांस कांहीं शास्त्राध्ययन आहे असें ठाऊक नाहीं. अशा गृहस्थांच्या नेमणुके पासून राष्ट्रास कांहीं विशेष फायदा होईल अशी कल्पना करावयास आधार दिसत नाहीं. व बडोद्याच्या राज्याची जी आज कित्येक कालमर्याद अव्यवस्था झाली आहे ती मोडून नामांकित राज्यांत त्याचें नांव दाखल होईल असा दिवस केव्हां येईल तें कळत नाहीं. असो. ईश्वराचे मनांत दया येईल तेव्हां हें सर्व होण्या जोगें आहे. इंदुरचे होळकर सरकारांनीं म्हैसुरचे नामांकित दिवाण आपले राष्ट्रांत आणिले आहेत, व शिंदे सरकारचे दिवाण नामांकित हुशार किंवा मोठें अध्ययनसंपन्न आहेत असें नाहीं तरी त्यांची कारकीर्द बिनबोभाट व सुरळीत चालू आहे म्हणून आम्ही आशा करितों कीं, आमचे बडोद्याचे नवीन दिवाण या गोष्टीवर लक्ष्य देऊन आपला कारभार उत्तम, वर्णनीय होईल असें करतील तर तिकडील प्रजेवर त्यांचे मोठे उपकार होतील. आज हा विषय आम्ही इतकाच पुरे करतो.

## सांगली दरबार.

सांगली दरबारांत पुण्याचे प्रसिध्ध वकील रावसाहेब भाजेकर मोठ्या हुद्यावर गेले होते. व तिकडे त्यांवर कांहीं गहजब झाला व त्यांस अटकेंत टाकलें होतें इतकें वर्तमान मागें आम्ही प्रसिद्ध केलें आहे. आतां असें समजतें कीं, ते मुक्त होऊन पुण्यास आले. परंतु त्यांवर काय प्रसंग कोणत्या कारणानें आला होता व त्याचें परिमार्जन कसें झालें व पुढें ते काय करणार याविषयीं कांहीं खुलासा अझून समजत नाहीं. पुण्यास तीन मराठी वर्तमानपत्रें आहेत पण त्यांत त्याविषयीं अझून कांहीं प्रसिद्ध झालें नाहीं. ज्ञानप्रकाशांत हा मजकूर येईल असें त्याच्या मागील लेखावरून दिसत होतें पण भाजेकर आल्यापुढें ज्ञानप्रकाशाचे जे दोन अंक निघाले त्यांत त्याविषयीं कांहीं नाहीं. बेळगाव समाचारांत "क्ष" या सहीचें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यात तो भाजेकरांच्या कैदेबद्दल असें म्हणतो कीं, जेव्हां कांहीं कारण उत्पन्न तेव्हांच तसें करण्याचा प्रसंग आला असावा. व अंतरंग शोधिल्यावांचून बाह्यकृत्याचा वाईटपणा मानून उपयोग नाहीं. व इतकें खरें कीं, सांगली दौलत चांगल्या स्थितीस येण्याची आतां निराशा नाहीं. अण्णा पटवर्धन व त्यांचे संवगडे आणि त्यांच्या बाजूनें आलेले प्रमुख लोक दौलतीतून गेले हें अगदीं वाईट झालें असें नाहीं. याप्रमाणें लिहून पुढें बाळकृष्ण मल्हार यांस सूचना लिहिली आहे कीं त्यांनीं सांगली सरकारचे सर्व प्रकारचे हक्क, उत्पन्न, व सत्ता यांचें संरक्षण करून दौलत आबादीस आणावी. अण्णाच्या बाजुचे लोक अशा नजरेनें कोणास छळू नये "सदर तिकडे नजर,, या प्रमाणें यजमानाचाच अण्णावर लोभ म्हणून अण्णाचे आर्जवानें सर्वांस वागणें व त्याचे वशील्यानें चाकरी मिळवणें भाग होतें तरी त्याचे कुकर्माचा त्या लोकांस संतोष नसेल हें उघड आहे व ज्या पेक्षां त्याची कारकीर्द संपली त्यापेक्षां आतां लोकांस जो मार्ग धरावयास सांगणें असेल तो सांगावा इत्यादि. या मोहगम मजकुरावरून सांगली संस्थानांतील घोटाळा व मागील झालेला प्रकार आणि पुढें भाजेकर आपले कामावर जाणार किंवा नाहीं हें कळण्याकडे लोकांचें मोठें लक्ष्य लागलें आहे. हा सांगली संस्थानचा कळसूत्राचा खेळ, त्यांतील कळीचे बाहुलें, त्याचे सूत्रधार व इतर पात्रें यांचा खेळ लोकदृष्टीपुढें आतां सर्व आला पाहिजे सबब आमचे पुणेकर बंधु व दक्षिण महाराष्ट्रांतील बंधु, तसेच भाजेकर स्वतां या बाबदीत कांहीं लिहितील तर तें मोठें अगत्याचें होईल असें आम्हांस वाटतें.

## कृष्णराव गोपाळ देशमुख.

रावबहादुर गोपाळराव हरि देशमुख विलायतेहून आलेल्या आपल्या चिरंजिवास शुध्द करण्याकरितां काशीस घेऊन जाणार अशी बातमी होती, तिला कांहीं आधार नाहीं असें इंदुप्रकाशांत लिहिलें आहे. गोपाळरावजी हल्लीं मुंबईस गेले होते व त्यांची भेट होऊन इंदुप्रकाशांत हें वर्तमान लिहिलें असोंव असें आम्ही मानितो. पण एवढ्यावरून वाचकांचें चांगलेंसे समाधान होणार नाहीं याजकरितां विशेष खुलासा झाला तर बरें होईल. गोपाळरावजींचे चिरंजीव धर्मसंरक्षण करूनच विलायतेंत वागले असावेत यांत भ्रांती नाहीं. व ते आगबोटीवरून जातेवेळीं केवळ फलाहारावर व कधीं खिचडीवर होते अशा प्रकारचीं पत्रेंही तीर्थरूप मातुश्रीस आलेलीं प्रसिद्ध झालीं आहेत तेव्हां तोच प्रकार पुढें झाला असेल. तथापि इंदुरचे गणेश शास्त्री सर सुभे लंडन क्षेत्रीं काशीच्या कावडी नेऊन त्यांतील स्वच्छ गंगोदकाच्या गिड्या नित्य पीत होते तरी त्यांस शंकराच्यार्यांनीं प्रायश्चित्त दिलें यावरून देशमुख यांस आचार्यांचे संतोषाकरितां तरी कांहीं करावें लागेल व ते करतील असें लोक समजतात. आतां देशमुख यांनीं चिरंजिवास पाठविते वेळींच शंकराच्यार्यांपासून निर्दोषतेचें पत्र घेतलेलें असेल तर त्यांस कांहीं खटाटोप करणें नको आहे. किंवा याहून भिन्न प्रकार म्हटला म्हणजे त्यांनीं जातीची परवा केली नाहीं तर एक आहे. पण मागील त्यांच्या वहिवाटी वरून ते इतके पलख्यावर गोष्ट येऊं देतील असें वाटत नाहीं. व त्यांनीं आतांच तसें कांहीं नये. कारण विलायतेस जाण्याच्या हौसेचा अंकुर नुकताच लोकांच्या मनामध्यें उगवतो आहे म्हणून त्याचा एकदम, तशा बागणूकीनें मोड करावा हें प्रशस्त नाहीं. यास्तव गोपाळरावजी आतां काय करणार हें त्यांनीं एकवार लोकांस कळवावें. व चिरंजिवास जातीच्या मेळांत ठेवावें हें फार चांगलें.

यांनीं आपले चिरंजिवास विलायतेस पाठविण्याचें धाडस केलें. व त्यांत चिरंजिवास इच्छेप्रमाणें सिध्धी मिळून ते बारिस्टर झाले व देश हिताच्या कामीं झटण्यास सज्ज झाले याबद्दल आम्ही संतोष मानितो. बहुतेक चांगल्या व सुधारणेच्या कामांत अव्वल इंग्रजी पासून गोपाळरावजीचें नाव आम्ही हिऱ्याप्रमाणें चमकतांना हमेशा पाहतो. त्या हिऱ्यास आतां त्यांचे चिरंजिव कृष्णरावजी हे कोंदण होऊन आपल्या बारिस्टरीच्या हुद्यानें अधिक शोभा देतील अशी उमेद आहे.

## वऱ्हाड

मेजर बेल साहेब यांस एथें आफिशियेटिंग कमिशनर नेमल्याविषयीं तार आली आहे.

—०००—

क्या० ग्रांट साहेब खामगावच्या स्मालकाज कोर्टाचे जडज रजेवरून परत येऊन आपले कामावर हजु झाले. व क्या० ब्रुक साहेब अकोल्यास आले ते असिस्टंट कमिशनरचें काम पाहणार.

—०००—

शाळाखात्याचे डायरेक्टर मि. क्यांडी साहेब यांची स्वारी बुल्डाणें जिल्ह्यांत चिखली तालुक्यांत आहे. ते वार्षिक रिपोर्ट लिहिण्याकरितां पुढील महिन्यांत बि

खळदन्यास जाणार असे ऐकतों.

—000—

डिपुटि कमिशनर आफिसांतील कारकून रा० गोविंद लक्ष्मण बाळापुरकर यांस इंग्रजी आफिसांत ४० रुपयावर नेमिलें. हे या वर्षाच्या म्याट्रिक्युलेशनमध्यें पास झालेले असून घरगुती अडचणीमुळें स्कालरशिप पतकरून पुढील अभ्यासाकरितां कालेजांत गेले नाहींत. असें पाहून मेजर बेल साहेब डिपुटि कमिशनर यांनीं त्यांवर चांगलें लक्ष्य पोंचविलें याबद्दल आम्हांस संतोष वाटतो.

—000—

नानेवारी अखेर खामगाव रेल्वेचे एका आठवड्याचें उत्पन्न ७२७ रुपये व उमरावती रेल्वेचें ७८० रुपये झालें.

—000—

उमरावतींत मोफ्युजिल कंपनीच्या कापसाच्या कारखान्यांत आग लागून ३८० बोजे जळाले व ३५००० रुपयांचे नुकसान झाले असें कळतें.

—000—

इचलकरंजीकर नाटकवाल्याचें दोन आठवड्यांत चार खेळ झाले. अकोल्याच्या वस्तीच्या मानानें एथें दर नाटकाला सुमारे ९० रुपये मिळाले म्हणजे चांगली प्राप्ती समजली जात असे, त्याच या अकोल्यास इचलकरंजीकर दर नाटकास शंभराहून अधिक रुपये मिळवितात व बाहेर गावांहून ही लोकांच्या झुंडीच्या झुंडी नाटक पाहावयास येतात यावरून हें नाटक चांगलें आहे व लोकांस आवडतें हें सिद्ध होतें. गेल्या आठवड्यांत प्रमिला स्वयंवर म्हणून त्यांनीं खेळ केला तो फार पसंत झाला. तसाच या आठवड्यांत दामाजिपंताचा खेळ केला त्यांत बेदरच्या बादशाहाचा कचेरीची सिनरी फार उत्कृष्ठ केली होती. त्याच प्रमाणें विठोबा रखमायीच्यां मूर्तींची सोंगें हुबेहुब मांडिलीं होतीं. याचप्रमाणे अंगदशिष्टाईंत अंगदाचें भाषण मोठें मनोवेधक झालें. त्याशिवाय काल रात्रौ ध्रुवाख्यान केलें त्यांत प्रल्हाद व नारद यांचीं भाषणें सर्वोत्कृष्ट झालीं. असे बहुत लोकांच्या तोंडून आम्ही ऐकिलें आहे. आणखी सुमारे महिनाभर हे एथें राहणार आहेत. नंतर उमरावतीस जातील.

—000—

या वर्षीं पिकापाण्याच्या आबादीमुळें इमाम नयंतीचा उत्साह स्थलमानाप्रमाणें मुसलमान लोकांनी अकोल्यास मोठा गर्दीचा झाला व त्यास लागून आलेला फाल्गुनाचाही उत्साह हिंदुलोकांत मोठ्या मौजेनें सुरू आहे.

—000—

इंदुप्रकाशांत असें लिहिलें आहे कीं, सिकंदराबादचे मोल हसा मुद्दीन असि. कंटोनमेंट माजि. हे गृहस्थ फार भले असून स्वदेशहिताच्या व आपल्या हुद्याचें कर्तव्य रास्त रीतीनें बजावण्याच्या कामी चांगलें लक्ष्य पुरवितात; हे हल्लीं २ महिन्याच्या रजेनें सुरतेस गेल्याने कळतें.

—000—

## वर्तमानसार

हिंदुस्थानच्या पैशाच्या व हिशेबाच्या स्थिती विषयीं चौकशी करण्याकरितां पूर्वीं नेमलेली कमिटी पुनः नेमिली.

जर्मनीचे बादशाहा मे महिन्याच्या अखेरीत सेंटपीटर्स बर्ग एथें जाणार व तेथें सुमारें दहा दिवस राहतील असें म्हणतात.

सुरेस तापीवर पूल बांधणार त्यास सात लक्ष रु० लागतील व त्याजपासून दर वर्षास तीस हजार रु० उत्पन्न होतील असें अनुमान आहे.

पोस्टखातें सरकारी ग्याझेटच्या गेल्या अंकांत पोस्ट खात्यासंबंधी म्हणजे डाक हाशील वगैरे बद्दल नियम प्रसिद्ध झाले आहेत. पूर्वींच्या नियमांत कांहीं फेरफार झाला आहे व हे नियम येत्या एप्रिलच्या १ ल्या तारखे पासून अमलांत येणार आहेत. खासगी पत्रें, वर्तमानपत्रें, पुस्तकें, बंग्या, पार्सल, व सरकारी पत्र व्यवहार वगैरे संबंधी हे नियम आहेत तेव्हां सर्वांनीं त्याजकडे लक्ष्य पुरविलें पाहिजे

कामगारांत फेरफार—टा. ग्या. कर्ते म्हणतात कीं, पुढच्या महिन्यांत मुंबईच्या बड्या कामगारांत मोठा फेरफार होणार आहे. आन. टक्कर आजारी असल्यामुळें सहा महिन्यांच्या रजेवर जाणार, त्यांच्या जाग्यावर आन. गिब्त यांची नेमणूक होणार व पुण्याचे जज्ज मि. शिन्दे त्यांच्या जाग्यावर येतील असा संभव आहे. आन. मि. जस्टिस केनाल हेही सहा महिन्यांच्या रजेवर जाणार व त्यांच्या जाग्यावर येथील प्रसिद्ध व हुशार वकील रा. रा. शांताराम नारायण यांची योजना होईल अशी बोलवा आहे. आन. लायड चाकरी सोडून जातात आणि त्याच्या जाग्यावर मि. आर वेस्ट येणार हें ठरलेंच आहे. मि. वेस्ट साहेबांच्या जाग्यावर अहमदाबादचे जज्ज मि. मेल्विल सिंधचे जुडिशियल कमिशनर होणार आहेत. इ. प्र.

## नोटिसा.

नोटिस—उत्तमचंद जीतमल वस्ती मौजे पिंपळगाव तालुके जळगाव व मथुराबाई जवज आगेदिमल वस्ती मौजे किनखेड तालुके अकोट यांस सरदार मल खूबचंद साहू दुकान किनखेड तालुके अकोट याजकडून दिली जात आहे ती येणेंप्रमाणें—

सांगवीदास याची किनखेड दुकानांत तकसीम विश्वे ६ होती तो इसम आषाढ मासीं म्हणजे जुलाई सन १८७३ इसवी महिन्यांत मयत झाला त्याचा नफा नुकसानीचा हिशोब समजून घेण्याकरितां तुम्हांपैकीं कोणीच आजपावेतो आले नाहीं करितां हल्लीं कळविलें आहे तर आज तारखेपासोन १६ दिवसांचे आंत येऊन हिशोब पहावा आणि मालेंत असाम्याचे नुकसानीबद्दल ८०० व खाते बाकी मयत सांगवीदास याजकडेस निघत आहे तें रुपये ३०० व जामिनीबद्दल ३५० एकून १४५० रुपये देऊन आमचा निकाल करावा. या प्रमाणें न केल्यास आम्ही दिवाणींत फिर्याद करू सांगवीदास याचे मरणापासून तकसीम तुटली आहे. आपणास कळावें तारिख ६ माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही) सरदारमल खूबचंद वहिवाटदार पेमराज.

नोटिस—नारायण गुणाजी ब्राह्मण राहणार कसबे जळगाव य.स खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते अशी कीं तारिख २ मार्च सन १८७३ चे वऱ्हाड समाचार पत्रांत दिलेल्या नोटिसीप्रमाणें तुम्हाजवळ मोतीराम याचे सहीची पावती व भाडेचिठी असेल असें आम्हास वाटत नाहीं. जर असेल तर ती आम्हास आजपासून १५ दिवसाचे आंत आणोन दाखवावी म्हणजे ती पाहून खरी अगर खोटी येविषयींचा जबाब देऊ. जर १५ दिवसांत दोनही लेख आणून दाखविणार नाहीं तर पुढें तुमचे कोणतेंही लिहिणें खरें न समजता व तुमचे कोणतेही म्हणण्याची वाट न पाहतां तुम्हावर तुमचे लेखाप्रमाणें ह्या नोटिशीच्या व पूर्वींच्या खर्चासह दिवाणींत दावा केला जाईल विनाकारण नोटिशी देत बसाल तर त्याचा जबाबही आम्ही देणार नाहीं व तुमचे खर्चाचे जबाबदार होणार नाहीं कळावें. तारिख १० माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही बालचंद सुकानंद मारवाडी वस्ती जळगाव दस्तुर खुद

नोटिस—ओंकार दास मारवाडी दलाल राहणार कसबे अकोट याजकडेस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐशीजे मिती माघ वद्य ९ तारीख ११ फब्रुवारी सन १८७३ रोजीं तुम्ही जैसीराम साहेबराम मारवाडी राहणार अंजनगाव याजला आमचे दुकानीं घेऊन येऊन त्याचे पाच बोजे रुईचे दर १९ प्रमाणे ८ दिवसांचे करारानें देऊं केले आणि ३४५ रुपये त्याजला देवविले पुढें त्याचा करार झाला आणि बोजे आले नाहीं म्हणोन तुम्हांस सांगताच तुम्ही आमची गाडी बैल व मनुष्य घेऊन लागलीच त्याचे तपासास गेले आणि हल्लीं त्याचा कोठेंच पत्ता नाहीं व त्याचा मालही नाहीं म्हणोन सांगतां परंतु तो इसम रुपये घेऊन तिसरे दिवशींच पळून गेला असें तीन दिवस पूर्वींच तुम्हास समजलें असोन तुम्ही आम्हास कळविलें नाहीं तस्मात् तुमचे मनात कपट करणे होतें असें दिसतें.

सदरहू जैसिराम हा कोणास तरी ठकविण्यास एथें आला असोन तो तीन दिवस तुमचे येथेंच होता व त्याचे बोजे कोणी बेपारी लोकानी घेतले नाहीं अखेरीस तुम्ही त्याजला आमचे येथें आणून कृत्रिम पणानें हो असामी खात्रीची आहे असें सांगून रुपये देण्यास आमचें मन वळविलें त्या पक्षी तुम्हास त्याच्या सर्व गोष्टी माहित होत्या व तुमचें अंग त्यांत होते असें हल्लीं खचित पणें दिसोन येते तुम्ही दलाल लोक तुमचे खात्रीवर आम्ही सवदा करित असतां तुम्हास अशी दगाबाजी करणे बरोबर न होतें

यास्तव तुम्हास या नोटिशीनें हल्ली क[...] विण्यात येतें कीं तुम्ही या नो[टि]शीचे तारखे पासून ८ दिवसांत स[...] असामीचा पत्ता आम्हांस बरोबर देऊ[...] बोजे अगर भावा प्रमाणे रुपये मि[...] ण्याची तजवीज करावी जर न करा[ल] तर तुम्हांवर फौजदारींत फिर्याद क[रू] शिवाय बोज्यांचें रकमें बद्दल या नोटिशीचे खर्चा सुद्धां फिर्याद करून भरून घेऊ कळावें तारीख ९ माहे मार्च सन १८७३ इसवी

(सही) सुंदरदास भोंदोजी वहिवाटदार भानजी राघोजी मुंबईकर कान अकोट याची

नोटिस—शंकरलाल जयासिराम व सदाराम खेमराज वहिवाटदार लक्ष्मणदास व सदाराम फतेलाल वहिवाटदार गणेशदास मारवाडी दुकान अकोट यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ऐशीजे तुमची व माझी सालमजकुरी उदमी व्यापाऱ्या प्रमाणें कपाशीचे देव घेव झाली त्यांत मी तुम्हास कपाशीच बोजे फाल्गुन शुध्द १५ करारानें देऊ केले ते शंकरलाल जैसिराम यास बोजे ११ दर बोजे ६४ रुपये प्रमाणें व सदाराम खेमराज यास बोजे ९ दर ७१ प्रमाणें व सदाराम फतेलाल यास बोजे ९ दर ७०। प्रमाणें देण्याचे कबूल करून सटे लिहून दिले पुढें कपाशीचा भाव मंदा होत चालला यामुळें तुम्ही त्रिवर्गांनीं एक मत करून मजला कसेही करून बुडवावें कारण मीही तुमचे बरोबरीचा व्यापारी असोन तुमचे प्रमाणेंच माझाही सटा व आकडा चार व्यापारी लोकांत मान्य करित असत तें तुम्हास बरें न वाटून माझी अब्रू कमी करावी याकरितां करारांचें पूर्वींच एक महिना झाला बोजे अगर भावाप्रमाणे रुपये मागण्यास शिपाई मागण्यास पाठविले मी त्याजला करारांचे पूर्वीं कांहींच देत नाहीं असें सांगितलें त्याजवरून शंकरलाल जयसीराम याणी माझे बोजाची रक्कम रुपये ७०८।।। व सदाराम खेमराज याणी ३१।।=असे बुंडा आज पावेतो दिले नाहीं याचे कारण माझे दिवाळे निघाल्याचें दाखवून रुपये ठेविले आणि चार साहू लोकांत माझा नोकना करून पत खोटी केली यामुळें माझे अब्रूचे नुकसान ५००० पांच हजार रुपये पर्यंत झालें असोन त्याबद्दल मी तुम्हावर फिर्याद करणार आहे

यास्तव तुम्हास या नोटिशीनें सूचना करण्यांत येते कीं, तुम्ही या नोटिशीचे तारखेपासून दोन दिवसांत माझे अब्रूचे नुकसानी बद्दल पंचानुमते अपसांत योग्य तजवीज करून माझे राहिलेले रुपयांसुध्दा मजला द्यावे जर याप्रमाणें न कराल तर तुम्हावर राहिलेले रुपये व शिवाय अब्रूचे नुकसानबद्दल रुपये असे या नोटिशीचे खर्चासुध्दा फिर्याद करून भरून घेऊ हे पक्के समजावें तारिख १० मार्च सन १८७३ इसवी

(सही) जयराम बल्लद चैंडोजी माळी.

हें पत्र अकोला एथें खंडराव बाळाजी फडके यांचें वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# पुरवणी वऱ्हाडसमाचार—

तारिख १० माहे मार्च सन १८७३ इसवी

ामा वलद बापुजी यादव
ोखंडे तालुके खामगाव
यास पुंजी मर्द रामा या
लोखंडे इजकडून नोटिस
कीं, तूं माझा लग्नाचा नवरा
झाल्यास सुमार १२ वर्षे
सून मला घरीं नेऊन नांद
मी पणांत आल्यावर आप
झे वर्षे आले व दीड महिना
तुझ्या भाईचें माझे पटले
ळें घर करून तूं व मी राहि
ण तूं आपल्या आईकडे जेवत
त आणि मी येकटी त्या घरांत
तसेंहि तुजला कबूल झालें नाहीं
माझे बापाचे घरीं पोचऊन दि
महिन्यांमागें तूं कबूल केलें होतें
आठाळेयाचे कांन्त्यात मी वेगळें
न तुझ्याशीं करतो व त्याप्रमाणें
ले व राहिल पण तूं एक दिवस
तां आकास तमा आईकडे निघून
पुढें असें ठरलें कीं, घारो
नवलाजी धामोडे माझा आस
कडे आपण राहूं त्याप्रमाणेंहि
न घडलें नाहीं तेव्हां आतां माझी
य करणार? दहा बारा वर्षे बापाचे
हिले त्याला महिन्यास सुमार ३
माणें ४०० रुपये खर्च लागला
यापासून मिळावा व पुढें मला आप
नेऊन चांगले प्रकारें वागवावें
तसें तुझ्या मनांत नसेल तर माझें
नुकसान करूं नये. झालेला वा
खर्च देऊन मला सोडचिठी द्यावी
मी दुसरा घरठाव करीन याजक
तुला ही नोटिस मुद्दाम दिली आहे
ोटिस पोचल्यापासून एक महिन्यांत
तो निकाल करावा तसें न केल्यास
झा लग्नाचा हक्क रद्द करण्याची
देशीर तजवीज करून दुसरा नवरा
न कळावें. तारिख ६ माहे मार्च
१८७३ इसवी

(सही) पुंजी मर्द रामा यादव इचे
हातची निशाणी बांगडी.

नोटिस—भगु वलद धोंडू शिंपी व
मौजे जळमें भडगावचे तालुके मल
पूर यांस खालीं सही करणार इजकडून
टिस देण्यांत येते कीं, तुमचे व माझे
न होण्यास सुमारें दाहा वर्षे झालीं व
हांपासून लहानपणीं मात्र एक वेळा
तुम्ही मजला आपले घरीं नेलें असेल सु
मारे चार वर्षे झालीं मी, इकडे आल्याव
र एक वेळ नेले होते. तेव्हां मजला
तुम्ही पुरुषत्वांत नाहीं हे खास कळलें.
मी चार वर्षे झालीं बापाचे घरीं आहे दर
म्यान पुष्कळ वेळा तजवीज करण्याविष
यीं मी तुम्हास कळविलें परंतु कांहीं झालें
नाहीं त्यास ही नोटिस पावल्यापासून ८
दिवसांचे आंत पंच लोक जमवून माझी
सोय करून द्यावी फारकती दिल्यावांचून
तुम्हास परिणाम नाहीं आणि मागिल दर
महा पाच रुपये प्रमाणें ४ वर्षाचे रुपये
२४० माझे खर्चाचे तुम्ही नगदी द्यावेत,
नाहीं तर हे रुपये कोर्टांत फिर्याद करून
घेतले जातील आणि तुमचेकडून माझा
संसार होणार नाहीं सबब फारकती वगैरे
देण्याची काय तजवीज करणें ती, सद
रील मुदतींत करावी. याप्रमाणें न के
ल्यास मजला योग्य मार्ग करावा लागेल.
व सदरीं लिहिलेली फिर्याद होईल कळावें
तारिख ९ माहे मार्च सन १८७३ इ०

( सही ) काशी मर्द भगु शिंपी इचे
हातची निशाणी बांगडी

नोटिस विठोबा वलद गोविंदसा रंगा
री मुकाम राहणार इलिचपूर (जीवनपुरा) यास
जनुसा वलद बनशासा परेळकर रंगारी व
स्ती बाळापूर याजकडून नोटिस देण्यांत
येते कीं, आमची मुलगी द्रौपदी ही तुमची
लग्नाची बायको असून ४ वर्षे जालीं तुम्ही
तिला टाकून दिलें आहे व रांड ठेविली आहे.
हे आम्ही स्वतां यऊन व पंचलोक मिळऊन
तुम्हाला पुष्कळ सांगितलें पण तुम्ही येक
च सांगतां कीं आम्हाला बायकोची गरज
नाहीं, तुमच्या इच्छेस येईल तसें करा. त्या
वरून तुम्हास ही नोटिस दिली आहे तर
नोटिस पोचल्या पासून १५ दिवसांचे आंत
तुम्ही आमचे मुलीला आपले घरीं नेऊ
न चांगले प्रकारें वागवावें किंवा तुम्हाला
तिची गरज नसेल तर लग्नाचे हक्काची
सोडचिटी द्यावी सदरहू मुदतींत तुम्ही
याप्रमाणें न कराल तर तुमच्या लग्नाचा
हक्क रद्द करून तिला दुसरा घरठाव क
रून देण्यास कायदेशीर तजवीज योजली
जाईल कळावें तारिख ६ माहे मार्च सन
१८७३ इ०

(सही) जनुसा वलद बनशासा रंगारी



यांद करून पुढें आपल्यास या नोटिशीचे
व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागती
ल कळावें तारिख १९ माहे मार्च सन
१८७३ इ.

( सही ) गोकुळदास माधवजी आणि
कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी
पुंजा.

Notice—We the undersigned hereby request and inform our costomers that any bill without the usual Guzerathee signature of Mohmed Hassum or his brother should not be recognised as true. Our costmers will please consider all bills prepared as null and void when they do not bear the signature of the brothers mentioned above.

Akola 17th March 1873 } Mohmed Hussum

नोटिस—तिलोक चंद श्रीराम मार
वाडी दुकान पाळ तालुके अकोट यास
खालीं सही करणार याजकडून नोटिस
देण्यांत येते कीं, तुम्ही मला कर्जा बद्द
ल ता. १५।१२।७२ इसवीची पावती दि
ली त्यांत असें कबूल केलें कीं माझा शे
तीचा माल बाजार भावाप्रमाणें माझे स
मक्ष मोजून घेऊन बाकी बचत राहील
त्याजवर माझी मालकी—त्याप्रमाणें तुम्ही
ज्वारीचा माल मजसमक्ष मोजून घेतला.
दुसरा कपाशीचा वगैरे मोजून न घेतां तु
म्ही आपले घरीं नेला व पावतीत लिहून
दिलेली शर्त तुम्ही तोडली म्हणून तुम्हा
स अशी सूचना देण्यांत येते कीं,

६५५।. माझा माल नेला तो—ज्वारी
खंडी ४ मण ४ दर खंडीस १६
रुपये प्रमाणें ६७। रुपये, कपाशी
खंडी १० दर ५० प्रमाणें ५००
रुपये, कडबा ३००० दर शेकडा
२ रुपयेप्रमाणें ६० रुपये, कुटा
र ६ रुपये, मूग मण १० दर
१॥ रुपया प्रमाणें १५ रुपये,
ज्वारीचें मण १० दर खंडीस
१४ रुपये प्रमाणें ७ रुपये येकूण
एकंदर

२४० पैकी वजा तुमचे देणें दोन थोड्या
बदल ११० रुपये व सरकारी सारा
१३० मिळून

———

४१५। बाकी:

एकूण च्यार शें पंधरा रुपये च्यार आणे तुमच्याकडे निघतात. हे मला तुम्ही ८ दिवसांचे आंत या नोटिसीचे खर्चासुध्धा आदा करावे. नाहींपक्षां तुमच्यावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासह रुपये घेण्यांत येतील कळावें. तारिख १० माहे मार्च सन १८७३ इसवी मुक्काम अकोलें

(सही) चैंडाजी वलद पैंजाजी
निशाणी रेघ.

# नोटिसा.

नोटिस—राजश्री भाई चैनसुक सुरतराम साहू दुकान पेठ खामगाव यास खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपले कडून रुईच नोजे ५५० आह्मास घेणें असून आपले सहीचे सट्टे आह्मापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार फाल्गुन शुद्ध ५ पासून १५ पावेतो होता, सटया प्रमाणें फाल्गुन शुध्ध ५ चे दिवशीं आपण्यास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणे किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गुन शुध्ध १५ पावेतो माल आह्मांस मोजून द्यावयाचा, या प्रमाणे करार असतां आपण फाल्गुन शुद्ध ५ स आम्हा पासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतों बिलकूल माल ही आमचे पदरीं घातला नाहीं. आपण्यास शुद्ध ४ स हुंड्या कशा प्रतीच्या पाहिजेत तें कळवून घेऊन जाव्या असे नोटिशीनें कळविलें असून शुध्ध १५ चे दिवशीं अस्तमान पावेतो माल मोजून द्यावा, नाहीं पेक्षा दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे भाव भरून घेऊं ह्मणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिशीचें उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपण्यावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास कांही अडचण राहिली नाहीं, परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यांत येत आहे ही नोटिस पावल्या तारखे पासून च्यार दिवसांचे आंत आपण आह्मांस दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे किमतीचे पैसे देऊन आमची पावती घ्यावी. नाहीं पेक्षा रिती प्रमाणे दिवाणी कोर्टांत आह्मीं फिर्याद करूं पुढें आपण्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागतील कळवें तारिख १५ माहे मार्च सन १८७३ इ.

(सही) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा.

---

नोटिस—भाई गुलाबराय गजानंद साहू दुकान पेठ खामगाव यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपले कडून रुईच नोजे २२५ आम्हांस घेणें असून आपले सहीचे सट्टे आम्हापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार फाल्गुन शुद्ध ५ पासून १५ पावेतों होता, सटया प्रमाणे फाल्गून शुध्ध ५ चे दिवशीं आपण्यास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणे किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गून शुध्ध १५ पावेतो माल आम्हांस मोजून द्यावयाचा, या प्रमाणे करार असतां आपण फाल्गुन शुध्ध ५ स आम्हा पासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतों बिलकूल माल ही आमचे पदरीं घातला नाहीं. आपण्यास शुद्ध ४ स हुंड्या कशा प्रतीच्या पाहिजेत ते कळवून घेऊन जाव्या असे नोटिशीनें कळविले असून शुध्ध १५ चे दिवशीं अस्तमान पावेतों माल मोजून द्यावा, नाहीं पेक्षां दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे भाव भरून घेऊं ह्मणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिशींचे उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपण्यावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास काहीं अडचण राहिली नाहीं, परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यात येत आहे. ही नोटिस पावल्या तारखेपासून चार दिवसांचे आंत आपण आह्मास दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणें किमतीचे पैसे देऊन आमची पावती द्यावी. नाहीं पेक्षां रिती प्रमाणें दिवाणी कोर्टांत आह्मी फिर्याद करूं पुढें आपण्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागतील कळावे तारीख १५ माहे मार्च सन १८७३

(सही) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा,

---

नोटिस—राजश्री भाई काशीरामजी साहू दुकान पेठ खामगाव यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपणाकडून रुई बोझे ७०० आह्मास घेणे असोन आपले सहीचे सट्टे आह्मापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार, फाल्गुन शुध्ध १५ पावतों होता. सट्ट्याप्रमाणें फाल्गुन शुद्ध ५ चे दिवशीं आपणास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणें किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गुन शुद्ध १५ पावेतों माल आह्मास मोजून द्यावयाचा याप्रमाणें करार असतां आपण फाल्गुन शुद्ध ५ स आह्मापासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतों बिलकुल मालही आमचे पदरीं घातला नाहीं. आपणास शुध्ध ४ स हुंड्या कशा प्रतीच्या पाहिजेत तें कळवून घेऊन जाव्या असें नोटिसीनें कळविलें असून शुध्ध १५ चे दिवशीं अस्तमान पावेतों माल मोजून द्यावा, नाहींपेक्षां दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे भाव भरून घेऊं ह्मणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिसीचें उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपणावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास कांहीं अडचण राहिली नाहीं, परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यात येते आहे. ही नोटिस पावल्या तारखे पासून च्यार दिवसांचे आत आपण आम्हांस दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे किमतीचे पैसे देऊन आमची पावती द्यावी. नाहीं पेक्षा रिती प्रमाणें दिवाणी कोर्टांत आह्मीं फिर्याद करूं पुढें आपण्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागती ल कळावें तारिख १५ माहे मार्च सन १८७३ इ.

( सही ) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा.

---

Notice--We the undersigned hereby request and inform our costomers that any bill without the usual Guzerathee signature of Mohmed Hassum or his brother should not be recognised as true. Our costmers will please consider all bills prepered as null and void when they do not bear the signature of the brothers mentioned above.

Akola 17th March 1873 } Mohmed Hussun

---

नोटिस—तिलोक चंद श्रीराम मारवाडी दुकान पाळ तालुके अकोट यास खालीं सही करणार माजकडून नोटिस देण्यात येते कीं, तुह्मी मला कर्जा बदल ता. १५।१२।७२ इसवीची पावती दिली त्यांत असें कबूल केलें कीं माझा शेतीचा माल बाजार भावाप्रमाणे माझे समक्ष मोजून घेऊन बाकी बचत राहील त्याजवर माझी मालकी–त्याप्रमाणें तुम्ही ज्वारीचा माल मजसमक्ष मोजून घेतला. दुसरा कपाशीचा वगैरे मोजून न घेतां तुम्ही आपले घरीं नेला व पावतीत लिहून दिलेली शर्त तुम्ही तोडली म्हणून तुम्हास अशी सूचना देण्यांत येते कीं,

६५५। माझा माल नेला तो—ज्वारी खंडी ४ मण ४ दर खंडीस १६ रुपये प्रमाणें ६७। रुपये, कपाशी खंडी १० दर ५० प्रमाणें ५०० रुपये, कडबा ३००० दर शेकडा २ रुपयेप्रमाणें ६० रुपये, कुटार ६ रुपये, मूग मण १० दर १॥ रुपया प्रमाणें १५ रुपये, ज्वारीचें मण १० दर खंडीस १४ रुपये प्रमाणें ७ रुपये येकूण एकंदर

२४० पैकी वजा तुमचे देणें दोन ओझ्या बदल ११० रुपये व सरकारी सारा १३० मिळून

———

४१५। बाकी.

एकूण च्यार शें पंधरा रुपये च्यार आणे तुमच्याकडे निघतात. हे मला तुम्ही ८ दिवसांचे आंत या नोटिसीचे खर्चासुध्धा आदा करावे. नाहींपक्षां तुमच्यावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासह रुपये घेण्यांत यतील कळावें. तारिख १० माहे मार्च सन १८७३ इसवी मुक्काम अकोले

(सही) चैंडाजी वल्लद पैंजाजी निशाणी रेघ.

---

अकोला वऱ्हाडसमाचार छा० छा०

Registered No. 64—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २३ मार्च सन १८७३ इ० | अंक १२

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ॥ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १॥ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।=६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०।१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०।४ |
| ,, दुसरे खेपेस | ०।२ |

गजकरणाचे औषधाच्या डब्या किंमत ०।६ आणे. थंड पाण्यांत भिजवून गंधाप्रमाणे खाज्यावर उडीसारखें लावावें.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थांनीं आमचे छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या थोड्या प्रती विकावयाच्या आहेत. किंमत ०।६ आणे व डाक हाशील ०।१

## जाहिरखबर.

आम्ही खाली सही करणार कागदी लोक लोकास याप्रमाणें जाहिर करतो कीं आमची मशीद जेथें हल्लीं पोलिसचावडी आहे ती किंवा मशीदीचे अवार किंवा त्यालगतची जागा किंवा दुकान किंवा घर किंवा मिळकत कोणतेही प्रकारची कोणी गाहण ठेऊनये किंवा विकत घेऊनये जर कोणी गाहण ठेवील किंवा विकत घेईल तर त्याबद्दलचें नुकसान किंवा जोखीम ज्याचें त्यावर पडेल. कागदी लोकांचे पंच नाव देणार नाहीत.

(सह्या) १ गफुर महंमद वलद मलंगजी
१ महंमद अमिन वलद महंमद अजीम
१ शेख वाहेद वलद अबदुल रसुल.
१ शेख अहंमद वलद शेखबक्षु
१ नूर महंमद वलद शेख निन्हान

## नोटिसा.

Notice—We the undersigned hereby request and inform our costomers that any bill without the usual Guzerathee signature of Mohmed Hassum or his brother should not be recognised as true. Our costmers will please consider all bills prepared as null and void when they do not bear the signature of the brothers mentioned above.

Akola 17th March 1873 } Mohmed Hassum

नोटिस—राजश्री भाई कसोरामजी साहू दुकान पेठ खामगाव यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपणाकडून रुई बोझे ७०० आम्हास घेणे असोन आपले सहीचे सट्टे आम्हापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार फाल्गुन ९ पासून शुध्द १५ पावेतों होता. सट्ट्याप्रमाणें फाल्गुन शुद्ध ९ चे दिवशीं आपणास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणें किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गुन शुद्ध १५ पावेतों माल आम्हास मोजून द्यावयाचा याप्रमाणें करार असतां आपण फाल्गुन शुद्ध ९ स आम्हापासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतों बिलकुल मालही आमचे पदरीं घातला नाहीं. आपणास शुध्द ४ स हुंड्या कशा प्रतीच्या पाहिजेत तें कळवून घेऊन जाव्या असें नोटिसीनें कळविलें असून शुध्द १५ चे दिवशीं अस्तमान पावेतों माल मोजून द्यावा, नाहींपेक्षां दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणें भाव भरून घेऊं म्हणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिसीचें उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपणावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास कांहीं अडचण राहिली नाहीं. परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यांत येते आहे.ही नोटिस पावल्या तारखे पासून च्यार दिवसांचे आत आपण आम्हांस दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे किमतीचे पैसे देऊन आमची पावती द्यावी. नाहीं पेक्षा रिती प्रमाणें दिवाणी कोर्टांत आम्ही फिर्याद करूं पुढें आपल्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागतील कळावें तारीख १५ माहे मार्च सन १८७३ इ.

(सही) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा.

नोटिस—भाई गुलाबराय गजानंद साहू दुकान पेठ खामगाव यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपले कडून रुईच बोजे २२१ आम्हांस घेणें असून आपले सहीचे सट्टे आम्हापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार फाल्गुन शुद्ध ९ पासून १५ पावेतों होता, सट्टयाप्रमाणे फाल्गून शुध्द ९ चे दिवशीं आपल्यास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणे किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गून शुध्द १५ पावेतो माल आम्हांस मोजून द्यावयाचा, या प्रमाणे करार असतां आपण फाल्गुन शुध्द ९ स आम्हा पासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतो बिलकूल माल ही आमचे पदरीं घातला नाहीं. आपल्यास शुध्द ४ स हुंड्या कशा प्रतीच्या पाहिजेत ते कळवून घेऊन जाव्या असें नोटिशीनें कळविलें असून शुध्द १५ चे दिवशीं अस्तमान पावेतों माल मोजून द्यावा, नाहीं पेक्षां दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे भाव भरून घेऊं ह्मणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिशीचें उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपल्यावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास कांहीं अडचण राहिली नाहीं, परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यात येत आहे. ही नोटिस पावल्या तारखे पासून च्यार दिवसांचे आंत आपण आम्हांस दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणें किमतीचे पैसे देऊन आमची पावती द्यावी. नाहीं पेक्षा रिती प्रमाणें दिवाणी कोर्टांत आम्ही फिर्याद करूं पुढें आपल्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावें लागतील कळावे तारीख १५ माहे मार्च सन १८७३

(सही) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा,

नोटिस—राजश्री भाई चैनसुक सुरतराम साहू दुकान पेठ खामगाव यांस खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, आपले कडून रुईच बोजे ५५० आम्हांस घेणें असून आपले सहीचे सट्टे आम्हापाशीं आहेत. सर्व ओझ्यांचा करार फाल्गुन शुद्ध ९ पासून १५ पावेतों होता, सट्टयाप्रमाणें फाल्गुन शुध्द ९ चे दिवशीं आपल्यास दर ओझ्यास रुपये ७०॥ प्रमाणे किमतीच्या हुंड्या पूर्वी दिलेले रुपये वजा जाऊन देण्याच्या, व आपण फाल्गुन शुध्द १५ पावेतो माल आम्हांस मोजून द्यावयाचा, या प्रमाणे करार असतां आपण फाल्गुन शुद्ध ९ स आम्हा पासून हुंड्या घेतल्या नाहींत व फाल्गुन शुद्ध १५ पावेतों बिलकूल माल ही आमचे पदरीं घातला नाहीं. आपल्यास शुद्ध ४ स हुंड्यां कशा प्रतीच्या पाहिजेत तें कळवून घेऊन जाव्या असें नोटिशीनें कळविलें असून शुध्द १५ चे दिवशीं अस्तमान पावेतों माल मोजून द्यावा, नाहीं पेक्षा दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे भाव भरून घेऊं ह्मणून लेखी कळविलें परंतु दोन्ही नोटिशीचें उत्तर आपण दिलें नाहीं तेव्हां आतां कायदेशीर रितीनें आपल्यावर दावा करून आपला पैसा वसूल करून घेण्यास कांहीं अडचण राहिली नाहीं, परंतु आपण सराफ आहात यास्तव आणखी एक वेळ जाहीर खबर द्यावी हें बरें समजून ही तिसरी नोटिस देण्यात येत आहे.ही नोटिस पावल्या तारखे पासून च्यार दिवसांचे आंत आपण आम्हांस दर ओझ्यास रुपये ७२ प्रमाणे किमतीचे पैसे देऊन आमची पावती [illegible] नाहीं पेक्षां रिती प्रमाणे दिवाणी कोर्टांत आम्ही फिर्याद करूं पुढें आपल्यास या नोटिशीच्या व दाव्याच्या खर्चासह रुपये द्यावे लागतील कळावें तारीख १५ माहे मार्च सन १८७३ इ.

(सही) गोकुळदास माधवजी आणि कंपनी, खामगाव दस्तुर हिराजी पुंजा.

नोटिस—तिलोक चंद श्रीराम मारवाडी दुकान परळ तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी मला कर्जा बद्दल ता. १५।१२।७२ इसवीची पावती दिली त्यांत असें कबूल केलें कीं माझा शेतीचा माल बाजार भावाप्रमाणें माझे समक्ष मोजून घेऊन बाकी वसूल राहील त्यावर माझी मालकी-त्याप्रमाणें तुम्ही ज्वारीचा माल मजसमक्ष मोजून घेतला. दुसरा कपाशीचा वगैरे मोजून न घेतां तुम्ही आपले घरीं नेला व पावतीत लिहून दिलेली शर्त तुम्हीतोडली म्हणून तुम्हाला अशी सुचना देण्यांत येते कीं,

६५५। माझा माल नेला तो—ज्वारी खंडी ४ मण ४ दर खंडीस १६ रुपये प्रमाणें ६७। रुपये, कपाशी खंडी १० दर ५० प्रमाणें ५०० रुपये, कडबा ३००० दर शेकडा २ रुपयेप्रमाणें ६० रुपये, कुठार ६ रुपये, मूग मण १० दर १॥ रुपया प्रमाणें १५ रुपये, ज्वारीचें भातरें मण १० दर खंडीस १४ रुपये प्रमाणें ७ रुपये येकूण एकंदर

२४० पैकी वजा तुमचें देणें दोन ओझ्यां बद्दल ११० रुपये व सरकारी सारा १३० मिळून

———

४१५। बाकी.

एकूण च्यारशें पंधरा रुपये च्यार आणे तुमच्याकडे निघतात. हे मला तुह्मी ८ दिवसांचे आंत या नोटिसीचे खर्चासुध्दां आदा करावे. नाहींपक्षां तुमच्यावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासह रुपये घेण्यांत येतील कळावें. तारिख १० माहे मार्च सन १८७३ इसवी मुक्काम अकोले

(सही) चेंडाजी वलद पेंतोजी निशाणी रेघ.

नोटिस—कोंडाप्पा वलद हरीअप्पा साबरे वस्ती अंदाकळी तालुके बाळापुर यास खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचे कडेस खातेबाकी रुपये ३५० व शिवाय व्याज आमचे १४ महिन्यांचे तुमचे कडेस आमचे घेणें असून तुम्हास बहुत तगादे केले व तुमचे सवडीप्रमाणें मुदतीही ऐकिल्या आतां आमची मुदत न ऐकतां ही नोटिस केली आहे तर नोटिस पावल्या तारखे पासून ८ दिवसांत तुह्मी दुकानावर रुपये न पाठविल्यास तुमच्यावर नोटिस खर्चासुद्धा तजवीज करून रुपये घेण्यांत येतील कळावें तारीख १९ माहे मार्च सन १८७३ इसवी.

( सही ) लक्ष्मण अप्पा देवलिंग अप्पा दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार.

या सदरातालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

इचलकरंजीचें नाटक.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस.

वि० वि० नाटकें हीं तमाशाच्या ढबीवर जात आहेत व त्यांपासून कांहीं सुधारणा अथवा विद्वानांचे रंजन होण्याची आशा करावयास नको असा कित्येक वाईट नाटकें पाहून लोकांचा ग्रह होऊं लागल्याचें मागें कित्येक वर्तमानपत्रांतून मीं वाचलें आहे व माझें ही मत तसेंच झालें होतें पण वऱ्हाडांत हल्लीं इचलकरंजीकर नाटकवाले आले आहेत यांचीं तें माझें मत फिरविलें व त्यांचें नाटक पाहिलें असतां मी म्हणतों असेंच सर्वांस वाटेल.

मला नाटकें पाहण्याची फारशी हौस नाहीं पण वरणगावास गेलों होतों तेथें मित्रांच्या आग्रहास्तव मी, इचलकरंजीकर यांचें नाटक पाहिलें. त्यावरून हें नाटक सर्वांनीं अवश्य पहावें अशी माझी मति झाली. पत्रकर्ते महाराज यांचीं भुसावळेस १० नाटकें झालीं, वरणगावास दहा झालीं. एदलाबाद व मलकापूर मिळून ८-१० झालीं खामगावास १४ नाटकें झालीं व दोन हजार रुपये मिळाले. व तुमच्या अकोल्यासही नाटकाचा सपाटा चालला आहे. पांच पांच शें लोक जमतात व रकमही त्यांत पहिल्या पांच खेळांत ७८, ११०, ११७, १२९, व १३० अशी मिळाल्याचें समजलें आहे. यावरून तुमचे वाचक या नाटकाच्या चांगुलपणाची कल्पना सहज करितील. असो. मी थोडी माहिती लिहितो.

यांच्या नाटकांत बीभत्स अगदीं नाहीं इतर नाटकांत विदूषकाची भाषणें म्हटलीं म्हणजे तमाशाच्या व खुषमस्कऱ्यांच्या तोंडीवर असतात तसें यांचें नाहीं. होतकरू मुलांनीं व सभ्य स्त्रियांनीं देखील यांच्या विदूषकाच्या नकला ऐकून संतुष्ट व्हावें अशा त्या असतात. नाटकाचा मुख्य विषय मनोवेधक भाषणें, तीं यांच्या मध्यें कित्येक पात्रांनां चांगलीं करतां येतात. अनंता व णू म्हणून दोन लहान मुलें आहेत ते दहा दहा मिनिटें अस्खलीत भाषणें करून श्रोत्यांपासून सरटिफीकेटें हिरावून घेतात व आनंद सूचक टाळ्यांची गर्दी करवितात. रामा म्हणून मुलगा आहे. तो पुरुषाच्या व स्त्रियांच्याही भागांत चांगली कारागिरी करितो. अंगदाची शिष्टाई त्याने उत्तम केली. वासुदेव म्हणून मुलगा आहे तो माधवरावपेशवा झाला होता व सिताराम म्हणून मुलगा, रमाबाई झाला होता त्या दोघांनीं आपल्या भाषणांनीं नाटक पाहणारास वाकबाल खुष केलें. देवल बाबनाचा, मुलगा आहे तो हिंदुस्थानी भाषा गोठी मनोवेधक बोलतो व तरवार चांगली खेळतो. राघोपंत सूत्रधार नाटक विद्येचें चांगले माहितगार, बारा पंधरा वर्षांचे अनुभवी सभ्य आणि स्नेह तत्पर असे आहेत. याचप्रमाणें मोठ्या पात्रांमध्ये शिवरामबुवा, नाहरभट, आचार्य या नावांचें मनुष्य राजभागांत, राक्षस भागांत ऋषि भागांत चांगलीं आहेत. व एकंदरीनें हें नाटक चांगलें आहे पात्रांची सजणूक, सिनऱ्या, कचेऱ्याचे थाट हें फार चांगलें करितात त्या विषयीं विस्तार भयास्तव आतां अधिक लिहित नाहीं.

पत्रकर्ते महाराज, हें गुणाविषयीं झालें अल्प स्वल्प सुधारणेविषयींही दोन अोळी नाटकवाल्यांस कळविणें अगत्याचें वाटतें. व तुम्ही परवानगी द्याल तर फुरसती प्रमाणें लिहीन. कळावें ही विनंति.

तुमचा मित्र
खामगांवकर

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन वद्य ९ शक १७९४

## हिंदुस्थानच्या उत्कर्षाची आशा.

आपल्या देशांत हल्लीं चोहोंकडे जी घटना चालली आहे तिजविषयीं मार्मिक दृष्टीनें विचार केला असतां असें दिसतें कीं, हिंदुस्थानची निकृष्ट स्थिती बदलून तो सुष्ट दशेस येण्याची आशा करणें आतां केवळ अयुक्तिक होणार नाहीं. इतकेंच मात्र झालें पाहिजे कीं, हें वळण स्थिर रहावें, मध्यें यांत कांहीं विघ्न येऊं नये. इंग्रेजी विद्येकडे लोकांचा भर दिवसानुदिवस जास्ती होऊन शेकडों बी. ए. एम. ए. तयार होऊं लागले आहेत. जिल्ह्याच्या गांवांतून, तालुक्यांतून, व लहान्या गांवांतूनही आतां शाळा झाल्या आहेत व त्यांचीं कामें चांगलीं चाललीं आहेत. तेली, माळी, न्हावी, कोष्टी, परीट, सुतार, लोहार इत्यादि मजुरांकरितांही स्वतंत्र शाळा होऊं लागल्या आहेत. हें पाहून आपल्या देशांत विद्येचें पाऊल बरेंच पुढें पडत चाललें आहे असें सर्व कबूल करितील. व कोणत्याही देशाची सुस्थिति पुढच्यांवरून निर्धार अवलंबून असते हें उघड आहे. बंगाल इलाख्यांतून कित्येक बाबू लोक विलायतेस जाऊन सिव्हिल सर्व्हिसचें परीक्षेंत पास होऊन आले. व मुंबई इलाख्यांतही तसें होण्याची सुरवात झाली आहे. रा. रा. श्रीपाद बाबाजी ठाकूर मुंबईकडून जाऊन सिव्हिल सर्व्हिस पास होऊन आले. रा. रा. कृष्णराव गोपाळ देशमुख विलायतेस जाऊन बारिस्टरची विद्या शिकून पास होऊन आले. पुण्याचे पारशी गृहस्थ खान बहादूर पदमजी पेस्तनजी, आपले एका चिरंजिवास सिव्हिल सर्व्हिसकरितां विलायतेस पाठवितात. व असेच आतां पुष्कळ जाऊं लागतील त्यांस हीं उदाहरणें यथोचित आहेत.

तसेंच आपल्या देशाच्या राज्य कारभाराचें मुख्य सूत्र विलायतेंत आहे. तिकडे राज्यव्यवस्थेंत न्यूनाधिक करण्यास पार्लमेंट सभेला अधिकार आहे. व पार्लमेंट सभेंत प्रांतोप्रांतीचा एकेक मुकत्यार आहे; पण दुःखाची गोष्ट अशी कीं, आमचा हिंदुस्थान देश विलायतेपेक्षां कित्येक पट मोठा असूनही त्यांत हिंदुस्थानचा मुकत्यार एकही नाहीं, व त्यांच्या तिकडच्या लहान लहान तुकड्यांतून निवडून घेतलेले पांच सहाशें मुकत्यार आहेत. आमचे ब्राह्मणलोकांत जसा मुंजीचा संस्कार झाला असला तरच त्याला संध्येचा व श्रावणीचा अधिकार आहे; नाहीं तर तो ब्राह्मणांत जमा नाहीं असें मानलें जातें तसें इंग्लिश लोक आम्हांस संस्कारहीन नागवा या उघड्या मुलांप्रमाणें समजतात व मंत्र तंत्रास आम्ही अनधिकारी आहों असें मानतात असें दिसतें पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. आम्ही आतां बरेच मोठे झालों आहों, आम्ही वस्त्रहीन नाहीं, व असंस्कृत नाहीं. असें निर्मळ दृष्टीनें त्यांनीं पाहिलें असतां त्यांस दिसण्याजोगें आहे. व त्यांनीं आम्हांस आतां पोराप्रमाणें लेखूं नये हें हो सांगावयास नको. पण नुसतें सांगूनच नव्हे, वर्तमानपत्रांतून मोठमोठ्या मोठ्यानें वाजवितों पण त्यांचे कान अझून ती गोष्ट चांगलीही घेत नाहींत. असो. तसा दिवस येईल व ते ऐकू ही लागतील पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचे इलाख्या इलाख्याचे एकेक मेंबर नेमले जातील तर आमचे देशांतील पुष्कळ खऱ्या गोष्टी विलायत सरकारास कळत नाहींत त्या कळतील व आमच्या देशाची हेळसांड होणार नाहीं. आमचे लोक पार्लमेंटांत नेमीत नाहींत ऐवढेंच नाहीं. पण तिकडील उदार मनाचे व दयाळू गृहस्थ हिंदुस्थानासंबंधीं विचार पार्लमेंटांत काढितात तेव्हां शेकडों मेंबर एकाजागास सुद्धां हजर रहात नाहींत उठून चालते होतात. तसेंच हिंदुस्थानच्या संबंधानें पार्लमेंटांतील कोणी मेंबर सरकारास नावें ठेवितात तेव्हां त्यांच्यावर सरकारचे अधिकारी रागावतात व पार्लमेंट सभेंत त्यांनां मेंबर पुन्हा निवडूं नये अशा तजविजीस लागतात असें हो मि० फासेट साहेबांस इकडून मानपत्रें गेलीं आहेत त्या गोष्टींवरून वाचकांस समजलें असेल यांत इतकेंच ध्यावयाचें कीं आमचे लोकें उद्योग करण्यांत आतां अगदीं कसर करीत नाहींत. थेट विलायतेपर्यंत आमच्या लोकांनीं आपले प्रयत्न भिडविले आहेत. ईस्ट इंडिया असोसिएशनची मुख्य सभा विलायतेंत स्थापन केली आहे व तिच्या शाखा हिंदुस्थानांत ठेविल्या आहेत त्यांचाही उद्देश असाच आहे कीं, विलायत सरकारानें हिंदुस्थानच्या लोकांच्या हिताच्या कामीं कान पढून बसूं नये. व तिकडील विचारी व शोधक पुरुषांस हिंदुस्थानाविषयीं अज्ञान राहूं नये. तेव्हां हा आमचा प्रयत्न कमी स्तुत्य आहे असें नाहीं व याजपासून कांहीं उत्तम फळ झाल्यावाचून रहाणार नाहीं. असें आम्हांस वाटतें.

कलाकौशल्य व उद्योग या संबंधानें ही आमच्या हिंदुस्थानच्या लोकांचें पुढें पाऊल पडत चाललें आहे ही संतोषाची गोष्ट होय. पुण्यांत व्यापारोत्तेजक मंडळी निघाली आहे. तिजपुढें राव बहादूर महादेव गोविंद रानडे यांसारखे विद्वान गृहस्थ व्याख्यानें देत असतात. [illegible] कौशल्य शिक्षक एक मंडळी आहे. [illegible] नीं शिवण कामाचा वर्ग काढला आहे. त्याचें काम चांगलें चाललें आहे. त्यासंबंधानें एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. [illegible] जकोटास उद्योगशाळा स्थापिली आहे. तींत ओव्हरसियर, ड्राफ्टसमन, इंजिनियर, प्राक्टिकल केमिस्ट, सुतार, कुंभार [illegible] यंत्रें करणारे यांचीं कामें शिकवितात व त्यांकरितां उत्तम शिक्षक मिळविण्याविषयीं जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. मुंबईसही एक कौशल्योत्तेजक या नावाची मंडळी झाली आहे. ती सुशिक्षित [illegible] कास मुंबईंतील यांत्रिक कारखान्यांत कामें शिकविण्यास लावणार व त्यांनी व्यवस्था ठेवणार आणि कला कौशल्यांत नवीन सुधारणा करणारांस उत्तेजन देणार आहे ही गोष्ट कमी महत्वाची नाहीं, तसेंच मुंबईस सूत काढण्याचे व कापड विणण्याचे कारखाने झाले आहेत व नवीन होत आहेत. कागद करण्याचा एक कारखाना मुंबईस उभारत आहे. सुयांचा व [illegible] गकाड्यांचा हे कारखाने इकडे [illegible] ण्याची वाटावाट चालू आहे. इंदूरचे होळकर सरकार यांनीं कापड विणण्याच्या यंत्रावगैरे कारखाने विलायतेहून आपले राज्यांत आणविण्याची तजवीज केली आहे. काश्मिरच्या महाराजांनीं [illegible] ले राज्यांतील पब्लिक वर्क्स खात्याचें का[illegible] बंगालच्या एका नेटिव गृहस्थावर सोपविलें आहे. पुण्यांत रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांसारख्या उद्योगी मनुष्यांनीं [illegible]

[illegible] नाहींत असा निश्चय केला आहे. व त्यांचें अनुकरण दुसरे करीत आहेत इत्यादि [illegible] ष्टी पाहून आम्हांस संतोष वाटतो.

जिल्ह्या जिल्ह्यांमध्यें सार्वजनिक सभा झाल्या आहेत. तेणेंकरून देशाचें [illegible] कर वाढत आहे. व सरकारी कायदा करून प्रजेस ज्या गैर सोयी होतात त्यांचा धांडोरा पिटत आहे. सरकारचे कायदेकानू जड जोखमीच्याव प्रजेस त्रासकारक होतात याविषयीं थेटपर्यंत [illegible] करण्याचें काम या सभा करित आहेत. [illegible] ई इलाख्यांत हाय कोर्टामध्यें नेटिव जज एकही नाहीं त्याविषयीं गाऱ्हाणें करून हल्लीं सरकारचें मनांत त्याविषयीं कांहीं प्रेरणा होण्यापर्यंत या ऐक्यवर्धक अनेक सभांनीं मजल आणिली आहे. इत्यादि बहुत गोष्टींकडे दृष्टि दिली असतां आम्हास हिंदुस्थानच्या उत्कर्षाविषयीं उत्साहवर्धक भरवसा वाटतो.

## वऱ्हाड

मि० कायल साहेब इकडून होशं[illegible] टरीचे जाग्यावर अक्टिंग गेले होते [illegible] गेल्या आठवड्यांत तिकडे कायम झा[illegible] चे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत कळतें. यांस पगार ४१६६ रुपये [illegible] णार होता पण तो मि० ह्यूम साहेबांस त्यांचे जुनेंपणामुळें झाला व [illegible] साहेब यांस ३२०० रुपये पा[illegible] झाला असें कळतें.

येथील म्युनिसिपालिटिकडे मि० पांडुरंग दामोदर, हायस्कुलांतील मास्तर यांस आनररी सेक्रेटरी नेमिलें आहे.

—०००—

अकोल्याचा पुढील साळच्या पोलीस पट्टीचा ठराव करण्याचें काम म्युनिसिपालिटीकडे चालू आहे. व त्या करितां तींतील मेंबरांची स्पेशल कमिटीनें मिळली आहे.

—०००—

गेले रविवारीं अकोल्याच्या यंगमेनच्या सभेंत रा. रा. देवराव विनायक वकील यांनीं कायद्याचीं मूलतत्वें याविषयावर एक मोठा विस्तृत आणि उत्तम असा निबंध वाचला. त्यांत पुष्कळ गोष्टींची चांगली माहिती दिली आहे. तो निबंध सवडी प्रमाणें आम्ही आपले पत्रांत प्रसिद्ध करूं. या सभेच्या कामाकडे वकील लोक व मुलकी खात्याकडील हो लोक लक्ष देऊं लागले ही मोठी आनंदाची गोष्ट होय. गेल्या सभेला रा. रा. माधवराव हरि ज्या. कं. आफाधि कोर्टहे आले होते व त्यांनीं कायद्याच्या मूलतत्वाच्या संबंधानें दोन तीन वेळां बरींच भाषणें केलीं.

—०००—

गेल्या सोमवारापासून मेजर बेल साहेब आफिशिएटींग कमिशनरचें काम पाहूं लागले व क्या० बेल साहेब डिपुटि कमिशनरचें काम पाहूं लागले.

यवतमाळचे डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. विनायकराव रामचंद्र भाटवडेकर बी. ए. यांजवर तेथील स्कुलमास्तर रा. रा. विनायक रावजी भिडे यांनीं कांहीं आरोप आणिले आहेत. ते असे कीं, डिपुटि इन्स्पेक्टर यांना बाहेर मालीं फिरण्याचें काम केलें नसतां भत्ता घेतला व कारकुनास रजा देऊन बाहेर गांवीं पाठविलें असतां त्याची रजा सरकारी कागदीं दाखल न करितां पगार खर्ची घातला. या वगैरे गैरकुराबद्दल भिडे यांनीं डिपुटि कमिशनरकडे अर्ज केला. व त्यावरून तिकडे चौकशी होणार होती परंतु मि० क्यांडी साहेब डायरेक्टर यांनीं डिपार्टमेंटल म्हणजे खात्याचे संबंधानें आपणच त्या प्रकरणाची चौकशी करण्याचें ठरवून तसें डिपुटि कमिशनर यांस कळविलें. व अर्जदार विनायक भिडे यांस २१ वे तारखेस अकोल्यास आपले हुजूर पुरावा घेऊन येण्याविषयीं हुकूम पाठविला परंतु त्याप्रमाणें भिडे एथें आले नाहींत आतां डायरेक्टर साहेब काय करितात पहावें. डिपुटि इन्स्पेक्टर आपले जिल्ह्यांत शाळांची पाहाणी करित आहेत व असें ऐकण्यांत आलें आहे कीं, भिडे यांच्या शाळेची परीक्षा चांगलीउतरली नाहीं व तशा प्रकारचा डि० इ० यांनीं व्हिजिटर बुकावर शेरा लिहिला म्हणून त्यांचें चित्त लवळून ते निर्भीड झाले. या प्रकरणाचा निकाल होईपर्यंत आम्हास आपलें मत देतां येत नाहीं.

—०००—

थंडी अगदी गेली दोन प्रहरच उन्हाळा आतांच चांगला भासूं लागला तेव्हां पुढें पावसास तो जाणार याची आतांपासून च लोकांस काळजी पडली आहे.

मेजर बेल साहेब आफिशियेटिंग कमिशनर यांपुढें काल व परवा मलकापुर तालुक्यांतील एका खुनाच्या मुकदम्याची सेशन चौकशी चालू होती. त्यांत तीन पाटील आरोपी आहेत व त्यांनीं ज्याला मारला तो पाटीलच आहे.

## मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—रावो गंगाराम शहामृग राहणार धोतरडी तालुके अकोलें व देवराव अनंदराव देशमुख वस्ती बोरगाव तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हा पैकीं राघो गंगाराम याजवर ईश्वर दास खुशाल याचा हुकूमनामा झाला तो अपलवारसि अकोले एथे मौलिस साहेब बहादुर यांचे कोर्टतात दरखास्त दि ल्याप्रमाणें तुम्ही उभयतांनीं आम्हास सरकारांत जामीन लिव्हे व या निवाड्याचे रुपये तुम्ही जिम्यानें जानेवारी रोजीं देण्याचें कबूल केलें होतें ते न दिल्या मुळें आम्हास कोर्टतात भरणें लागले ते रुपये मागीतले असतां तुम्ही दिले नाहींत रुपये ४०४।=। तारीख ११ फेब्रुवारी सन १८७३ रोजीं दिलेले रुपये ४३४।=। ते दिवसापासून सदरहू रक्कम व्याजानें दर शेकडा रुपया १ प्रमाणें रुपये देई पर्यंत असो आज तारखेपासून ८ दिवसाचे आंत आणून द्यावे न दिल्यास सदरहू रुपये व्याजासुद्धा व या नोटिशीचे खर्चासुद्धा तुम्हा उभयतांवर दिवाणींत फिर्याद करून वसूल करण्यांत येतील याप्रमाणें तुम्ही आम्हास दस्तैवज करून दिला आहे कळावें तारीख २२ माहे मार्च सन १८७३ इ.

(सही) श्रीराम राघन वहिवाटदार

जतन लक्ष्मण दास मारवाडी

दुकान बोरगाव दस्तुर खुद

नोटिस—राजश्री मारुती श्रीकृष्ण नाइक मुक्काम बोरगाव यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, संवत १९२८ चे माघ महिन्यांत तुम्ही व आम्ही मिळून पातूरचे यात्रेत माल सरकतींत खरेदी केला व त्या मालाची विक्री तुमचें दुकानीं झाली त्यांत. एकंदर नफा रुपये १३८।=।।। व बारदान विक्री रुपये ८।।। झाले येकूण नफा व बारदान मिळून १४७८=।।। झाले आहेत यांत तुमचे दोन हिस्से व माझा तिसरा हिस्सा रुपये ४९८–। येणें असून ते तुमचे कडेस मागणं केलें असतां दिले नाहींत. यास्तव या नोटिसीनें तुम्हास कळविण्यांत येते कीं, सदरहू आज मितीपासून आठ दिवसाचे आंत द्यावे नाहीं तर सदरहू रुपये ४९८–। व रुपये तुमचें दुकानीं जमा झाल्याचे तारखेपासून व्याज दर शेकडा दोन रुपयेप्रमाणें व नोटसीचे खर्चासुद्धा दिवाणींत फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील. कळावे तारीख २२ माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही) पांडोबा वल्लद परशराम

बोरगावकर दस्तुर खुद.

नोटिस—राजश्री भाई गोकूळ दास माधोजी मुंबईकर दुकान खामगाव यास खालीं सही करणार अशी नोटिस देतो कीं, रुई बोजे १२९ दर ५९ प्रमाणें आम्ही देऊं करून त्याचा सट्टा तुम्ही आम्हापासून घेतला त्यांतील बोजे मोजून देण्याचा करार मिती फाल्गुन शुध्ध ९ पासून शुध्ध १९ पावेतों त्याप्रमाणें कराराचे आंत ओझे दररोज तुमचे समांत गोजगा करितां आणिले असता ओझे ६२ मण ६२२।।।३ सहाशें पावणें तेवीस मण तीन रतल मोजून घेतले बाकीचे ओझें मोजून घेतलें नाहीं। आज घेऊं उद्या घेऊं म्हणोन सांगीतलें सदरील ओझे फाल्गुन वद्य ३ पावेतों तुमची गाठडी प्राप करणीचे कोठींत तयार होत आहे त्या ठिकाणीं तुमचे सांगितल्या वरून दररोज ओझें आणित गेलो नंतर भाव मंदा झाल्यामुळें भाव घेऊं म्हणता त्यास आम्ही तर तुम्हाकरितां ओझे खरेदी अडिचमाल करून ठेविला आहे तुम्ही न घेतल्यामुळें भाव तुम्हास मिळेल तो उगेच अगदी नाळगूं नयें ओझे तुम्हा करितां खरेदि केलेले हल्लीं ही नोटिस पावल्यापासून दोन दिवसाचें आंत मोजून घ्यावे न घेतल्यास सदरील ओझे ठेवल्या बद्दल किराया, रखवाली वगैरे जो खर्च लागेल तो तुम्हास देणें प्राप्त होईल आणि ओझाचो नळ जो लागेल तो तुमचे माथ्यावर आहे आमचे माथ्यावर नाहीं हें समजून ओझे मोजून घेण्याची तजवीज करावी ओझें तुम्हास देण्याकरितां खरेदी करून ठविलें आहे सबब भाव मिळण्याचा मार्ग बिल्कूल राहिला नाहीं कळावें तारीख २१ माहे मार्च सन १८७३ इ.

(सही) केशो राम रामप्रत दस्तुर

गोविंद इच्छाराम गुमस्ते

## वर्तमानसार

मुंबईस अशी गप उठलीआहे कीं वडोद्यास शिमग्याची गर्दी उडणार म्हणून कित्येक संभावित गृहस्थ आपलीं बायका मुलें घेऊन बडोदें सोडून बाहेर गेले आहेत.

युरोपखंडांत विएना येथें प्रदर्शन आहे त्यांत मांडण्याकरितां सिलोन म्हणजे लंका येथील गवरनरांनीं कांहीं पदार्थ पाठविले आहेत व त्या बरोबर तीन कामदार पाठविले आहेत.

मद्रास इलाख्यांतें कृष्णा जिल्ह्याचे अक्टिंग हेड असिस्टंट आणि कलेक्टर मि० एल. ए. कपांबेल म्हणून आहेत ते स्टेट सेक्रेटरीचे भाचे आहेत त्यांस मद्रास इलाख्याचें सरकारचे रिव्हिन्यु खात्याचे अंडर सेक्रेटरी नेमणार.

अमदाबादचे जड्ज मि० मेलविन साहेब सिंधचे जुडीशियल होणार व त्या रिकाम्या जागेवर ठाण्याचे जाइंट जड्ज मि० न्यूजाम साहेब हे होणार असें कळतें.

बडोद्याचा बातमीदार टाइम्स वाल्यास लिहितो कीं इकडे हिंदु लोकच शिमगा खेळतात असें नाहीं. क्रिश्चन लोकही फाल्गुनोत्सवांत आढळतात.

मद्रास इलाख्यांतील रामनदचे राजे मरण पावले. हे श्रीरामाचे वंशज होते व यांचे घराण्यास सीतापती असें म्हणतात.

मद्रास इलाख्यांत गरीब लोकांवर मिठाचा कर फार आहे म्हणून नोभाट असल्यावरून सरकार चौकशी करित आहे. व त्यांस सोयवार होण्याकरितां सरकारानें परवानगी दिली आहे कीं मिठाच्या विहिरी तयार करून त्यांनीं आपले खाजगत उपयोगास लागणारें मीठ काढून घ्यावें. विक्री मात्र करू नये.

मुंबई इलाख्यांत काळ्या पलटणी ३० आहेत. दरपलटणींत ८ कंपन्या असतात त्यांवर एक कम्यांडर, एक सेकंड कम्यांडर एक अजुटंट, एक कवाईत मास्तर, दोन उईंग तबल टर्न, एक मेडिकल मनुष्य, आठ सुभेदार, आठ जमादार, च्याळीस हवालदार, च्याळीस नाईक सोळा ब्यांडवाले, व सहाशें शिपाई असतात त्यात दरएक पलटणींत ७१२ नेटिव लोक असतात.

पंजाब इलाख्यात दस्तऐवज रजिस्टर करण्याचे इन्स्पेक्टर जनरल आणि स्टांप कागदाचे सुपरिंटेंडेंट यांचें आफीस एक केलें ही काट कसर बरी आहे. व या प्रमाणे चोहोंकडे कां न व्हावें.

काश्मिरचे महाराजांनीं बाबु क्षेत्रनाथ महाराज यांस आपले राज्यांत इंजिनियर खात्याच सुपरिंटेंडेंट नेमलें क्षेत्रनाथ बाबु हे इंग्रेजी सरकाराकडे इंजिनियर खात्यांत मोठें विख्यात होते व एक्झिक्युटिव इंजिनियरचे पायरी पर्यंत आले होते पण सरकारानें एका प्रसंगीं त्याकडे लक्ष्य पोंचविलें नाहीं म्हणून त्यांनीं चाकरी सोडून दिली होती व आलीकडे इजुकेशनी पत्राचे ते एडिटर होते.

सियाम देशांत मजूर लोकांना डाग देण्याची एक रानटी चाल होती ती तेथील राजानें मना केली.

प्रिंटिंगटाइम्स या नावाचें वर्तमानपत्र निघूं लागलें आहे. हें छापखानेवाल्यास विशेष उपयोगाचें आहे.

अमेरिका खंडात वाशिंग्टन एथें बहिरे आणि मुके लोकांकारितां एक वर्तमान पत्र छापत असतें. त्याचे नाव 'साय लेंट वर्ड' स्तब्धजग असें आहे. व पृथ्वींत अशा प्रतीचें हें एकच पत्र असल्याचे ठाऊक आहे.

लंडन शहरांत पाऊण आण्याहून अधिक किंमतीचें वर्तमानपत्र एकही नाहीं व दीड पैसा किंमतीचीं जीं त्यांची वर्तमान पत्रें तीं लंडन शहराबाहेर ३९ आहेत.

सुवेश संयोगी भूमी एथें सन १८५९ साली १९ युरोपियन व १२९ नेटिव लोक होते. व सन १८६९ साली त्याची संख्या युरोपियन २२८४३ व नेटिव १९९४७ इतकी झाली.

वायव्य प्रांताच्या लोकल फंडाच, तिगस्त सालचा रिपोर्ट प्रसिध्द झाला आहे त्यावरून दिसतें कीं, जमा ११ लक्ष रुपये व खर्च ११ लक्ष रुपये या खात्याकडे झाला.

नियाज महंमद म्हणून एक बंडवाला फरारी असलेला मुदस्तां पुण्यात नोवेंबर महिन्यांत दरबार झाले त्या प्रसंगांत आले ला पकडला असें समजतें.

बंगाल इलाख्याचे पुढील सालचें पेंशिरा बजेट झालें आहे. त्यांत खर्च ४९३२१०० रुपये कांगेल असें लिहिलें आहे.

तांजोरच्या अमिराचे नातु गायकीजी यांस महिना १००० रुपये पेनशीन देण्याचा हिंदुस्थानसरकाराने ठराव केला.

बारावे तारखेस कलकत्त्यास तेथील युनिव्हर्सिटीचे कानव्होकेशन झालें त्याप्रसंगी चान्सेलर लार्ड नार्थब्रुक गवरनर जनरल हे होते त्यांनीं उत्तम भाषण केलें त्यांतील तात्पर्य आम्ही पुढील खेपेस लिहूं.

आसाम प्रांतांत चहाची लागवड करणाराला कांहीं पडीत जमीन दिली त्याप्रसंगी युरोपियन लोकांस त्या कामास उत्तेजन यावें असें मि॰ कपांबेल यांनीं काहीं भाषण केलें. व सर्व ठिकाण्या ठिकी कोणी १० वर्षांचे करारानें पतकरील तर दीड रुपया एकराचा दर आहे तो निमा कमी करावा असा विचार आहे.

बऱ्हाणपुरचे कालेजाचे संबंधानें बोर्डींग हौस करण्याचा सरकारचा विचार झाला व बंगालचे लेफ्टिनेंट गवरनर यांनीं ठराव केला कीं, नेटिव लोकांकडून ६००० रुपये मिळतील तर सरकारांतून तितकेच रुपये देऊं. त्यावरून मुर्शिदाबादची महाराणी शरण माइ यांनीं व दुसरे सहा गृहस्थांनीं ७१५० रुपये दिले असें कळतें.

म्हैसुरचे छोटे राजे साहेब महिनाभर निलगिरीवर हवा खाण्यास जाणार आहेत.

जनरल डेली मध्ये हिंदुस्थानचे एजंट यांनीं एक वर्षाची रजा घेतली त्याचे जागेवर कर्नल बाटसन व्ही. सी. सी. बी मध्य हिंदुस्थानचे हार्स कम्यांडिंग यांस नेमणार.

## पैशाचा हव्यास.

(मागील अंकावरून पुढें चालू)

कोणी पैसा, पैसा, करून जन्मवर हव्यास केला व तो बराच गाठ मारून पदरीं ठेविला तरी त्याचा पुढें परिणाम काय? ज्यानें त्यालाच त्या पैशापासून सुख झालें नाहीं, उपभोग झाला नाहीं, सत्पात्रीं दान झालें नाहीं, ज्याला पैसा पैसा करूनच मरण आलें त्याचा तो पैसा पुढें पोराबाळांला तरी अढळ राहाणार याचा काय भरवसा? व अन्यायानें पैसा मिळवावा, पोटाला चिमटा घेऊन तो मागें टाकावा, आणि पोराला राखावा, ही कोणत्या प्रकारची नीती? यांत कोणतें कर्तव्य कर्म झालें? आणि कोणती गोष्ट यांत ईश्वराचें घरीं रुजू होण्याजोगी झाली? तें आम्हास कळत नाहीं. पैशाचा कांहीं भरवसा आहे काय? विभवेनिवशाश्वतं, म्हणजे वित्ताची शाश्वती नाहीं. एक पैसेवाला मनुष्य दरिद्र्याला हसत होता तेव्हां त्याला एका सुज्ञानें बोध केला कीं

श्लोक

आपद्गतंहससिकिं द्रविणांधमूढ, लक्ष्मीस्थिरानभवतीतिकिमत्रचित्रं ॥ त्वांकिंनपश्यसि घटेजलयंत्रपध्ये, रिक्ताभरंतिभरितापुनर रिक्ता ॥ ७ ॥

म्हणजे हे द्रव्यमदानें अंध झालेल्या मनुष्या, विपत्तिग्रस्ताला तूं कां हसतोस? तुला त्यांत काय आश्चर्य वाटतें? लक्ष्मी स्थिर नाहीं हें तुला पक्कें ठाऊक असूं दे. रहाटगाडगें म्हणून विहिरींतून पाणी काढण्याचें शेतकऱ्यांस मडक्यांचें एक यंत्र आहे तें तूं कधी पाहिलें नाहींस काय? तें पहा म्हणजे तुला दिसून येईल कीं त्या यंत्राचा व्यापार सुरू झाला म्हणजे जीं भरलेलीं मडकीं असतात तीं रितीं होतात आणि जीं रितीं असतात तीं भरलीं जातात. तद्वत् संपत्ति विपत्तीचें हें ईश्वराच्या घरचें रहाटगाडगें आहे, म्हणून त्या अस्थिर पदार्थाची तूं शाश्वती मानूं नको.

अधिक पैसा मिळविण्याचा जो हव्यास तो मनुष्याला अंधळें करून टाकतो. नीति अनीति, कार्य अकार्य, योग्य अयोग्य, मार्ग अमार्ग, हें कांहीं पाहूं देत नाहीं. कोणाचें कांहीं होवो व कसेंही होवो पण आपणास पैसा मिळो हेंच त्याला एक व्यवधान असतें. बरें त्याच्या हव्यासाप्रमाणें सर्व काल त्यानें योजलेल्या गोष्टीची फत्तेच होती असें नाहीं. बहुत गोष्टीमध्यें तो फसला जातो व तेणें करून त्याचें मनास अत्यंत दुःख होतें. द्रव्यापासून जें सुख त्याचा अनुभव त्यास कांहीं येत नाहीं. व पैसे मिळविण्याच्या त्याच्या रीती अन्यायाच्या असल्यामुळें तें अन्यायोपार्जित द्रव्य बहुत काळ टिकत नाहीं. मुळच्या सुद्धा नाहींसें होतें. एकानें म्हटलें आहे कीं—

श्लोक

अन्यायोपार्जितं द्रव्यं दशवर्षाणि
तिष्ठति, प्राप्ते एकादशे वर्षे समू
लंच विनश्यति ॥ ८ ॥

यास्तव अन्यायानें द्रव्यसंचय कधीं करूं नये. अन्यायानें वागणारास प्रसंगीं कोणी साहायही मिळत नाहीं. म्हटलें आहे कीं—

आर्या.

न्यायें वागे त्यातें, होती पशुपक्षि
ही सहाकारी ॥ जातां अपथें सो
डी, बंधूही त्रासुनी मनीं भारी ॥ ९ ॥

उघडच आहे कीं, याला पैशाचा हव्यास तेव्हां बंधूला कांहीं मिळूं नये अशी इच्छा ठेवूनच हा वर्तन करणार तेव्हां बंधूजवळ राहतो कशाला? तेव्हां हव्यासी मनुष्याला सहायाला मित्र नाहीं, स्नेही नाहीं, बंधू नाहीं, कोणी नाहीं. त्याच्या मनांत मानलेला पैसा मात्र. म्हणजे अभावनशाचें ठिकाणीं भरवसा, किंवा मृत्यु लोकच्या वस्तींत मी चिरंजीव समजणें त्याप्रमाणें हें होय.

काय चमत्कार आहे पहा! पैसा रक्षण करण्या विषयीं हव्यासी जितका जपतो, तितकेच त्याचें हरण करण्या विषयीं चोर पोर जपतात म्हणून पैसेवाल्यास भीति फार, त्याला सुखानें झोप कधीं यावयाची नाहीं, त्याला कड्या कुलुपें घोडालीं पाहिजेत, त्याला घर फोडला न्यासारखें मोठें भक्कम पाहिजे, त्याला पहाऱ्यावर हत्यारबंद माणसें पाहिजेत, व त्याला आपली संपत्ति इतरांसारखी खुली न वापरता झांकून ठेविली पाहिजे इत्यादि प्रकारावरून पहातां तोच द्रव्यवान् प्राणी केवळ त्याच्या लोकांचा चोर राहून चोर होऊन जातो. त्याला व चोराला कांहीं कमी नाहीं कारण द्रव्य चोरण्याची भीति, प्रतिबंध, कड्या कुलुप, कोट, पहारे हे सर्व चोराचे सांपस्कार त्याच कपाळीं येतात. अहाहा! हव्यासी मनुष्याची कितीही नीच स्थिती.

अस्तु. हा निबंध बराच वाढला सबब आतां संपविण्याच्या तजविलीस लागतो. जें मी हा वेळपर्यंत लिहिलें त्याचा सारांश इतकाच कीं मनुष्याला द्रव्याची गरज आहे, व तें त्यानें नीतीच्या मार्गानें मिळवावें, अति हव्यास करूं नये. मिळविल्या द्रव्याचा योग्य व उत्तम उपभोग घ्यावा, गरिबास दान, सत्कार्णी व्यय, व अडलेल्यास मदत सर्वकाळ करावी, पुढील संततीच्या उपयोगास पडावी म्हणून अतिकार्पण्यानें गैरमजूर करून घेऊनय द्रव्यसंचय करूं नये. आणि प्राप्ती चांगली योग्य प्रकारची आहे तर संचय करावयाचाच नाहीं म्हणून उधळपट्टी करूं नये. पैसा नाहीं म्हणून पैसा पैसा करितच भटकत फिरूं नये. व पैसा फार झाला म्हणून आतां कांहीं कर्तव्य करावयाचें राहिलें नाहीं असें म्हणून जगास अनुपयोगी होऊन बसूं नये. विद्या, ज्ञान, कला, सद्गुण, सद्रीति ईश्वरभक्ति इत्यादि निर्दोष आणि मनासि व जनास सुख देणारीं अमोघ साधनें यांचें पोषण निशिदिनीं असूं द्यावें. तेणें करून सर्वकाल सुख आणि संतोष राहतो, व दारिद्र्य भयानें निर्वाहाची व संपत्तीच्या भयानें उन्मत्त होण्याची जी काळजी ती कृपाळू परमेश्वर दूर करितो.

---

नाहिं झाला जया वेळ, सानकाशीं लिहावया,
सुज्ञां दोष क्षमेंसाठीं, नमितों म्हणुनी अजा
॥ १० ॥

---

नोटिस—कृष्णाप्पा व भाऊ नानाअप्पा वाणी लवरे राहणार नाळापुर पेठ यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे कडेस खातेबाकी व पुढ्यावद्दल रुपये ३७५ व व्याज येणें असून तुमच्या करारावर पांच महिने झाले परंतु तुम्ही कांहींच वसूल दिला नाहीं करितां ही नोटिस केली आहे तर नोटिस पावल्यापासून तुम्ही ८ दिवसांत दुकानावर रुपये पाठवावे नाहींपेक्षा नोटिशीनें खर्चासुध्दां तजवीज करून रुपये घेण्यांत येतील कळावें तारीख १९ माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही) लक्ष्मण अप्पा देवालिंग अप्पा दस्तुर खुद.

---

नोटिस—रायभान वल्लद भवानिंग पाटिल मौजे वाटवडी बुद्रुख तालुके बाळापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्या शेतांत माझ्या चवथ्या हिशाप्रमाणें मी किस्तमारी लागवड वगैरे करून माझा मनुष्य शिवाजी यानला सर्वोपरी माझे वतीनें मालक म्हणून ठेवून माझा खटला पातुर तुरकाचें यथें असल्याकारणानें मी तेथें गेलों. पुढें चवथ्या हिशाचा माल—

कापुस खंडी १ ज्वारी १ खंडी,
मण, कालव ९ मण हरभरे १॥ मण
प्रमाणें माल तुम्हास आमच्या मनु
मजुरीतला असतां दिला नाहीं व आ
निर्वाहाकरितां तुम्ही सर्व माल घे
ला ही गैरकायद्याची गोष्ट केली. त
झा पुतण्या राजमल माल मागण्यास
असतां दिला नाहीं. पुढें मी तुम्हास
क्ष मागतां तुम्ही चाळवणी केली
आजपावेतों मी वाट पाहून थकलों,
ही नोटिस दिली आहे तर सालमजकु
भ.वाप्रमाणें एकंदर रुपये १११ व
शीचें खर्चासह उत्तर आसे १५ दिव
जर न द्याल तर, तुमच्यावर बाटेल
योग्य तजवीज करून माल अगर
सुध्दां रुपये घेण्यांत येतील हें
समजावें. ही तक्रार निनाकारण आ
तुमच्या त्याच शेतांत हल्लीं तीन वर्षें
मी वहिवाट करून मालवगैरे घेऊन
आलों कळावें. तारीख १८ माहे
सन १८७३ इसवी.

(सही) रायभान वल्लद भाऊ
पाटिल वस्ती वाटवडी
चे हातची निशाणी रे

---

नोटिस—रावजी वल्लद कृष्णा मा
वस्ती मौजे खेलडे व नाशिंग पाट
तालुके अकोले जिल्हा अकोलें यां
नोटिस देणार भागाई मर्द रावजी मा
वस्ती मौजे राहित तालुके अकोलें
ल्हा अकोलें मी नोटिस देते असी कीं
शें तुझपाशीं लग्न झाल्यापासून
१५ पधरा वर्षेपर्यंत संसार झाला
आतां तूं मला दोन वर्षेपासून
दिलें मी घरीं आले असतां तूं घरांत
त नाहींस म्हणून लावतोस व मी फा
त लिहून मागतें तीही देत नाहीं व
एकवार पंचाईत करून फारखत दि
ती पंचांत लिहिलेली खरी परंतु सक
स्टांप कागदावर नसल्याकारणानें काय
माणें ती कामीं पडत नाहीं त्यावरून नो
सद्वारें कळवितें कीं, तुम्हाला ही नो
पोचल्यापासून आठ दिवसांत पंचांत स
र स्टांप कागदावर फारकती लिहून
व मला सोडल्यास सुमारें दोन वर्षें झा
तर दोन वर्षांचा माझा पोटखर्चे दर
३ तीन रुपये प्रमाणें महिने चोवी
रुपये ७२ बहात्तर हे रुपये व फार
असे जातीचे पंचांत येऊन दिलीं पाहि
सदरहू मुदत चुकल्यावर तुमचा वा
रद्द करवीन व सदरहू रुपये मी दिव
कायद्याप्रमाणें घेईन. मजविषयीं
कांहीं तुम्हाला बोलणें असेल तर मु
च्या आंत पंचांत अगर नोटिसद्वारें क
व मजला घेऊन जा मुदत चुकल्यावर
एक वाक्तींत तुमची सबब न ऐकतां
सरा विवाह करण्याची परवानगी मिळ
व रुपयेही दिवाणांत फिर्याद करून घे
सदरहू नोटिस मी आपले राजीखुशीनें
अकल हुशारीनें लिहून दिली तारीख
माहे मार्च सन १८७३ इसवी.

[सही] भागू मर्द रावजी पाळी
णार राहित

---

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळ
फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा.

Registered No 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुकस्त ७ अकोला, रविवार ता० ३० मार्च सन १८७३ इ० अंक० १३

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| सुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

गजकरणाचें औषधाच्या डब्याची किंमत ०६ आणे. थंड पाण्यांत भिजवून गंधाप्रमाणें झाल्यावर उटणे सारखे लावावें.

शिवलीलामृत अध्याय ११ व व्यंकटेशस्तोत्र

असें एकत्र पुस्तक कोणी भाविक गृहस्थांनीं आमचें छापखान्यांत टाइपावर छापविलें त्याच्या कांहीं प्रती विकावयास आहेत किंमत ०६ आणे व डाक हाशील ०१

NOTICE.

Notice—We the undersigned hereby request and inform our costomers that any bill without the usual Guzerathee signature of Mohmed Hassum or his brother should not be recognised as true. Our costomers will please consider all bills prepared as null and void when they do not bear the signature of the brothers mentioned above.

Akola 17th March 1873 } Mohmed Hassum

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### मंडळींतला.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. कां पत्रकर्ते महाराज तुह्मी मंडळींतले किंवा मंडळी बाहेरचे? तुह्मी ह्मणाल मंडळींतले ते कशानें होतात; तर ऐका- हरीतशी थट्टा सोसली पाहिजे. वधींगमस्त झाली तर तींत द्रव्याची मदत दिली पाहिजे, नाच, रंग, तमाशे, यांत द्रव्यानें साह्य दिले पाहिजे चारघटका हा हा ही ही करीत व तंबाखुच्या पिचकाऱ्या सर पिचकाऱ्या माऱ्या पाहिजेत. थट्टा सोसणें ती काया वाचा मन या तीन प्रकारानें सोसावी लागते. पहा तुह्मास दूर होत असल्यास तुह्मी मंडळींतले, नाहीं तर तुसडे, रागीट, हलकट, हिरवट: मोठासआया असें गणले जाल हो! विचार करा. विनय, देशाचार, लोकाचार यांतील ग्राह्याग्राह्य ज्ञान तुह्मांस असलें ह्मणून मंडळींतले होणार नाहींत.

तुह्मी ह्मणाल असें का विचारतां तर सांगतो ऐका. लक्ष्य द्या. हल्ली अशा प्रकारच्या मंडळ्या निघाल्या आहेत कीं त्यांत ज्या जाते न जावें असा माझा विचार आहे तुह्मास सूचित पडतो. परंतु पारतंत्रता जी हिंदूंच्या मागें हात धुवून लागली आहे ती यांत चुकतें असें नाहीं ती नौकरींत धर्मांत जशी आहे तशीच स्नेहांत किंवा मंडळींतला होण्यास आहे तर आपण अडचणी सोसून मंडळींतले व्हाल असें वाटत नाहीं. कारण त्या स्थितींत औषधावांचून दुसरा नकाच नाहीं.

आत आपणावर कोणतें संकट आलें आहे, आपणा करितां सरकार देशहितेच्छु काय करितात, राज्यकर्ते आपणा विषयीं कोणती योग्यता मानून आपणाशीं वर्तत आहेत, दिवसेंदिवस आपल्यास कोणत्या चाली धरिल्या पाहिजेत. आपल्या रीतिभातींत कसा व कोणता फरक केला पाहिजे, इत्यादि अनेक देश हिताची व आपल्या कल्याणाची वार्ता ह्यास मंडळींत ज्यास माहीत नाहीं. किंवा काळजी नाहीं. आह्मी फक्कड, आह्मी मंडळींतले, आह्मी सगळे ज्ञाते व बाकीचे असे. असे आपणा विषयीं समजणारे ह्या मंडळींतल्यांत फार तशांत अल्प काळांतच का ह्या धाकट्या बाईची कृपा झाली तर मग त्याच्या पाणी पणांत गाकाशाही ठेंगणें, असें होड हळकुंडानें पिवळे होणारे लोक एखाद्या गरजूनें अगर गरिबानें व्याज स्तुति केल्यावर इतके फुगतात कीं, सांगतां पुरवत नाहीं. यांचें मुख्य कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे ह्या नवृत्ति हवे तसें होवे त्यास चेळावें हवी तशी थट्टा करावी ती त्यानें सहन केली पाहिजे. कारण एकतर हे मानी, ज्ञानी, धनी पडले; दुसरे सहन न करावें तर मंडळीच्या बाहेर व्हावें.

ह्मण आहे कीं" गीत हास्य विनोदेन कालो गच्छति धीमतां" पण ह्याचा उपयोग ह्या मंडळींतल्यांत चालतो असा का? छी छी यांनीं" थट्टा करणें मित्रपणाचा शत्रु आहे." या वाक्यात विचार करावा, त्या जवर जे जे वारंवार पश्चात्तापाचे प्रसंग येतात ह्यानेच याचा शेवट होणार आहे. म्हणून सावध व्हावें.

काय चमत्कार आहे !!! मंडळींतले होऊन असल्या अप्रयोजक प्रकारें आपल्यास करमणूक करून घ्यावी त्या पेक्षां मंडळींतले होऊन प्रौढपणा धरून स्वदेशहितार्थ, पुढें होणाऱ्यास चांगला कित्ता दाखविण्याच्या हेतूनें आणि देशहिताची कामें केल्यानें आपणास करमणूक होणार नाहीं काय? किंवा न अलौकिक होणार नाहीं काय?

दुसरें, एक असें सांगणें आहे कीं जे आपणास थोर समजतात व माझा वरील मताप्रमाणें वागण्याची इच्छा धरितात त्यानीं अशा अल्पकालंमतवाल्यास उपदेश करावा त्यांस असह्य व्हावें आपली शास्त्राच्या कामांत गर्विता दाखवावी हेंच यांस भूषण होय

पत्रकर्ते महाराज हें विचार आज मला कां सुचले हें उदाहरणासह पुढें आपल्यास कळवीन. पत्र विस्ताराची माफी मागून पत्र पुरें करितों. तारिख २१ मार्च सन १८७३ इसवी.

मंडळींतला
"क्ष"

[पुढें चालूं]

### वऱ्हाडसमाचार

मिती चैत्र शुध्ध २ शके १७९४

## सावकार व व्यापारी लोक यांस सूचना

मुंबई, मद्रास, वायव्य प्रांत, व मध्य प्रदेशवगैरे इलाख्यांतून टपालद्वारें पाठविलेल्या हुंड्या मध्येंच लबाडीनें काढून घेऊन त्याचसंबंधानें खोटें कागदवगैरे तयार करणें व भलताच मनुष्य आपण आहों अशी भुलथाप देऊन पैसा घेणें असे प्रकारचे गुन्हे फार होऊन नोभाटाही विशेष झाला तसेच अशा लबाड्या बाहेर पाडाव्या या हेतूनें मेहरबान टरटनासिंत साहेब यांस तपास करण्यास नेमिल्यावरून मशारनिल्हे साहेब यांनीं या बाबदींत निरनिराळ्या लबाड्या, ज्यांनीं उदाहरणे वगैरे आपल्या रिपोर्टांत दिलीं आहेत, तीं वाचकांकरितां खालीं लिहितों.

१ला प्रकार—इंदुराजवळील धारगांव येथील (अ) नावाच्या व्यापाऱ्याची मुंबई येथील ब नावाचे पेढीशीं अडत होती. अ नें बकडे अडीच अडीच हजारांच्या च्यार हुंड्या पाठविल्या. टपालवाटें या हुंड्या मुंबईस पोंचण्यापूर्वीं रस्त्यांतच त्यांतील २ हुंड्या व पत्र कोणीं चोरून घेतलें व बाकीच्या दोन हुंड्या चोरून घेतलेल्या पत्रांत जो मजकूर होता तसाच सर्व; परंतु दोनच हुंड्या पाठविल्या आहेत अशा अर्थाचा लिहून एका बनाऊ पत्राबरोबर त्या हुंड्या मुंबईस पाठविल्या. या बनाऊ पत्रावर हुबेहूब अ च्या सही सारखी सही केली होती. बने हें पत्र पोंचल्यावर बरें त्याणें दोन्ही हुंड्या स्वीकारून पांच हजार रुपयांच्या हुंड्या पोंचल्या व कबूल केल्या असें अला पत्र लिहिलें. रस्त्यांत टपालांतून तें पत्र कोणीं धरून पांच हजारांचा अंक होता तो अगदीं बेमालूम मोडून टाकून दहा हजारांचा केला, व असें करून आपल्या दहा हजारांच्या हुंड्या मुंबईस पडल्या असें अची त्या पत्राद्वारें समजूत करून दिली.

सुमारें चवाळीस दिवस पर्यंत चारीचे बनाऊ कागदवगैरे करण्याचें काम चाललें. यांतील हेतु असा कीं, पांच हजार रुपयांची चोरी छपवावी व आपण चोरलेल्या हुंड्या पटवून घ्याव्या.

हे पांच हजार रुपये आपणास मिळवाची लबाड लोकांनीं अशी तजवीज योजिली कीं ठकानीं अ च्या सही सारखी सही बत लिहिलेल्या पत्रांत केली व ह्या पत्रांत असा मजकूर लिहिला कीं, आह्मी ह्मणतो अनें आमचा एक क नावाचा मुनीम पुण्यास पांच हजार रुपयांच्या हुंड्या देऊन खरेदी करितां पाठविला होता व आमचो ह्मणतो अची ओळख पुण्यास नसल्यांकारणानें कास हुंड्यांचे रुपये कोणी देईना. व ह्यापासून भलताच अगर खात्री मागूं लागले सबब आपणास विनंती करण्यांत येत आहे कीं आपण क विषयीं खात्री करावी व स अशा प्रकारचीं पुष्कळ खोटीं पत्रें गेल्या नंतर बनें आपले पुण्याचे अडत्याचे मार्फत (क) विषयीं खात्री केली परंतु अडत्यास असें कळविलें कीं, पैसा आपले सर्व ठाणा याबद्दल कस जेव्हां वाटलें कीं, आपले विषयीं कांहीं संशय उत्पन्न झाला आहे त्या वेळेस त्याणीं त्या रकमे पैकीं चारशे रुपये उसनवार ह्मणून मागून घेऊन कृष्णमुख केलें [ह्मणजे नाहींसे झाले] या सर्व प्रकारावरून दिसून येईल कीं, ज्या हुंड्या प्रथम बकडे पाठ, केल्या होत्या त्या हुंड्या लबाडीनें चोरून घेऊन बकडूनच पैसा पाठविण्याची भयंकर तजवीज योजिली.

दुसरा प्रकार (अ)नावाचा ठक गांवीं नाबद एथील [ब] नावाचे व्यापाऱ्याकडे जाऊन ह्मणाला कीं मी एक मोठा व्यापारी आहे व मला या ठिकाणीं कांहीं खरेदी करितां नक्त पैसा पाहिजे. सबब मुंबईतील एक पढ्यांत [क] नावाचे दुकानावर मी हुंडी लिहितो. आहे. ती तुह्मी आमच बाजार भावाप्रमाणें वेचन करून द्यावी. (ब) नें ती हुंडी खरेदी करून घेतली व त्या हुंडीचा पैसा मी माझे मुंबई एथील (ड) नावाचे अडत्यास पत्र लिहून (क) याजला हुंडी कबूल आहे कीं, नाहीं याजविषयीं तपास केल्यावर, करून तिकडून जबाब आल्या नंतर पैसा देईन असा करार केला (ब) नें डकडे हुंडी पाठविली व कांहीं वेळानें [ड] कडून त्यास उत्तर हीं आलें कीं सदरहू हुंडीचा पैसा आह्मी (क) पासून घेऊन तुमचे ह्मणजे [ब] चे नावें जमा केला आहे. लागलीच (अ) पुन्हां (ब) कडे येऊन ह्मणाला कीं मी (क)वर जी हुंडी लिहिली होती तिची रक्कम त्यानीं [ड] स देऊन हुंडी भरपाई घेतली आहे व हुंडी जाकडेस परत पाठविली आहे सबब आतां मला पैसा मिळावा [बनें] पुन्हां डस असें प

न लिहिलें कीं तुह्मी हुंडीची रक्कम पंधरा शें रुपये (क) पासून घेऊन आमचे नानें जमा केली आहे व हें कळल्यावर (ड)नें असा जबाब दिल्हा कीं, मी तुम्हास असें लिहिलें नाहीं; तुह्मी ज्या हुंड्या पाठविल्या त्या एथें स्वकारल्या गेल्या नाहींत म्हणोन मी त्या तशाच परत पाठविल्या. असें पत्र आल्या नंतर खालीं लिहिलेला लबाडीचा प्रकार उघडकीस आला. तो असा कीं हुंडी कबूल करित नाहीं करित परता पाठविली आहे असें मजकुराचें जें (ड)चें पत्र होतें तें कोणी चोरून त्या ठिकाणीं बनाऊ पत्र घेऊन (अ)नें [ड]ने भरपाई सुद्धां जी हुंडी हजर केली होती तीही बनाऊच होती.

तिसरा प्रकार रायचूर एथील [ब] नावाचे व्यापाऱ्याकडे [अ] येऊन म्हणाला कीं काहीं पैसा पाहिजे सबब मी वाशीं एथील (क) नावाचे इसमावर लिहिलेली सहा रुपयांची हुंडी तुम्हांस विकतों. (ब)नें हुंडी खरेदी करून आपले बार्शीचे (ड) नावचे अडत्या कडून हुंडी स्वीकारली गेली असें पत्र आलें म्हणजे हुंडीचा पैसा देईन असें कबूल केलें. (ब)नें ती हुंडी पत्र लिहून (ड)कडे पाठविली रस्त्यात सहा रुपयांची हुंडी काढून घेऊन त्या ठिकाणीं त्याच इसमांनें व त्या दुकानावर लिहिली असे मतलबाची एक दहा रुपयाची हुंडी ठेविली. व लगतचे पत्रांत सहा रुपये होते ते काढून दहा रुपये केले. ती बदललेली हुंडी [ ड ] स जाऊन पोहचल्यावर एक मनुष्य जो ह्मणाला माझें नाव ( क ) आहे व अगें रायचुराहून मजवर हुंडी लिहिली आहे त्याबद्दल हे दहा रुपये द्या असें ह्मणाला. त्यावरून ( ड )नें रायचुरास बस पत्र लिहिले व दहा रुपयांचे हुंडीचा पैसा आला असें लिहिले पुढें रस्त्यांत १० अंक होता तो मोडून ६०० चा केला. असें प्रकारें लबाडीनें बदललेलें ( ड ) कडील पत्र आपल्यास येऊन पोहचल्यावर अ नें बकडे येऊन आपण प्रथम क वर लिहिलेली ६०० रुपयाची हुंडी ड च्या बनाऊ भरपाईसुध्धां हजर केली व असेंही कळविलें कीं, (क) नें हुंडी स्वीकारून परत केली आहे. असें पाहिल्यावरून अ स ६०० रुपये दिले व असें करून आपला ५९० रुपयाचा तोटा करून घेतला या कामांत लबाडी झाली असें पुष्कळ पत्रव्यवहार झाल्यावर दिसून आले.

असे प्रकारच्यां लबाड्या चालत असल्याचे मि० स्मिथ साहिबाचे उद्योगानें दिसून आलें आहे. सबब आमचे प्रांतांतील व्यापारी लोक या गोष्टिविषयीं चांगले प्रकारें विचार करून सावध गिरीनें आपले हुंड्यांचें काम चालवितील तर फार चांगले होईल. सावकार लोकांनीं आपल्या हुंड्या व तत्संबधाची महत्वाचीं पत्रें रजिष्टर पाकिटांत पाठवावीं हें फार चांगलें आहे. तसेंच ज्या पाकिटांत आपणास अशीं पत्रें वगैरे येतात ते पाकीट फार सांभाळून ठेवावें. कारण त्या पत्राचे पाकिटावरील छाप्यावरून कोणते पोस्ट आफिसांत लबाडी झाली हे कदाचित् पाहतां येईल.

तसेच ज्या ठिकाणीं संशय येईल त्या वेळेस तारायंत्राचा फायदा घ्यावा सारांश वरील प्रकारावरून कसे प्रकारे लबाडी होत आहे हें दिसून येईल सबब त्यापासून आपला बचाव होण्याकारितां त्याणीं जरूर त्या युक्ती योजाव्या.

## वऱ्हाड

मि० जे बालंटाईन जंगल खात्याचे सब असिस्टंट कानसेरवेटर यांनी हिंदुस्थानी भाषेची पहिली परीक्षा पास झाली.

—000—

स्पेशियल माजिस्ट्रेट | ह्मणजे वऱ्हाडांत जे आनररी माजिस्ट्रेट आहेत यांच्या कामा विषयीं रेसिडेंट साहेबांनीं असा ठराव केला आहे कीं पोलिसाकडून त्यांकडे चौकशीस जाणारे खटले त्यांच्या काम करण्याच्या इच्छेहून अधिक जाऊ नयेत. व त्यांस गैरसोय होऊ नये. याकरितां डिपुटि कमिशनरांनीं आनररी माजिस्ट्रेटास पोलिसाकडून येणारे मुकदमे चालविण्याविषयीं त्यांची खुषी आहे किंवा नाहीं त विचारावें. व त्यांच्या मर्जीनुरूप पोलिसास खबर द्यावी. तसेंच आनररी माजिस्ट्रेट पोलिसाकडून येणारे खटले चालवित असतांना आणि त्यांस आजारी, गावास जाणें वगैरे हरकती येतील तर त्यांनीं पोलिसांस कळवित जावें. जे फिर्यादी लोक आनररी माजिस्ट्रेटांकडे आपल्या फिर्यादी नेण्यास खुशी असतील व त्या फिर्यादी त्या माजिस्ट्रेटास चालविण्यास कायदेशीर असतील त्या त्यांनीं चालवाव्या, परंतु आपले आप्त, नोकर वगैरे संबंधांतील मनुष्यांच्या फिर्यादींचे इनसाफ त्यांनीं करूं नयेत. आनररी माजिस्ट्रेटास वृथैव शीण होऊ नये. त्यांच्या इच्छेनाहेर त्यांस काम पडूं नये व त्यांचें वैभव कमी होऊ नये अशी सरकारची इच्छा आहे असें रेसिडेंट साहेब यांनीं या ठरावांत स्पष्ट करून दाखविलें आहे.

—000—

मेजर बेल साहेब अफिशियेटिंग कमिशनर या आठवड्यांत बुलढाण्यास सेशनाकरितां गेले होते. दोन मुकदमे चालवून शुक्रवारीं परत आले. या आठवड्यांत वाशिमाकडे जाण्याचा विचार आहे.

—000—

अकोल्यास देवीची सांत बरीच आली आहे. मिडलक्लास स्कुलातील १० १२ मुलांना देवी आल्या आहेत असें कळतें.

—000—

मि० क्रांडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर एथें येऊन आतां उमरावतीकडे गेले. तेथून चिखलदऱ्यास जातील.

—000—

मलकापुरचे पोलिस इन्स्पेक्टर मि० काक्लिन साहेब यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली. त्यांचे कामावर रा. रा. कृष्णराव सखाराम यांस नेमिलें आहे.

—000—

थोडे दिवसांपूर्वी उमरावती हायस्कूला विषयीं गोमाजी कापशे या सहीचें एक पत्र आमचे पत्रांत प्रसिद्ध झालें असल्याचें वाचकांस आठवत असेल. आतां आह्मांस कळविण्यास आनंद वाटतो कीं त्या प्रकरणाची दाद लागली. ह्मणजे मि० क्रांडी साहेब डायरेक्टर यांनीं आह्मास कळविलें आहे कीं, आमच्या पत्र लिहिणारानें सदरहू हायस्कुलासंबंधी जे काय दोष व न्यूनता आहेत त्या डायरेक्टर साहेबांस पत्र पाठवून अगर स्वतां भेट घेऊन कळवाव्या; ह्मणजे डायरेक्टर| साहेब त्यांच्या दुरुस्तीविषयीं तजवीज करितील. ही गोष्ट फार चांगली आहे. व आमच्या बातमीदारांनीं याप्रमाणें अवश्य करावें अशी आमची त्यांस शिफारस| आहे. डायरेक्टर साहेब चौकशीस व बंदोबस्तास सिद्ध असतां जर कोणी त्यास दोष कळविले नाहींत व उगीच वर्तमान पत्राच्या आडून गोळ्या मारल्या तर ते त्यांचें करणें रास्त न समजलें जातां खास मिद्वेषाचे आहे असें समजलें जाईल. या गोष्टीचा गोमाजी कापशे यानीं विचार करावा. व त्यांनीं आणि उमरावती हायस्कुलाच्या शुभेच्छु लोकांनीं त्यांच्या कामाळ्या खऱ्या असल्यास या वेळीं स्तब्ध बसू नये असें आमचे आग्रहपूर्वक त्यांस सांगणें आहे.

—000—

आह्मांकडे एका अकोला हायस्कूल पगारी विद्यार्थ्याचे पत्र आलें आहे त्यांत तो ह्मणतो कीं" आह्मां हायस्कुलांतील पगारी विद्यार्थ्यांस पूर्वी प्रमाणेंच पगार उशिरां मिळूं लागला आहे. एका महिन्याचा पगार दुसरा महिना संपे तों पर्यंत मिळत नाहीं पूर्वी एकवार मी आपले शेवेसी हीच फिर्याद घेऊन आलों होतों व त्यावर काहीं. महिने पगार नियमित काळीं मिळत असे परंतु आतां पुन्हां पूर्ववत् सुरूं झालें. तर आपण हें छापून डायरेक्टर साहेबांचे कानावर ही गोष्ट जाईलसें कराल तर सर्व विद्यार्थ्यांचें कल्याण केल्याचें श्रेय आपणास येईल."

—000—

एलिचपूर—या आठवड्यांत उष्णता दिवस दिवस फारच होत चालली आहे. आरंभीच या ऋतूंनें इतका कडक अमल बसविला आहे तेव्हां पुढें आणखी किती होईल तें होवो. रोग वगैरे कांहीं नाहीं. बाजार भावांत फारसा फरक नाहीं.

—000—

एथील स्मालकाज कोर्ट कमी होण्याची अफवा बरीच उडाली आहे सदरहू कोर्ट मोडल्यानें आमचे फार नुकसान होईल ह्मणोन करजगाव, चांदूर एलिचपूर, परतवाडा वगैरे गांवचे लोक अर्ज करणार आहेत.

—000—

एलिचपूर येथील आनररी माजिस्ट्रेट भगवंतराव नरहर यांजला शहर एलिचपुर खेरीज गांवचें फौजदारी काम चालविण्या विषयीं अधिकार होता तो कमी होऊन फक्त शहरापुरतेच काम चालविण्याचा ठराव झाला आहे.

—000—

नवीन तलाव दर्यापुर तालुक्यांत ज्यांत ६० फूट पाणी राहणार असा मासल्याचा बांधण्याचा हेतु आहे व त्यास च्यार लक्ष रुपये खर्च लागेल असा अजमास आहे व तो बांधला गेल्यावर त्याचे पाण्यापासून बागाईत जमीनही पुष्कळ होणार आहे असें समजतें.

—000—

मे० कमिशनर साहेब बहादुर व डिपुटि क० साहेब बहादूर यांच्या स्वाऱ्या चिखलदऱ्याकडे पाहाडांत फिरत आहेत.

म. सि.

—000—

इचलकरंजीकर नाटकवाल्यानीं गेल्या सोमवारीं युरोपियन लोकांकरितां एक मुद्दाम नाटक केलें. त्यांत बेदर बादशहाचा फार्स व प्रमिला स्वयंवर हीं आख्यानें होती. नाटक हिंदुस्थानी भाषेंत केलें. स्त्रियांचे लढाईचे पेहराव, तरवारी खेळण्याचें कौशल्य व बेदरच्या बादशहाची कचेरी हीं पाहण्यासारखीं होतीं. कमिशनर साहेब, डिपुटि कमिशनर साहेब, डायरेक्टर साहेब आप आपल्या पत्नीसह वर्तमान नाटक पाहावयास गेले होते व दुसरेही कित्येक युरोपियन गृहस्थ गेले होते. नंतर बुधवारीं रासक्रीडा व वीरभद्र हें नाटक झालें. काल शनवारीं रात्रौ राधाविलास व नृसिंह अवतार हे खेळ झाले. या नाटकवाल्यास आतां दीडशाच्याही वर रुपये दर खेळास मिळूं लागले आहेत. हें त्यांचें सुदैव होय.

## मागाहून आलेली नोटिस.

राजश्री गणू वलदे कंदतानी पाटिल कसेंब शेगांव तालुके खामगाव यांस खालीं सही करणार| आशी नोटिस देतो कीं, तुमचे आमचे नावची दुकान सेगाव येथें होती. त्या दुकानांतून भगवान माळी शेगावकर याजला पुंजी देऊन आपण व्यापार करविला. त्या व्यापारांत आपलें दुकानची रक्कम असून ती भगवान याणें अद्यापि दिली नाहीं म त्या दुकानांत कांहींअशीं आमचा हिस्साही होती त्याचप्रमाणें भगवान याणें चालविलेले व्यापारांतील आपला नफाही त्याणें दिला नाहीं भगवान याजकडून नफा व मुद्दल रक्कम येणें आहे तिची मुदत कायद्याप्रमाणें संपत आली असून तुह्मी त्याला मिलाफ होऊन आमचें नुकसान करूं पहातां आणि रक्कम येण्याची तजवीज कांहींच करीत नाहीं. यास्तव हल्लीं त्याजवर आम्ही आमचे हिश्शाचे रकमेची फिर्याद केली आहे परंतु दुकानची जितकी रक्कम येणें ती सर्व व नफ्याची उभतांचे हिश्शाची रकम एकदम मागावी. आणि दावा उभतांनीं चालवावा हे योग्य असून कोर्टाचाही हुकुम आहे कीं तुमचें नाव फिर्यादींत दाखल पाहिजे. यास्तव या नोटिसीनें असे कळविण्यांत येते कीं, भगवान याजवर जी आम्ही फिर्याद केली आहे त्या फिर्यादींत तुह्मास सामील झालें पाहिजे व आह्माशीं मिळून दावा चालविला पाहिजे व खर्चही आपले हिश्याचा दिला पाहिजे. जर याप्रमाणे तुह्मी ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत करणार नाहीं तर तुह्मी दाव्यांत सामील होण्यानें आमची रकम मुदतीबाहेर जाईल अथवा दुसरे कोणतेंही आमचें नुकसान होईल तर ती सर्व रकम व नुकसान भरून द्यावें लागेल. ह्या नोटिसीचें उत्तर लवकर द्यावें. या नोटिसीचा, खर्च

तुह्मी आह्मास द्यावा. तारिख २८ मार्च सन १८७३ इसवी.

[सही] इच्छाराम हुकासराय दस्तुर खुद.

## वर्तमानसार

ह्मैसुर प्रांतांत आजपर्यंत कामदारांना सुपरिंटेंडेंट, डिपुटि सुपरिंटेंडेंट, व असिस्टंट सुपरिंटेंडेंट ह्मणत असत ते यापुढें कमिशनर, डिपुटि कमिशनर व असिस्टंट कमिशनर ह्मणत जावें असा सरकारचा ठराव झाला.

मि० पी. एस मेलविल यांस पंजाब चीफ कोर्टाचे आफिशियेटिंग जज्ज, नेमिलें; कारण मि० जे. एस क्यांबेल यांनीं रजा घेतली.

यावर्षीं बजेटचें पत्रक तयार करित नाहींत अशी बातमी आहे.

या महिनाअखेरीपासून इनकम ट्याक्स अजी बंद होणार असें आनंदाचें वर्तमान समजतें.

सुरतेच्या म्युनासिपल कमिटीनें वर्षांत आगी लागून शहरचा खराबा होतो ह्मणून ठराव केला आहे कीं नबूबें अथवा लाकडाचेंघर यापुढे कोणी बांधू नये. काड्याच्या पेट्या १०० हून, अधिक कोणी बाळगू नयेत, ४० रत्तलाहुन अधिक बंदुकीची दारू कोणी घरांत बाळगूंनये.हें नियम मोडतील त्यांस शिक्षा होईल असेंही ठरविलें आहे.

गायकवाड सरकारानें विसनगर एथें शाळा स्थापन केली आहे.

अमदाबादेस कालेज असावें अशी तेथील लोकास उत्सुकता झाली आहे. व ते त्याकामाच्या खटपटींत लागले आहेत. ७०००० रुपये वर्गणी त्यांनीं जमविली आहे तीनलाख रुपये या कामास लागणार आहेत. बडोद्यास त्यांनीं मदत मागितली परंतु कांहीं फळ झालें नाहीं असें समजतें.

विजयनगरच्या राजांनीं इंजानियरिंग शाळेंत मुलांनीं कारागिरीचा अभ्यास करावा ह्मणून १५० रुपये महिन्याच्या कांहीं स्कालरशिप्स ठरवून दिल्या आहेत.

मि० रेमंड वेस्ट यांस मुंबई हायकोटांत आक्टिंग जज्ज नेमिलें. ही नेमणूक स्टेट सेक्रेटरीकडून कायम व्हावयाची असते.

मि० जे. एम. क्यांबेल यांस मुंबई इलाख्याचे आक्टिंग अंडर सेक्रेटरी नेमिलें.

मि० एफ. डी. मेलविल यांस सिंध प्रांतात आक्टिंग जुडिशिअल कमिशनर नेमिलें.

नगर जिल्ह्यांत श्री० रा० अण्णासाहेब व दादा साहेब विंचुरकर यांस फर्स्ट क्लास माजिस्ट्रेटचे अधिकार दिले.

बाबु सत्येंद्र नाथ टागोर अहमद नगरास स्माल्काज कोर्टाच्या जज्जाचें जागेवर जाऊन रुजू झाले.

मि० एम. जे. शा स्टिवर्ड मुंबईचें कलेक्टर यांस एक वर्षाची फर्लो रजा मिळाली.

मि. विनायक वासुदेव मुंबई सरकारचे ओरियंटल ट्रान्सलेटर यांणीं एक महिन्याची रजा घेतली.

फ्रान्स देशांत शाईशिवाय छाप ण्याचें काम व्हावें अशा विषयीं कांहीं शोध चालला आहे.

पंजाब प्रांतात गुदस्त सालीं सुमारें ७ लक्ष एकर जमिनींत कापसाचा पेरा झाला होता.

विलायतेंत हिंदुस्थानच्या मेडिकल सरव्हिसची परीक्षा झाली तींत मुसलमान गृहस्थ मि० एफ ए. अहमद हे पास झाले व त्यांचा ८ वा नंबर आला. अशा कामांत हेच पहिलेच मुसलमान गृहस्थ होते.

भविष्य—शके १७९५ सालांत होणारे गोष्टीं बद्दल एकानें भविष्य केलें आहे तें खालीं लिहिल्या प्रमाणें या सालीं अप्रसंगिक पाऊस पडेल. कांहीं पीक येणार नाहीं. निरानिराळ्या राज्यांत भांडणें लागतील. व्यापारी लोकाचें फार नुकसान होईल. आणि सर्व जमीन बर्फानें व्यापिली जाईल. वर्षांतीं पुष्कळ पाऊस पडेल. खरबुजें, कलिंगडीं व द्राक्षें पुष्कळ पिकतील, गाईं दूध फार कमी देतील. व वनपशू तुफानाचे योगानें मरतील. रोगाचा फैलाव पुष्कळ होईल. राज्यांत युद्धप्रसंग होईल. सूर्य व चंद्रग्रहण अशीं दोन ग्रहणें येतील. पूर्वेस व पश्चिमेस आगीनें पुष्कळ नुकसान होईल. धरणीकंपामुळें पुष्कळ प्रांताचें नुकसान होईल. जुगार. चोऱ्या फार होतील. मौल्यवान वस्त्रें महाग होतील थंडी फार थोडी पडेल. पुष्कळ मुलें मरतील. तापाची साथ फार येईल. मुंग्या व दुसरे किडे फार होतील. बगदाद, रोम व त्याजवळचे दुसरे प्रांत येथें पुष्कळ लोक मरतील. यूरोपांतील तुर्की लोक व ग्रीक लोक यांच्यांत लढाई लागून तुर्कांचा जय होईल. बो. सु.

मुंबई प्रदर्शनाची फी आतांआठ आणे केली आहे.

रावराजे दिनकरराव यांनीं धोलपुरच्या संस्थानचा कारभार कांहीं त्याजबदल न घेता चालविण्याचें पतकरलें आहे, असें कळतें

मुंबईंतील गृहस्थ रा. रा. आनंदराव सखाराम नर्वे बी. ए. यांस इंदुरसरकारानीं जज्ज नेमिलें. यांस प्रथम अडीचशें रुपयें पगार मिळेल तो क्रमानें च्यारशेंपर्यंत वाढेल असा ठराव झाला आहे असें कळतें. हे गृहस्थ यंदा एल. एल. बी च्या परीक्षेस जाणार तेव्हां गुणानीं व वर्तनानें सर्व प्रकारें ते योग्य आहेत.

पाण्यांत बुडालेल्या मनुष्याचें पुनर्जीवन—भडोचेस मुसलमानाची मुलगी खोल विहिरींत तारिख ११ रोजीं पडली आणि तिला कांहीं थोड्या वेळानें बाहेर काढली तों ती अगदीं मेल्यासारखी दिसली. तिला तावडतोब सिविल आस्पितलांत, नेलें. तेथें डाकटर लारेन्स यांनीं जरी ती अगदीं मेल्यासारखी दिसली तरी उद्योग चालू केला. तिचें शरीर, जमिनीवर घोळसलें, अंग चोळलें ऊष्ण पाण्यानें स्नान, घातलें व शेवटीं विद्युल्लतेच्या यंत्राचा प्रयोग केला. सारांश असा सारखा सकाळच्या दहापासून च्यार वाजे तों पावेतो उद्योग केला तो शेवटच्या उपायाचा चांगला अमल, बसून, च्यार वाजतां ती सावध झाली. तिला आस्पितलांत आणली तेव्हां तिचें पोट फुगलेलें होतें. सहा वाजण्याच्या वेळेस घरीं नेली आणि मग तिला चांगली गाढ झोंप येऊन दुसऱ्या दिवशीं ती अगदीं चांगली झाली.

इं. प्र.

नामदार सर फिलिप उडहौस मुंबईचे गवर्नर यांची स्वारी मुंबईस जाऊन दाखल झाली.

मि० दादाभाई नवरोजी हे पुढील महिन्यात विलायतेस साक्ष देण्यास जाणार आहेत.

हल्लीं पार्लमेंट सभेचे, कमिटीपुढें सर चार्लस त्रिवेलियन साहेबांची साक्ष चालली आहे. हे साहेब मद्रासचे गवरनर असतां उत्पन्नाबरचा कर लोकांवर बसवूं नये ह्मणून सरकाराशीं भांडले व त्यावरुन सरकारानें त्यांस जाग्यावरुन काढून टाकिलें होतें.

ज्ञा· प्र.

जमखंडी येथील, मामलेदार फौजदार शिपाई वगैरे ९ असामिनीं कैदी, बरोबर मारहाण केल्या, बद्दल त्यानां कैद करुन श्री. आपासाहेब जमखंडीकर यांनीं कोल्हापुरास पाठविले आहे असें ऐकतो.

मृत्यु. लिहिण्यास दुःख वाटते कीं, श्री. रा. रामराव नारायण ऊर्फ तात्यासाहेब राम दुर्गकर यांस तारिख १४ मार्च रोजीं देवाज्ञा झाली असें कळतें. याचें वय सुमारें ५० वर्षांचें असून यानां एक पुत्र आहे. त्याचें वय सुमारे २०–२२ वर्षांचें आहे.

पोष्टांत तूर्त इतकाच फेर फार झाला आहे कीं, पूर्वीं बंगी दर दहा तोळ्यास तीन आणे पडत होते तें हल्ली एप्रिलचे पहिले. तारखे पासून दर दहातोळ्यास दोन आणे पडतात. पूर्वीं प्रमाणे बंगया उशिरा न पोहचतां पत्रा बरोबर पोहचतील.

ज्ञा. सा.

मुंबई हायकोर्टांतील जज्जांच्या तीन, जागा लवकरच रिकाम्या होणार असल्यामुळें त्यांतील एकादी जागा तरी नेटिवास मिळावी अशी सर्व नेटिव लोकांची इच्छा असून त्याविषयींचा विचार त्या लोकांत काळजीपूर्वक चालला आहे असें दिसून येतें. अशा प्रकारच्या विचार करण्यास आजपर्यंत जी भीति वाटत असे त्या पेक्षां, गेल्या कानव्होकेशनच्या सभेपासून फारच वाटूं लागली आहे व या तीन जागा रिकाम्या होऊन त्यां सर्व जर इंग्रज लोकानींच मारल्या जतील तर त्यांच्या मनांत जे विचार आज घोळत आहेत ते कांहीं अशीं कायद्यांतील नियमच होऊन त्यांच्या मनांवर ठसून जाणार आहेत या करतां आह्मास वाटतें कीं, या जागा भरते वेळीं सरकारानें या गोष्टीचा फारच पोक्त पणानें विचार करणें अगदीं अवश्य आहे. विक्टोरिया चापटरचे क. २ प्रमाणे मुंबई हाय कोडताच्या वकील समाजांतील बरेच लोक हाय कोडतांतील जज्जाच्या जाग्यास लायक झाले आहेत ही गोष्ट वरील विचार करते वेळीं सरकारानें पूर्णपणे लक्ष्यांत वागविली पाहिजे. अमुक मनुष्यासच हाय कोडतांतील जज्जाची जागा द्या असें नेटिव लोकांचें ह्मणणें नसून त्या कलमाप्रमाणें योग्य असलेल्यापैकीं कोणास तरी द्या एवढेंच त्यांचें ह्मणणें आहे व त्याकडे या वेळीं जर दुर्लक्ष्य होईल तर त्याच्या योगानें, निदान या इलाख्यांतील नेटिव लोकास फारच वाईट वाटणार आहे.

ग० द०

गोविंद विठ्ठल करकरे बी० ए० यास एल्फिनस्टन कालेजांत गणिताचे प्रोफेसर नेमिलें असें कळतें.

मुंबई हायकोर्टांत वकिलीची व सबार्डिनेट जज्जाची परीक्षा देण्या करितां आलेले उमेदवारांची परिक्षा चालू महिन्यांत झाली तींत पसार झाले त्या उमेदवारांचीं नांवें.

१. मि. डब्ल्यू स्काटहावेल.
२. हरीलाल चतरनलाल सत्यवादी.
३. मि. दोराबजी टिमुलजी रुपादिया.
४. मि. आरदेसर बेजनजी.
५. मि. लाल शंकर उमिया शंकर वडी.
६. मि. हरी सखाराम माणिकराम मेथा
७. मि. लालुभाई ललुभाई.

पुणें एथें डावरे प्रभृति मंडळीचा खटला अद्याप सुरूच आहे एकंदर या खटल्यांत २८ चार्ज आहेत नुकते सरकारी तर्फेचे २१ साक्षीदार झाले आहेत अद्याप २९ होणें आहेत तेव्हां खटला संपण्यास किती दिवस लागतील तें कळत नाहीं ठीकच, मोठयांचें सर्वच मोठें लबाडी करावी तर अशीच करावी.

ज्ञा. च

बेळगाव एथील असिस्टंट इंजनियर रा. रा. गंगाधर राव किराणे, यांची बदली कोल्हापुरास जाहली. व सिव्हिल आस्पिटलचे असिस्टंट रा. रा. दादानाथाजी यांची बदली मुंबईस जाहली हे दोन्ही गृहस्थ सर्वलोकास मोठे प्रिय असून यांचा उपयोग पुष्कळ लोकास होत असल्या मुळें यांचे जाण्यानें लोकास वाईट वाटत आहे.

बे. स.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. आपणा कडेस खाली लिहिलेल्या चार ओळीस आपल्या अमोलिक पत्रा मध्यें उदार आश्रय द्याल या हेतूनें पाठवितो.

तारिख ११ माहे फेब्रुवारीच्या नेटिव ओपिनियन पत्रामध्यें लिहिलें, आहे कीं पार्लमेंट, सभेपुढें साक्ष देण्या करितां दादा भाई नवरोजी हे हिंदुस्थानांतील स्थिती विषयीं माहिती मिळवित आहेत, त्यामध्यें वऱ्हाडांतलि जागल पट्टी आणि पोलीसपट्टी हे दोन कर बसविण्यापासून रयतेस काय विशेष सुख झालें आहे व होत आहे हें पार्लमेंट सभेंत उघड करुन दाखविण्यास योग्य आहेत असें मला वाटतें. त्या करांविषयीं थोडा मजकूर एथें लिहितो.

जागलपट्टी शेकडा ६। रूपये प्रमाणें कर शेतकरी लोकांवर बसविला आहे. मागले ज्या गावचे काळीचें उत्पन्न १०००

आहे त्या मनाला हजाराने एक म नाने देतात. आणि लोकांनीं काम पडलें तर, सरकारी कामदार गावांमध्यें फिरावयास ज्या वेळेस येतात त्या वेळेस त्यांस शिधा सामान नेऊन द्यावें. नाहींतर पाटिल पांड्यांनीं सर्व रयतेनीं त्यांची सरभराई रयतेस बुडवून करावी. इतकेंच आहे. येणेंकरून रयतेस इतकें संकट येऊन पडलें आहे कीं, त्यांस ह्या संकटांपासून कधीं मुक्तता होईल न कळे. याजविषयीं मी येथें एक दोन उदाहरणें दिलीं असतीं परंतु उदाहरणें असंख्य आहेत म्हणून देत नाहीं.

पोलिस पट्टीविषयीं म्हणाल तर नियमच नाहीं. महालापासून मोठे कामगाराने प्रत्येक वर्षीं वाढवून कर वाढविण्याचेंच मन असतें मग रयतेकडेस कोण लक्ष पुरवितो. रयतेनें कितीही हाका मारिल्या तरी थोड्याच; त्यांची दाद ना फिर्याद; सबब सरकारानें या बाबदींत कांहीं तरी नियम करावे.

वऱ्हाडचे ज्ञानसंग्रहामध्यें दळणवळण या विषयावर एक आर्टिकल दिलें आहे त्यामध्यें असें दर्शविलें आहे कीं आगगाडीनें व्यापार फार वाढला आणि बैल गाडी वाहणारे लोकांचा व्यापार अधिक वाढला. मी त्या पत्रकर्त्यांस अशी विनंती करितो कीं, गाडीवानांचा व्यापार अगदींच बुडत चालला आहे. त्याजविषयीं हकीकत येथें देतो. वढनेऱ्यापासून उमरावतीपावेतों आगगाडी होण्याच्या पूर्वीं बैलगाड्या किती होत्या. आणि प्रत्येक गाडीवानास दररोज किती उत्पन्न होतें याविषयीं विचार केला म्हणजे सहजच वाचकांच्या लक्षांत येईल. हिंदुस्थानचा व्यापार दिवसेंदिवस बुडत चालला आहे किंवा वाढत चालला आहे याविषयीं विचार करणें जरूर आहे. आर्टिकल लिहिणारांच्या विचाराप्रमाणें म्हटलें असतां पूर्वींपेक्षां आतां व्यापार दसपटीनें वाढला असावा. दुसरें त्याच आर्टिकलमध्यें लिहिलें आहे कीं खेडेगावचें दूध आणण्याकरितां आगगाडी करावी पण यापासून काय फायदा होईल न कळे कदाचित् विलायतेचा फायदा होईल यांत संशय नाहीं पत्रविस्तार भयास्तव लेखणी आटोपतो.

यवतमाळकर
क्ष

## नोटिस.

नोटिस—वामनजी उकडजी आणि कंपनी दुकान छावणी अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून, नोटिस देण्यांत येते कीं तुम्हीं तारिख १० नोवेंबर सन १८७२ इसवी रोजीं वऱ्हाडसमाचारांत जी नोटिस दिली तिचा जबाब व इतर मजकूर खालीं लिहिला आहे.

तालुके मलकापुर, तालुके जळगांव व तालुके अकोलें येथील कलाली वगैरेचा मक्ता, अकोलें येथील भांडीचा मक्ता असे तुमचे आमचे करारांतील असून त्याजबद्दल हिशेब दिला नाहीं म्हणोन वगैरे मजकूर त्यास कुसरीलाल यांनीं तालुके जळगांव, अकोलें येथील कलालीवगैरे व अकोलें येथील भांडी मक्तयाबद्दल सन १२७८ फसली सालापासून सन १२८० सालापावेतों ज्या ज्या मक्तयाची वहिवाट केली त्याजबद्दल सर्व तपशिलवार हिशेब तुम्हास समजून देऊन हिशेब दिल्याबद्दल एक नकल तुम्हास तेव्हांच दिली. तेंच वेळेस तुम्ही सर्व हिशेब समजून घेतला आहे.

मलकापुर येथील कलालीवगैरेचा मक्ता याची वहिवाट आम्ही केली नसून तुम्ही केली आहे त्याबद्दल नफावगैरेचा हिशेब तुम्हापासून घेणें आहे.

कुसरीलाल यांनीं जी जी वहिवाट केली तीबद्दल पुन्हा हिशेब देण्याची जरूर राहिली नाहीं. विनाकारण पुनः हिशेब मागता तो देणें होणार नाहीं.

तालुके मलकापुर येथील कलालीवगैरेचे मक्ते तुम्ही गणू पाटिल व तोताराम डांगे यांस सन १२७८ फसली सालापासून सन १२८० पावेतों दिले त्या मक्तयांत तुम्ही आपले पेस्यांत कुसरीलाल याजला सन १२७८।७९।८० सालांत हिस्सा दिला. त्याबद्दल तुम्हापाशीं आगाऊ पेशगी देण्याकरितां मिश्रीलाल यांनीं अकोलें येथें दिले व दालचंद ठाकुरदास यांनीं मलकापुरास हरास करितेवेळीं कुसरीलाल याचें नांवें दोनशें रुपयाची थैली ठेविली ते रुपये पेस्तनजी भाई यांनीं तोताराम डांगास देविलें म्हणून त्यांचें सांगितलें वरून सरकारांत रुजू करून दिले ते तुमचेकडे पटले ते व तीन सालाचा खर्च वगैरे जाऊन नफा राहिलेले रुपये तुम्ही द्यावे व हिशेब द्यावा असें कुसरीलाल यांनीं पांचचार वेळां मागितले असतां हिशेब रुपये तुम्ही दिले नाहीं. फक्त देतो म्हणालांत.

याप्रमाणें परतु शेखबाबु एथील कलालीचा मक्ता सन १२८० फसली सालांत तुमचे नांवाचा असून कुसरीलालचा निमे हिस्सा होता त्याची वहिवाट तुम्ही केली असतां त्याबद्दल हिशेबाचे रुपये ही बहुत वेळां मागितले तरी तुम्ही दिले नाहीं नुसते देतों म्हणणें उपयोगी नाहीं.

ताजना पेठेंत, मार्किटांत जी दुकानें तुम्ही व आम्ही बांधली त्यांचा किराया एक साल आम्ही घेऊन दुसरे सालीं एक सालाकरितां तुम्ही ठेविली त्यास तीन वर्षें होत आलीं त्याचा किरायाही तुम्हीच घेतला आहे. त्यांतून दोन सालचे किरायापैकीं निमे तुम्हांकडून घेणें आहे.

वशिम येथील कलाली दुकानांत आपले सामान आणलेले पेस्तनजी भाई व बाळकृष्ण तुमचे गुमास्ते यांनीं दालचंद लालापासून घेतले ते. व त्यांचा किराया तुमचेकडून घेणें आहे.

१०० ताडपत्राचा पेग घागर १ किंमत रुपये.
४९ पिंपें लाकडाचे
४० पिंपें मोठे ४ दर एकास रुपये १० प्रमाणें आकार रुपये
९ पिंपें लहान ३ दरएकास रुपये ३ प्रमाणें
२ तांबे पितळेंच २ किंमत रुपये
२। दारू निकण्याचें माप ६ पितळेंच किंमत दर एकास ६ आणें प्रमाणें
५ मातीचीं नांदकोरी १ किंमत रुपये
———
१९८।

येणेंप्रमाणें १९८। रुपयांचे सामान व शिवाय किराया घेणें आहेच.

सन १२८२ फसली [ चालू ] सालांत तालुके अकोलें आणि आकोट येथील आफू गांजा वगैरे मक्तयांत तुम्ही निमे हिस्से ठेविले आहा. तुमचे हिशाची पेशगी द्यावेस आम्हासच सांगितलें ती दिली आहे. ह्या मक्तयांत सालमजकुरीं नुकसान आहे असें पाहून पेशगीचे रुपये सुद्धां अंगावेगळे करूं पाहतां आणि नोटिसा देऊन तंटे उत्पन्न करण्याची तजवीज चालवितां परंतु परिणामीं नुकसान होईल तर तुम्हास सुटणार नाहीं. प्रारब्धानें नफा झाला तर तो ही तुम्हास मिळेलच ह्या करितां सदरी नोटिशीचा जबाब एकवार टपाल द्वारे ह्या पूर्वीं दिलाच आहे.

ह्याप्रमाणें तुम्हांकडून घेणें असून मागत असतां देत नसून उलट नोटिसा देतां म्हणोन आम्हास ही नोटिस देणें भाग झालें ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसाचें आंत पेंशगीचा ऐवज अकोलें दुकानचा किराया व वाशीम दुकानांतील सामान व किराया; व्याजः मक्तयाची वहिवाट तुम्ही केली त्याचा नफा; हिशेब सुद्धां तुम्ही द्यावा अथवा देण्यास आरंभ तरी करावा.

असें न झाल्यास रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारिख २९ माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही) कुसरीलाल मथत, वारस र। धावाई जवजे कुसरीलाल यांचा व मुखत्यार मिश्रीलाल दालचंद दस्तुर खुद्द.

---

नोटिस—राजेश्री भाई केसोराम रामदास दुकान खामगाव यांस खालीं सही करणार नोटिस देतो कीं, तुम्हीं तारिख २१ मार्च इसवीची नोटिस तारिख २३ मार्च सन १८७३ चे वऱ्हाडसमाचारांत दिली ती आम्हांस पावली तुमच्या सारख्या शाहजोग व्यापाऱ्यानीं खोटी नोटिस देणें व विनाकारण दुसऱ्याचें नुकसान करून त्याचें मनास त्रास उत्पन्न होण्याजोगें वागणें हें फार शरमेचें आहे. असो. तुम्ही दिलेल्या नोटिशींतच तुम्ही कबूल करितां कीं, आंख्याचा करार फाल्गुन शुद्ध १५ पावेतों होता. व त्या दिवशीं तुम्हाकडून माल आला नाहीं. व्यापाराचे रितीनें हाटलें म्हणजे त्याच दिवशीं तुम्ही माल द्याल तर घेणें आहे पुढें घ्यावयाचा नाहीं. जें कांहीं नुकसान होईल तें घेण्याचें हें तुम्हास आम्ही शिकवावें असें नाहीं तुम्ही माल वक्तशीर आम्हीं दिला नाहींत. तथापि तुम्ही आमचे बरोबरीचे व्यापारी आहांत यास्तव तुम्हांवर सक्ती करूं नये, म्हणून तुमचे गर्जी खातर आम्हीं फाल्गुन वद्य ३ पावेतों तुम्हा कडून आलेला माल परत परण्या जोगा होता. तितका मोजून घेतला. त्या दिवशीं तुम्हांजवळ याहून अधिक माल आम्हास देण्यालायक नव्हता, किंवा निदान तुम्हीं आम्हास त्या दिवशीं अधिक माल दिला नाहीं. एक वेळ मोकळ सापडलें म्हणजे अधिक अधिक आशा सुटती, हें भाईजी तुमच्या सारख्या शाहजोग व्यापाऱ्याला बरें नाहीं. तुम्हीं नोटिशींत लिहिता त्याजवरूनही असेंच दिसतें कीं, तुम्ही हल्लीं माल घेऊन ठेविला आहे, परंतु इतकें पक्कें लक्षांत ठेवावें कीं जेव्हां तुम्हास सोयीवार पडेल तेव्हां तुम्ही माल घ्या असें म्हणाल तर आम्ही ऐकणार नाहीं. जळ जोखमेची जबाबदारी आम्हावर कोणतेही प्रकारें येणार नाहीं व राहिलेले अफूंचा भाव कराराचे दिवशीं होता त्या प्रमाणें तुम्हास द्यावाच लागेल. इतक्याकरितां तुम्हास ह्या नोटिसीनें असें कळवितो कीं, आजपासून तीन दिवसाचें आंत तुम्ही वरील करारांचे भावाप्रमाणें चुकते पैसे आम्हास ह्या नोटिसीचे खर्चासह द्यावेत नाहींपेक्षां तुम्हावर आम्ही फिर्याद करूं. तुमची नोटिस प्रथम दर्शनीच इतकी चमत्कारिक दिसते कीं, कोणासही ती बनावटी आहे असें दिसेल. तुम्ही किराया वगैरे द्यावा लागेल म्हणता यांतही कांहीं अर्थ नाहीं. व भाव मंदा झाल्यास नुकसान [illegible], तुम्ही करारावर माल न दिल्यास कांहीं गैरशिस्त नाहीं. कळावें तारिख २४ मार्च सन १८७३ इसवी.

ताजाकलम ही शेवटची सूचना आहे करारशीर निकाल न होईल तर आम्ही खास फिर्याद करूं त्या फिर्यादीचा खर्च व करारापूर्वीं व्याजासुद्धां रक्कम तुम्हावर पडेल कळावें तारिख मजकूर.

(सही) गोकूळदास माधवजी आणि कंपनी, खामगांव दस्तुर हिरजी पुंजा.

---

नोटिस— खाजे अफिजुद्दीन चीफ कान्स्टेबल मुक्काम मेहकर जिल्हे बुलढाणे यांस बलदेव जिवनराम साहु दुकान पेठ बाळापुर यांजकडून वहिवाटदार हजारीमल बलदेव यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हाकडे एक वर्षांपासून आमची खाते बाकी मुद्दल २५८।४ व्याज १०८९ मिळून ३६८७ छत्तीस रुपये सात आणे यावयाचे आहेत. त्याजबद्दल पुष्कळ वेळा तुम्हाला मागणें केलें. तुम्ही देतो देतो म्हणता परंतु दिले नाहींत. तुम्ही बाळापुराहून बदली झाली तेव्हां तुम्हास तगादा केल्यावेळीं कांहीं रुपये कमी देऊं लागला सबब आम्हीं घेतले नाहींत. कारण असा आंत वट्याचे व्यवहाराचा शिरस्ता नाहीं. असो. आजरोजीं तुम्हास पुढाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसाचें आंत आमचे रुपये नोटिसीचे खर्चासहित पाठवून द्यावे. तसें न कराल तर तुम्हावर कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेतले जातील. कळावें तारिख २९ माहे मार्च सन १८७३ इसवी.

(सही) बलदेव जिवनराम दस्तुर खुद्द.

---

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. पा.

Registered No4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला शनिवार ता० .. एप्रिल सन १८७३ इ० अंक १५

## पुरवणी वऱ्हाडसमाचार—

तारिख ३१ माहे मार्च सन १८७३ इसवी

नोटिस—जयाजी वल्लद भगवानजी भरदु रहाणार .. परगणे मंगरूळ पिर जिल्हा वाशीम .. जानकी मर्द जयाजी भरदुवे रहाणार हातोल परग .. तालुके अकोले इजकडून नो टिस देण्यांत येते कीं, तुझें माझें लग्न .. सुमारें १९ वर्षे झालीं तेव्हां मी .. होते. पण आतां .. अ .. सहा सात वर्षे झालीं तेव्हां .. पात आले कीं, तूं .. तुझे .. आले असतां .. .. सुमार .. एथे आहे. व .. माझे पोटास .. सालीना ५० रुपये प्रमाणें .. रुपये देणे झाले आहे ते द्यावें व .. सोडचिटी द्यावी. कारण तुजपा .. संसार होण्यास आशा नाहीं. .. कळविण्या करितां तुला मुदाम ही नो टिस दिली आहे. तर नोटिस पोचल्या पासून १५ दिवसांचे आंत मजकूर रुप .. सोडचिटी पाठवून द्यावी तसें न क रशील तर तुजवर फिर्याद करून रकम व सोडचिटी मिळविण्याची तजविज क रीन हें पक्के समजावें. कळावें ता रीख ३१ माहे मार्च सन १८७३ इ.

१ (सही) जानकी मर्द जयाजी भरदु ल हिचे हातची नागरी.

---

नोटिस—महादु वल्लद लक्ष्मण सेज वागदेवकर हल्लीं वस्ती दंताळें तालुका .. जिल्हा बुलढणे यांस पंजी मर्द महादु सेजव इजकडून देण्यांत येते कीं, .. माझें लग्न होऊन सुमारें १२।१३ .. झालीं; लग्न झाल्या दिवसापासून तूं म .. आपले घरीं नेत नाहींस व नांदवीत नाहींस यामुळें मला माझे आईच्या घरीं राहून तिच्या खर्चानें पोषण करावें लाग .. व अन्नवस्त्राबद्दलचा खर्च दरसाल १० रुपये प्रमाणें १०० रुपये झाला .. हा खर्च माझे आईस देऊन ही नोट स पावल्या तारखेपासून ८ दिवसांचे आं त मला आपले घरीं घेऊन जावें. वरील मुदतींत नेणार नाहींस तर मी दुसरा नव रा करण्याविषयीं कायदेशीर तजविज क रीन मग तुझा दावा बिलकूल मजबर चालणार नाहीं हें नीटपणें समजून तज विज करावी. कळावें तारीख २७ मा र्च सन १८७३ इसवी.

( सही ) पंजी मर्द महादु सेजव वस्ती वांगदव हिचे हातची खुद नागरी

---

नोटिस—गुणाजी वल्लद हरि धनगर वस्ती पुनोती परगणे महान तालुके अ कोले यास खालीं सही करणार याजक डून असी नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस. तुजवर मी अन्नवस्त्राबद्दल पूर्वीं दावा केला होता तेव्हां तूं मजला फारकती देण्यास कबूल होऊन लग्नाचा हक्क सोडलास. मी कोर्टांत राजीना मा देऊन व तुजपासून फारकती घेतली ती फारकती एक रुपयाच्या स्टांपावर असून फाटली आहे. हल्लीं मी पाट लावण्याच्या तयारींत, असतां तूं पुन्हा कांहीं तक्रार करून आड येऊं इच्छितोस असें माझें ऐ कण्यात आलें आहे. याजकरितां या नोटिसीनें असें कळवितें कीं, एक रुपया वरील फारकती बरोबर नाहीं यास्तव आठ रुपयाचे स्टांपावर फारकती करून द्यावी अगर फारकती देणें नसेल तर मजला आपले घरीं घेऊन जाऊन नांदवावें. का यद्याप्रमाणें जरी मजवरील तुझा हक्क बुडाला तरी विनाकारण तंटा न व्हावा ह्मणून मी तुझे घरीं येण्यास तयार आहे. दोन प्रकारापैकीं एकही प्रकार तूं न करशील तर तुजवर अन्नवस्त्राची फिर्याद करीन. ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत नि काल समजला पाहिजे. कळावें तारीख ३१ मार्च सन १८७३ इसवी.

(सही) शिवी धनगरीण निशाणी खुद.

---

अकोला, वऱ्हाडसमाचार छा० छा०

---

.. जटत आहे; आणि लाखो रुपयेही त्या .. गाकडे खर्च करीत आहे. असें असून .. ांतील लोक तिकडे लक्ष न देतां .. कारण्या कल्पना काढून आपलीं .. अविद्वान् करितात. महाराज .. व्हारे येथें कांहीं कामाकरितां .. त्यावरच एक नवीन जाहले .. ली. तेव्हां मी तीत शि .. आहे असें पाहिलें. .. साचा व्हावा ह्मणून .. रा.नरसय्या चीफ का .. देशमुख हे उभयतां .. लोकांना बोलावून .. पाठवावीं वगैरे त्यांनीं .. —ते ह्मणाले तेव्हारें .. र, नाराशीं घरांचे .. वचे सरकारी शाळेंत .. असणें किती लाजि .. वी कीर्ती पाहिजे व .. हिजे तरच त्या ना .. शोभा. कां पत्र .. उपदेश चीफ का० .. चे तरी तोंडांतून .. निघालीं ह्मणाल .. असतु. मला त्या .. देशमुख व चीफ .. यांची आहे ती .. न पत्रविस्ताराची .. छापावा. कळावें. .. न १८७३ इ०.

"एक न."

---

.. कर्ते यांस:—
.. जकूर .. क .. यावा तारीख .. झाली तेथें .. तो तारीख .. ी तालुके वणी .. हा गांव मोठा .. ८००।१००० घरें .. ऐसे वहिवाटदार पा .. आहेत त्यांची वहिवाट .. चालतो म्हणजे: अवल .. यापासून सुरू होतो ज्या .. यरीस उतरलो त्या वेळीं .. असा मेला होता कीं .. पाणी आणण्या साठीं जाणें .. गोठी मुष्कील पडतें असें ते .. व्हां आम्ही तेथील माणसास पुसतां त्यां च्या सांगण्यांत आलें कीं, सालमजकूर च्या पाटलाची पाटिलकी केवळ राम राजा सारखी आहे. म्हणजे पाहिजे तेंव्हां गैल वगैरे केला असतां कांहीं हर कत नाहीं हे कांहीं अंशीं वहिवाटदार पाटलास भूषणास्पद असेल खरें परंतु अमलदार आले म्हणजे पिशवीचें तोंड मोकळें करावें लागतें व जातीनें रयतेच्या गैव्ययावर सर्व रयतेस नेवी गातो टाकावे लागते तेव्हां हें क ज्जेस कारण नव्हे काय? असो तूर्त इंग्रजी राज्यांत असी वहिवाट करण्यांपेक्षां स्वस्थ नसणें बरें आहे. हें त्यांनीं लक्षांत धरण्याजो गें आहे. दुसरे वहिवाटदार पाटील पुंजा रामजी हे आपले कामांत हुशार आहेत म्हणजे यांनीं चार्ज समजून घेतल्यापासून गावांतील सफाई असी केली आहे कीं, त्याप्रमाणें तालुक्याचे ठिकाणीं .. पा हण्यांत आली नाहीं. हे आपले काम फार लक्ष लावून करितात. व या गाव चें हें वडील घराणें असून वतनदारिही आ हेत व कायदाकानूंत वाकबगार व घर चे श्रीमान आहेत. असें असतां तहशि लदार यांनीं ह्यांस खुर्ची मिळण्याच्या या दर्तिल यांचे नाव कशावरून कमी केलें हें कांहीं समजत नाहीं. असो कळावें ही विनंती.

"निरस्त."

---

## योग्य गोष्टीकडे लक्ष देणें.

फोटोग्राफीचा उपयोग.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

.. वि. .. योग्य विचार झाला असतां तीतील व्यंगें बाहेर पडून तिचे स्वरूप चांगलें दिसूं लागतें द महांत जरी मूर्तिमंत आहे तरी त्या वरील पडदे काढिल्यावांचून सुबक पणा नजरेस येत नाहीं तसेंच हरएक विषया संबंधी विवेचन करितांना दृष्टोत्पत्तीस येतें. या वि षयीं तूर्त आपण कराचें उदाहरण घेऊं.

प्रत्येक मनुष्य कुटुंबांतील मुख्यास आ पल्या संरक्षणा बद्दल किंवा आपण त्यांशीं प्रजाधर्मानें बांधलों आहेत ह्मणून सजास कर दिला पाहिजे. राजश्री हा मायना आपले इकडे प्रत्येक मनुष्यास आहे. त्या चा मतलब राजश्रीनें राज्यलक्ष्मीनें अर्थ शास्त्राप्रमाणें परंपरेनें त्यांचें पोषण होत आहे. आतां जर असें उघड आहे तर प्र त्येक मनुष्यानें अगर कुटुंबांतील मुख्यानें मगदूर माफक कर सरकारास द्यावा हें रा स्त आहे. कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं, सरकारचा वास्तविक हक्क ह्मटला ह्मणजे जमिनीवर आहे तेव्हां तिचे वहिवा टणारे काळीकर यांजपासून कर घ्यावा. पांढरपेशा जवळून घेऊं नये त्यास हें म त क्षणभर कबूल करून चाललें असतांना ही पांढरपेशे सरकारास आपल्या मेहन तीचा कांहीं तरी अंश देतात असें होतें.

पहा, धान्याची किंमत अर्थ शास्त्रा प्र माणें श्रम, काळ, आणि त्यास लागणारा खर्च या वरून वाढते तेव्हां अर्थात त्या च्या मिळाइकाचा द्रव्यांश परंपरेनें सरका रांत गेला हें उघड आहे. असें असतां कित्येक कारणावरून हिंदुस्थानावर करा चें ओझें लादलें गेलें आहे व तें हिंदुस्था नांतील लोकांचें शक्ती .. हे. दिव स भर कावाड कष्ट क .. रून .. ड्या भाकर्‍या

---

.. अमरावती यास .. ग देवमणदास कनोजी ब्राह्मण मूर्तिजापुर यांजकडून नोटिस .. येते कीं, तुमची आमची देव .. तीन वर्षें चांगले प्रकारें चालू .. असें असतां अलीकडे तुमचे कांहीं मैल आला आहे असें दिस .. तो. आम्हीं तुमचे देण्यांत ९।१० महिन्या मागें ४९९ रु .. दि .. आपले आमचे .. नाहींत

---

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. आपणाकडे खालील च्यार ओळी लिहून पाठविल्या आहेत. तरी आपण मेहेरबानी करून त्यांस आपले सुं दर पत्रीं जागा द्याल अशी आशा बाळगू न आहे.

महाराज या वऱ्हाडांत विद्यावृद्धी हो ण्याकरितां आपले दयाळु सरकार किती